. मं. ठाणे
नोंदी ६
२०५८

REFBK-0019182

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

REFBK-0019182

नि १९

# मनोरंजन व निबंधचंद्रिका.

१०९८

**अहो ईदृश एष संवृत्तः**—(अगबाई हा एवढा झाला!) असे उद्गार श्री रामचंद्रांनीं त्याग केल्यानंतर देवी सीता जेव्हां पुनः दण्डकारण्यांत आली, व पतीबरोबर वनवास भोगीत असतां ज्या करिपोताला आपल्या हातीं वृक्षलतांच्या पल्लवांनीं प्रेमपुरःसर वाढविलें त्याच करिपोताला तिनें पाहिलें, तेव्हां तिच्या मुखांतून निघाले; आणि तेच उद्गार हा **मनोरंजना**-चा अंक पाहून त्याला ज्यांनीं ज्यांनीं आश्रय दिला त्यांच्या त्यांच्या मुखांतून निघतील. त्याचप्रमाणें, **निबंधचंद्रिके**च्याही आश्रयदात्यांच्या तोंडून तेच उद्गार निघाल्यावांचून रहाणार नाहींत. **मनोरंजन** व **निबंधचंद्रिका** हीं दोनही वाढलीं आहेत. लहान वय असतें तोंपर्यंत वाढ ज्यास्त जलदीनें होते, तेव्हां **मनोरंजन** एकदम मोठें झालें, यांत नवल नाहीं. **निबंधचंद्रिका** तितकी वृद्ध ती थोडीच वाढली यांतही आश्चर्य आहे असें कोणास वाटणार नाहीं. या दोहोंचा संगम म्हणजे वनवृक्षांचा व ऋतुपर्यायानें येणाऱ्या शोभेचा संगम होय. **मनोरंजन** हें लहान व **निबंधचंद्रिका** ही वयोवृद्ध तेव्हां **तरतरी** व **पोक्त विचार** यांच्या संगमाप्रमाणें या दोहोंचा संगम विशेष हृदयंगम होणार आहे. मनाचें यथेष्ट रंजन होऊन ‘शरीरनिर्वापयित्री’ **ज्योत्स्ना** अंगावर पडत असतां तिला कोणी वस्त्र आड धरून टाळील असें नाहीं!

इत्यादि सर्व विचार येऊन वरील दोनही मासिकपुस्तकांचा संयोग केला आहे. या संयोगानें दोनही मासिकपुस्तकांच्या आश्रयदात्यांस आनंद होण्यासारखें झालें आहे. **मनोरंजन** मूळापेक्षां बारा पृष्ठें वाढलें; व **निबंधचंद्रिका** चार पृष्ठें वाढून तिच्या किंमतींत आठ आणे कमी झाले. एकाच्या आश्रयदात्यांस हवा तितका निबंध मिळत नसे तो मिळूं लागेल; व दुसऱ्याच्या आश्रयदात्यांचें यथेष्ट मनोरंजन होत नसे तें होऊं लागेल.

शिवाय, या दोहोंचा मिलाफ होण्यास असें कारण झालें कीं, पुण्यांतल्या पुण्यांत दोन मासिकपुस्तकें चालण्यापेक्षां एकाच ठिकाणीं पुष्कळांनीं श्रम करून एकच चांगलें चालवावें असें त्यांच्या त्यांच्या चाल-

कांच्या मनांत आलें; व इतर मित्र मंडळींचेंही तसेंच मत पडलें. हीं दोन भावंडें एकवट होऊन मोठ्या प्रेमानें वाढूं लागल्यावर त्यांच्या पालकांसही आनंद झाल्यावांचून राहील काय?

**मनोरंजन व निबंधचंद्रिका** हीं एक होऊन पुस्तक वाढलें त्यांत आतां कधीं कधीं स्वतंत्र विषयांवर निबंध येतील. परीक्षणार्थ पुस्तकें आल्यास यथामति परीक्षण होईल. सारांश, **निबंधचंद्रिका** जें जें काम करीत होती तें तें काम होईल. विशेष एवढाच कीं, यांत कोणत्याही प्रकारची एकतानता अथवा ऐकमत्य ठेवलें जाणार नाहीं. ज्यास इंग्रजीमध्यें पुस्तकाची अगर पत्राची पॉलिसी म्हणतात ती ठेवली जाणार नाहीं. प्रथमतः जें मत येऊन गेलें तेंच म्हणजे पुस्तकांतील लिहिणारांचें मत असें कदापि मानलें जाऊं नये. या मासिकपुस्तकाचा चालक एक नाहीं ही गोष्ट सर्वविश्रुत आहेच. तेव्हां सगळ्या विषयांवर सगळ्यांचीं मतें एकच कशीं होणार? दुसरें असें आहे कीं, सार्वजनिक महत्वाच्या प्रश्नांवर नेहमीं ऐकमत्य असतेंच असें नाहीं; तेव्हां असल्या प्रश्नांची एक बाजूच दाखवून दुसरी दडपून ठेवावयाची, हा न्याय नव्हे. एकाच ठिकाणीं जितक्या म्हणून दिशा असतील तितक्या दिसाव्या हें विहित होय, आणि ज्यांत **विचार** हाच काय तो प्रधान होय अशा या एकुणिसाव्या शतकांत तर हेंच इष्ट आहे. असा विचार करून या मासिकपुस्तकांतून "पॉलिसीचें" खटलें काढून टाकलें आहे. लेखाची जबाबदारी लिहिणाऱ्यावर. मग तो आपलें नांव स्पष्ट घालो अथवा एकादें गैबी—नांव धारण करो. या रीतीपासून फायदा आहे कीं नाहीं हें येथें सांगत बसण्याची जरूरी नाहीं.

एवढ्यावरून कोणीं असें मात्र समजूं नये कीं, या पुस्तकांत हवा तो हवें तें लिहूं शकेल. जें विचारास योग्य तेंच यांत येईल. सभ्यपणाची मर्यादा ज्यांत उल्लंघिली आहे असा लेख या पुस्तकाच्या पृष्ठांत कधींही दिसणार नाहीं. **व्यक्तिस्वातंत्र्य** व **विचारस्वातंत्र्य** पूर्ण देणें हीच या पुस्तकाची पॉलिसी; व तीही इतकी कीं, कोणत्याही **विचारास** यांत स्थळ मिळेल. मात्र तो **विचार** असला पाहिजे; **विकार** उपयोगी नाहीं. या पुस्तकाच्या चालकांची स्वातंत्र्याची कल्पना "आपल्या विरुद्ध तें वाईट" असें समजणारी नाहीं. राष्ट्रशिक्षण व राष्ट्रोन्नति हीं एकाच मताच्या धोरणानें कधींही होणार नाहींत. अनेक—व्यक्तिशः म्हटलीं तरी चालेल—मतें

स्पष्टपणें बाहेर पडून त्यांच्या परस्परयुद्धांत जीं पुढें सरतील तींच वरील दोन गोष्टी करूं शकतात. पुष्कळ वेळां मतांचें सम्मेलन होऊन त्यांजपासून निघणाऱ्या सारानें राष्ट्रहित होतें. इत्यादि गोष्टी येथें विस्तारानें सांगावयास पाहिजेत असें नाहीं.

असो; इतकें लिहून आमच्या हल्लींच्या व भावी आश्रयदात्यांस गेल्या वर्षाप्रमाणें पुढेंही मदत करून, यंदाप्रमाणें पुढल्याही वर्षी आपलें बालक चांगलें पुष्ट होत असून आपली शुश्रूषा चांगली करीत आहे असें पाहण्याची वेळ आणावी, अशी सविनय प्रार्थना करतों.

मराठी ग्रंथ ... ठाणे

# कै॰ वा॰ सौभाग्यवती
## डाक्टर आनंदीबाई जोशी, एम्. डी.

देशाचे ऊर्जितावस्थेस ज्याप्रमाणें पुरुष चांगले विद्वान्, धैर्यशाली, पराक्रमी आणि देशाभिमानी असे निर्माण झाले पाहिजेत, त्याप्रमाणेंच स्त्रियाही विदुषी, धैर्यवती, पराक्रमी आणि देशाभिमानी अशा निर्माण झाल्या पाहिजेत. अमेरिकाखंडांतील यूनैटेड् स्टेट्स व फ्रान्सदेश यांचें स्वातंत्र्य आणि त्यांचें प्रजासत्ताक राज्य, ह्या ज्या त्या देशाच्या मुख्य सुस्थितिदर्शक गोष्टी, त्या मिळविण्यास तिकडील पुरुषांच्या बरोबरीनेंच सरासरी तिकडील स्त्रियांचेंही विद्वत्व, धैर्य, पराक्रम व देशाभिमान हीं कारण झालीं; हें, त्या त्या देशाचे इतिहास वाचले म्हणजे आपल्याला समजून येतें. आणि, आपल्या देशालाही चांगली स्थिति येण्याला, याचप्रमाणें चांगले पुरुष व त्यांचे बरोबरच चांगल्या स्त्रिया निर्माण झाल्या पाहिजेत, असें पाहिलें असतां, आपल्या देशांत जर कोणी चांगल्या विदुषी, धैर्यवती, पराक्रमशालिनी आणि देशाभिमानिनी अशा स्त्रिया आजपर्यंत झाल्या असतील किंवा पुढें होतील तर त्यांमध्यें, कै॰वा॰ सौ॰डाक्टर आनंदीबाई जोशी ह्या उच्चस्थान पावतील. आपल्या देशाच्या दुर्दैवानें ह्या

विद्वान्, धैर्यवान्, पराक्रमी आणि देशाभिमानी स्त्रीरत्नाला अल्पायु झालें त्यामुळें त्यांचें तेज व मोल लोकांचे अनुभवाला कांहींच आलें नाहीं! परंतु, सौ० **आनंदीबाई** ह्या जर ईश्वरी कृपेनें वांचल्या असत्या तर त्यांचे गुण, त्यांची विद्वत्ता, त्यांची स्ववर्गाच्या उन्नतीविषयींची महत्वाकांक्षा आणि स्वदेशाच्या ऊर्जितावस्थेसाठीं त्यांणीं आरंभिलेला यत्न, यांचें रूप कसें काय आहे तें सर्वांच्या अनुभवास आलें असतें. या बाईचें वृत्त आम्ही थोडक्यांत यापुढें देतों.

सौ० **आनंदीबाई** यांचें जन्म पुणें येथें शके १७८७ ह्या वर्षीं चैत्र शुद्ध ९ रोजीं झालें. त्यांच्या वडिलांचें नांव **गणपतराव अमृतेश्वर जोशी.** ते **कल्याण**चे इनामदार होते. आनंदीबाईच्या आईचें माहेर **पुण्यास** प्रसिद्ध **बाळशास्त्री माटे** यांचें घर असल्यामुळें, **आनंदीबाई**च्या वेळेस त्यांची आई बाळंतपणाला **पुण्यास**च गेली होती. **आनंदीबाईचें** जन्म मात्र **पुण्यास** झालें. बाकी त्यांचें पुढील बाळपण बापाच्या घरीं, **कल्याणास**च, गेलें. लहानपणीं त्या फार हूड व खेळकर अशा असल्यामुळें, त्यांचेकडून म्हणण्यासारखा लिहिण्यावाचण्याचा अभ्यास झाला नाहीं. म्हटलें असतां, **कल्याणास** त्यांच्या बापाचे घरींच मुलींची सरकारी शाळा होती; परंतु त्या, नियमानें त्या शाळेंत फारशा कधीं गेल्या नाहींत. त्यांचें माहेरचें नांव **यमुना** होतें. त्यांच्या माहेरचीं मनुष्यें सांगतात कीं, **यमुने**ला शाळेंत पाठवावयाची म्हणजे एक जुलमाचा रामराम असे. त्यांणीं सुखासमाधानानें व उल्हासानें कधींच शाळेंत जाऊं नये. अशा बालस्वभावाची मुलगी; पण पुढें ती किती लोकविलक्षण आणि अद्वितीय गुणवती व विदुषी स्त्री बनली पहा!

**आनंदीबाईं**चा विवाह त्यांचे वयाच्या १० वे वर्षीं, त्या वेळीं **ठाण्यास** पोस्ट मास्तरच्या हुद्यावर असलेले रा. रा. **गोपाळ विनायक जोशी, संगमनेरकर,** यांच्याशीं झाला. **गोपाळरावांचें** हें द्वितीय कुटुंब. त्यांणीं मात्र आपल्या पत्नीचे विद्याभ्यासाकडे पहिल्यापासून फारच लक्ष्य दिलें. आणि शेवटीं तें त्यांचें शिक्षण, त्यांणीं, अनेक प्रकारच्या गैर सोयी, मोठाले खर्च आणि लोकापवाद हीं सर्व सहन करून, पूर्णत्वास नेलें. ह्याबद्दल मुख्यत्वें **गोपाळराव जोशी** हे सर्व लोकांच्या स्तुतीला पात्र आहेत. कारण, सौ० **आनंदीबाईं**ना येवढ्या योग्यतेस आणण्याला त्यांचे प्रिय भ्रतार

गोपाळराव जोशी हेच मूळ कारण असून, त्यांणीं हें अलौकिक व अद्वितीय कृत्य केलें यांत संशय नाहीं.

सौ० आनंदीबाई ह्या जात्या बुद्धिमती असल्यामुळें त्यांच्या भर्त्याचे त्यांच्या शिक्षणाविषयींचे एकंदर प्रयत्न पहिल्यापासूनच जसजसे सफल होत गेले तसतसा गोपाळरावजींस पत्नीकडून जास्त जास्त अभ्यास करविण्याचा विशेष उत्साह वाटूं लागला. गोपाळराव हे नौकरीच्या संबंधानें ठाण्याहून अलीबाग, कोल्हापूर, मुंबई, भुज, कलकत्ता वगैरे दूरदूरच्या ठिकाणीं फिरले; व त्या प्रत्येक ठिकाणीं त्यांची प्रियभार्या सौ० आनंदीबाई ह्या असून तेथें तेथें त्यांचा आपला अभ्यास गोपाळरावजींचे शिक्षणाखालीं अव्याहत चालला होता. मध्यंतरीं आनंदीबाईचीं तीन बाळंतपणें झालीं. परंतु त्यांतील एकही अपत्य वांचलें नाहीं. गोपाळरावजींचा आपले पत्नीला परदेशांत पाठवून डाक्तरी शिक्षण देवविण्याचा फार हेतु होता; व त्या हेतूची सिद्धता होईल तेव्हांच आपलें इच्छित पूर्णत्वास पावलें असें होईल, असें ते समजत होते. आणि, ह्यासाठीं ते सुमारें सात आठ वर्षांपासून ह्या संबंधानें आपली परदेशगमनाची कांहीं तरी सोय व्हावी ह्मणून प्रयत्न करीत होते.

शेवटीं, अमेरिकेंतील न्यूजर्सीपैकीं रोझेलनांवाच्या गांवीं असणाऱ्या एका मिसेस कार्पेंटर नांवाच्या बाईशीं गोपाळरावांचा पत्रव्यवहार सुरू होऊन, तिचें त्यांना पूर्ण मत मिळालें कीं, तुह्मीं आपल्या पत्नीसह अमेरिकेंत याः; आह्मी तुमचा यथाशक्ति सर्व प्रकारें समाचार घेऊं, व तुमचे इष्ट हेतु सफळ करण्यास मदत करूं. गोपाळरावांस पहिल्यापासून असें वाटत असे कीं, आपले हेतु सिद्धीस जाण्यास, मिळालें तर मिशनरी लोकांचें साह्य फार उपयोगी पडेल. परंतु, पुढें त्यांच्या मनाचा असा ग्रह झाला कीं, त्या लोकांच्या उपकारांत व त्यांच्या जाळ्यांत आपण आपल्याला अडकावून घेण्यांत विशेषसा अर्थ निष्पन्न व्हावयाचा नाहीं. उलट त्रास मात्र होईल. आपला धर्म, आपला देशाभिमान आणि आपलें स्वातंत्र्य हीं कायम राहून आपल्याला आपले हेतु सिद्धीस नेतां येतील, असा कांहीं योग्य मार्ग आपल्याला सांपडला पाहिजे. आणि, अशा प्रकारचा योग्य मार्ग वर लिहिलेल्या कार्पेंटर कुळाचे सदयतेनें व परोपकारानें गोपाळरावांस अचानक मिळाला. कार्पेंटरकुटुंबांतील मंडळी इतरधर्मभोळ्या

ख्रिस्ती लोकांसारखी हट्टी व दुराग्रही नसून, उलट, ती अत्यंत स्वतंत्र मताची होती.

मिसेस **कार्पेंटर** या थोर व उदारबाईच्या पत्रव्यवहारावरून **गोपाळराव**जींनीं आपल्या बायकोस अमेरिकेस पाठविण्याचा निश्चय केला. पहिल्यानें त्यांचा उभयतांचाही तिकडे जाण्याचा विचार होता. परंतु त्यांचे जवळ दोघांच्या प्रवासापुरता पैसा शिलक नसल्यामुळें त्यांणीं एकट्या **आनंदीबाईनाच** पाठविण्याचा निश्चय केला. व तो प्रियभर्त्याचा निश्चय त्या साध्वीनेंही मान्य केला. पहा ह्या **आनंदीबाई**च्या दृढ निश्चयाचें बल! पतीची आज्ञा मान्य करणें हेंच आपलें कर्तव्य व तेंच आपलें रक्षण असा **आनंदीबाई**नीं विचार केला. अमेरिकेस जाण्याची तयारी झाली.

ह्या परदेशप्रवासाला एक हिंदु ब्राह्मणी महाराष्ट्र स्त्री एकटीच जाणार आहे, अशी बंगाल्यांतल्या वर्तमान पत्रांत बातमी प्रसिद्ध होऊन लोक आश्चर्यचकित झाले, व तेव्हां लोकांचे अनेक संशय निघूं लागले. असें पाहून, आनंदीबाईनीं **श्रीरामपूर** येथील कॉलेजांत एके दिवशीं एक सुंदर इंग्रजी व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानांत त्यांणीं, आपण अमेरिकेस कां जातें? तीही एकटीच कां जातें? लोकापवादाची भीति आपण कां बाळगूं नये? आणि, मी जशी हिंदु ब्राह्मणी स्त्री म्हणून अमेरिकेस इतक्या दूर परदेशांत जात आहें तशीच मी परत **हिंदु ब्राह्मणी** स्त्री येणें संभाव्य आहे कीं नाहीं? इत्यादि मुद्यांच्या गोष्टींवर उत्तररूप उत्कृष्ट प्रतिपादन केलें. आनंदीबाईच्या त्या व्याख्यानावरून तेथें जमलेल्या युरोपियन व एतद्देशीय विद्वत्समाजास त्यांच्या विद्वत्तेचें, इंग्रजी भाषाज्ञानाचें व त्यांच्या निश्चयबलाचें मोठें कौतुक वाटलें. आणि हें सर्व केवळ त्यांच्या पतीच्या अखंड श्रमाचें फल आहे असें त्यांस समजून, ते **गोपाळराव**जींचा धन्यवाद गाऊं लागले. आणि, ही गोष्ट योग्यच होती. **गोपाळराव**जींनीं आपल्या पत्नीला स्वतः सर्व प्रकारचें शिक्षण देऊन त्यांची बुद्धि प्रगल्भ करण्यांत मनापासून फार श्रम घेतले यांत संशय नाहीं. या वेळीं ते **श्रीरामपुरास**च पोस्टमास्तर होते.

अमेरिकेस जाण्याची तर सर्व सिद्धता झाली. परंतु सोबतीला विश्वासाचें व ममतेचें कोणीच नव्हतें. तेव्हां केवळ स्वतःच्या धैर्यावर अवलंबून आणि परमेश्वराचे साह्यावर नजर देऊनच **आनंदीबाईं**ना आपला हा दीर्घ प्र-

वास करणें प्राप्त होतें. व त्याप्रमाणें, त्या आपल्या भर्त्याचे आज्ञेनुसार, एकाकी परदेशगमनास सिद्ध झाल्या. १८८३ च्या एप्रिल महिन्यांत **आनंदीबाई** ह्या **कलकत्त्याहून** पतीची आज्ञा घेऊन आगबोटीवर बसून निघाल्या. केवढें हें ह्या तरुण हिंदू ब्राह्मणीचें धैर्य व साहस! हिंदुस्थानच्या एकंदर पूर्वापर इतिहासांत असलें उदाहरण कधींही कोणास सांपडावयाचें नाहीं! **आनंदीबाई**च्या ह्या धैर्यास काय ह्मणावें! असलें हें धैर्य पाहून मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या पुरुषांनींही लज्जेनें आपल्या माना खालीं घालाव्या!

**आनंदीबाई**च्या प्रवासांतील त्यांचे हाल, त्यांच्या बरोबर असलेल्या ख्रिस्ती धर्मानुयायी अमेरिकन मडमांची त्यांशीं अत्यंत छळ करण्यासारखी निंद्य वागणूक, इत्यादि गोष्टींचीं वर्णनें येथें देण्यास सवड नाहीं. सुमारें ९९ दिवसांनीं त्या अमेरिकेस आपल्या इच्छित स्थलीं, **न्यूजर्सीपैकीं रोझेल** येथें, **कार्पेंटर**कुटुंबांत जाऊन पोंचल्या. तेथें त्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांनीं **आनंदीबाई**चें उत्तम प्रकारें व मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. व, आतां तुह्मांला कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटणार नाहीं असें त्यांस सांगितलें. **आनंदीबाईं**ना त्या परदेशांत तें **कार्पेंटर**कुटुंब आपल्या आप्तस्वकीयांपेक्षांही अधिकं आस्थेवाईक, अगत्याचें आणि विशेष प्रेम करणारें असें हळू हळू आढळून आलें. त्या कुटुंबांतील मुख्य बाई जी मिसेस **कार्पेंटर** तिला तर **आनंदीबाई मावशी** ह्या नांवानें हांक मारीत असत. आणि, खरोखर, मावशी जितकी आपल्या भाचीवर प्रेम व ममता ठेवते तिच्यापेक्षांही फार अधिक अशा प्रेमानें आणि ममतेनें, **आनंदीबाईं**चा सांभाळ त्यांच्या त्या मिसेस **कार्पेंटर मावशीनें**, त्या अमेरिकेंत असेपर्यंत केला. अशा परदेशीय स्त्रियांचे आपण जितके उपकार मानूं तितके थोडेच आहेत, यांत संशय नाहीं.

**आनंदीबाई** ह्या अमेरिकेस गेल्यावर लौकरच आपल्या पुढील विद्याव्यासंगास लागण्याचे तजविजीस लागल्या. ह्या वेळीं त्यांचे वयास नुकेंच अठरावें वर्ष लागलें होतें. त्यांनीं, **फिलाडेलफिया** येथील स्त्रियांचे वैद्यकीय पाठशाळेंत जाऊन शिकण्याची सर्व योजना केली; व त्याप्रमाणें हिंदुस्थानांत प्रिय भर्त्यास पत्रद्वारें सर्व वर्तमान कळविलें. **आनंदीबाईं**ची हुशारी आणि त्यांचें विद्याव्यसन बघून तेथील यूनिव्हर्सिटीनें त्यांस त्यांच्या निर्वाहापुरती एक स्कालर्शिप दिली. आणि त्यांचा तेथें उत्तम

प्रकारें अभ्यास चालण्यास कोणत्याही प्रकारची अडचण राहिली नाहीं. त्या पाठशाळेवरील सर्व गुरूपगुरु व मुख्याध्यापक मोठमोठ्या विद्वान् स्त्रिया आहेत; व त्या सर्व **आनंदीबाईं**वर अतिशय प्रेम करीत असत.

**आनंदीबाईं**चा साधा व मनमिळाऊ स्वभाव, त्यांची हुशारी, त्यांची अभ्यासाकडची एकाग्रता, त्यांचें नैरालस्य आणि त्यांचा अत्यंत अनुकरणीय देशाभिमान यांची, त्यांच्या सर्व अध्यापिकावर्गानें नेहमीं स्तुति व वाखाणणी करीत असावी. आणि, त्या स्तुतीला व वाखाणणीला **आनंदीबाई** ह्या सर्वथैव योग्यच होत्या. **आनंदीबाईं**च्या एकंदर मैत्रिणींनीं त्यांचा सर्व प्रकारें उत्तम रीतीनें समाचार घेऊन, त्यांस परदेशांत गेल्याबद्दलचा कोणत्याही तऱ्हेचा कमीपणा म्हणून वाटूं दिला नाहीं. मात्र, अशा ठिकाणीं आपल्या प्रिय पतीनें असायला पाहिजे होतें; असें त्यांस वाटून त्यांणीं, **गोपाळरावां**स अमेरिकेस निघून येण्याविषयीं लिहिलें. तेव्हां **गोपाळरावां**नींही आपली सवड व सोय बघून प्रिय पत्नीचे भेटीकरितां अमेरिकेस जाण्यासाठीं प्रस्थान ठेविलें.

**गोपाळराव ब्रह्मदेश**, सयाम, चीन, जपान, वगैरे एशिया खंडांतील पूर्वेकडील देश बघत बघत सानफ्रान्सिस्कोमधून अमेरिकेमध्यें प्रविष्ट झाले. त्यांणीं एकंदर सुमारें दीड वर्षपर्यंत हा प्रवास केला; व फार दिवस वियोगांत असलेल्या आपल्या अभ्यासमग्न पत्नीला भेटण्यासाठीं ते आपल्या **मावससासरीं** दाखल झाले. तों **आनंदीबाईं**चाही तीन वर्षांच्या मुदतीचा नियमित अभ्यास पूर्ण होऊन त्यांची डाक्तरीची शेवटची परीक्षा होण्याचे दिवस अगदीं जवळ आले होते.

**आनंदीबाईं**ची ही एम्. डी. म्हणजे डाक्टर ऑफ मेडिसिन (वैद्यशास्त्रपारंगत ) ची परीक्षा होती, व हीच शेवटची परीक्षा होती. ती त्यांणीं दिली व त्यांत त्यांस यश मिळालें. त्यांच्या पदवीदानाबद्दलची जी मोठी विद्वत्सभा भरली होती त्या सभेमध्यें **आनंदीबाईं**चे भर्त्ते रा. रा. **गोपाळराव जोशी**ही हजर होते. त्याचप्रमाणें इंग्लंडांतून प्रसिद्ध **पंडिता रमाबाई**ही मुद्दाम आपल्या ह्या देशभगिनीच्या सन्मानप्रेक्षणास हजर झाल्या होत्या. मोठ्या समारंभानें **फिलाडेलफिया**च्या यूनिव्हर्सिटी—चान्सेलरानें, **आनंदीबाईं**च्या विषयीं तेथें जमलेल्या लोकांस माहिती कळवून, त्यांच्या विद्वत्तेची फार फार प्रशंसा केली; आणि त्यांस एम्. डी. पदवी-

चा डिप्लोमा दिला. ह्याप्रमाणें, फार दिवसांचा हेतु पूर्ण होऊन **सौ० आनंदीबाई** ह्या **डाक्टर आनंदीबाई** झाल्या.


**सौ० आनंदीबाई** ह्या डाक्तरीच्या परीक्षेंत उतरल्याचें सुवर्त्तमान हिंदुस्थानांत प्रसिद्ध होतांच, इकडे, कोल्हापुरास, कै० बा० **आबासाहेब कागलकर** यांणीं स्त्रियांकरितां इस्पितळ बांधण्याचें ठरविलें होतें त्या इस्पितळावर डाक्तर **आनंदीबाईं**ची ३५० रुपये दरमहावर नेमणूक केली. ही नेमणूक पतकरून **डा० सौ० आनंदीबाई** ह्या आपल्या प्रियपतीसहवर्तमान हिंदुस्थानांत येण्यास निघाल्या. हिंदुस्थानाकडे येण्यास निघण्यापूर्वीं त्यांणीं अमेरिकेंत **गोपाळराव**जींच्या बरोबर कांहीं प्रवास केला. परंतु त्या प्रवासांत त्यांस शैत्याचा विकार झाला. तथापि तो कांहीं फारसा भयंकर रूपाचा नव्हता. **डा० आनंदीबाई** आगबोटींत बसून इंग्लंडमार्गानें इकडे येण्यास निघाल्या; वाटेंत त्यांची तब्यत शैत्यानें जास्त बिघडून, त्या हिंदुस्थानांत येऊन पोंचतात तों त्यांचेवर त्या रोगानें आपला बराच पगडा बसविला; आणि त्यांचें तें शैत्याचें दुखणें क्षयावर गेलें, असें त्यांस मुंबई येथें आल्यावर तेथील डाक्टरांकडून कळलें! त्या मुंबईस ता० १६ नोव्हेंबर सन १८८६ रोजीं आल्या.

तथापि, त्या निराश न होतां, आपली जन्मभूमी जें पुणेंशहर तेथें जाऊन, तेथील प्रसिद्ध धन्वंतरितुल्य वैद्य जे **बापू मेहेंदळे** त्यांचें औषध सेवन करून मी लौकर बरी होईन, असा विचार करून, ता० ९ डिसेंबर १८८६ रोजीं पुण्यास आल्या. परंतु त्या ज्या आशेनें पुण्यास आल्या ती आशा शेवटपर्यंत तृप्त झाली नाहीं. ह्मणजे, **बापू मेहेंदळे** यांणीं त्यांची प्रकृति सुद्धां पाहिली नाहीं. मोठमोठ्या लोकांनीं **मेहेंदळे** यांस भिडा घातल्या. परंतु त्या पुरुषास **आनंदीबाईं**ची चिकित्सा व रोगनिदान करण्याची सुबुद्धि झालीच नाहीं! दुसऱ्या अनेक वैद्यांचीं व डाक्टरांचीं औषधें वगैरे झालीं; परंतु त्यांपासून त्यांना यत्किंचित्‌ही गुण न येतां, अखेरीस त्यांचा, ज्या **माट्यां**चे घरीं त्यांचें जन्म झालें त्याच घरीं व त्याच बाळंतिणीचे जागीं, ता. २७ फेब्रुवारी १८८७ ह्मणजे फाल्गुन शुद्ध ४ रविवार, शके १८०८ रोजीं, पहाटे २ वाजतां, अंत झाला! आणि ह्या देशाची **डा० आनंदीबाईं**च्या संबंधानें जी मोठी उमेद व आशा होती तिचा ठिकाणच्या ठिकाणींच बींमोड झाला! त्यांच्या संबंधानें ह्या देशांतील सर्व पत्रकर्त्यांनीं आपलें अ-

त्यंत दुःखोद्गार काढून, ह्या देशाचे दुर्दैवास सर्वांनीं शाप दिले आहेत! **आनंदीबाई**सारखें **स्त्रीरत्न** निर्माण होण्यास आणखीं कित्येक शतकें लागतील असेंही कित्येकांचें ह्मणणें आहे, व तें कांहीं खोटें आहे असें ह्मणतां येत नाहीं. मरणकालीं **डा० आनंदीबाईंचें** वय अवघें २१ वर्षें आणि ११ महिन्यांचें होतें!

**डा० आनंदीबाईं**चा स्मशानविधि होण्यापूर्वीं, पुणें येथील फोटोग्राफर रा० रा० **गोविंदराव साठ्ये** यांणीं त्यांचा फोटोग्राफ काढून घेतला; आणि नंतर त्यांचा तो अत्यंत दुःखदायक स्मशानविधि झाला. **डा० आनंदीबाईं**च्या संबंधानें **बापू मेहेंदळे,** व त्याचप्रमाणें, त्या ज्यांच्या नौकर होऊन हिंदुस्थानांत परत आल्या तें कोल्हापूरचें दरबार, यांणीं, जी अत्यंत उदासीनता व बेपर्वाई दाखविली त्यासंबंधानें पुण्याच्या **ज्ञानचक्षूनें** फार चांगले व खरमारित लेख लिहिले आहेत व ते अगदीं योग्य होते. त्या सर्व लेखांवरून आमचे लोक एखाद्या वेळीं किती अनुदार होतात हें स्पष्ट कळण्यासारखें आहे!

असो. **डा० आनंदीबाईं**च्या सारखें स्त्रीरत्न आमच्यामध्यें निर्माण झालें ह्मणून जों आपल्याला मोठा आनंद होत होता तोंच आपल्या दुर्दैवानें आपल्याला हा अकस्मात् धक्का देऊन, तें रत्न आपलेपासून हिरावून नेलें; तथापि, आपण निराश न होतां, **डा० आनंदीबाईं**ची रिकामी पडलेली जागा भरून काढण्यास यत्नवान् असावें, हेंच आपलें कर्त्तव्य आहे. गेल्याचा शोक करीत बसून आपल्याला निरुत्साही होतां कामा नये.



म./ना ३०४

# मद्रास येथील राष्ट्रीय सभा.

परमेश्वरकृपेनें हिंदुस्थानांतील तिसरी राष्ट्रीय सभा मद्रास येथें सन १८८७ चे डिसेंबर महिन्याच्या अखेरीस मोठ्या थाटानें पार पडली. राष्ट्रीय सभा ह्मणजे काय ? हें आतां सर्वत्र सुप्रसिद्ध झालें आहे. या सभेचा दिवसानुदिवस उत्कर्ष होत जात आहे हें ऐकून कोण्या स्वदेशाभिमान्यास आनंद होणार नाहीं ! या सभेस सन १८८५ सालीं पहिल्या प्रथम मुंबई येथें सुरुवात झाली. मुंबई येथील सभेचें कामकाज मोठ्या औत्सुक्यानें उत्तम प्रकारें झालें तरी सभेचें पहिलेंच वर्ष असल्या कारणानें जशा थाटाची ती सभा भरावी तशी भरली नाहीं. सन १८८६ ची सभा कलकत्ता येथें भरली. ही दुसरे वर्षाची सभा कलकत्ता येथें भरावयाची अशी, ती भरण्याचे पूर्वीं बरेच दिवस लोकांमध्यें सुप्रसिद्ध असल्या कारणानें व आपले बंगालचे बांधव यांणीं या सभेच्या संबंधानें अत्यंत कळकळ दाखविल्यामुळें मुंबईच्या पहिल्या सभेपेक्षांही दुसरी सभा मोठ्या थाटाची झाली. मुंबईस लोकांनीं निवडलेले सर्व हिंदुस्थानांतील सभासद सुमारें पाउणशें जमले होते. त्यांची संख्या, दुसऱ्या वर्षीं कलकत्त्यास एकदम साडेचारशें झाली, यावरून लोकांच्या मनांत या राष्ट्रीयसभेविषयीं उत्कंठा एका वर्षांत किती प्रज्वलित झाली हें उत्तम प्रकारें दृष्टोत्पत्तीस आलें. कलकत्ता येथील सभेची हकीकत आतां सर्वांस अवगत झालीच आहे; तेव्हां त्याबद्दल या ठिकाणीं विशेष लिहिणें नको. परंतु या राष्ट्रीय सभेविषयीं उत्कंठा व कळकळ दाखविण्यांत मद्रास येथील बांधववर्गानें अगदीं कमाल करून सोडली हें नुकत्याच मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं पूर्णपणें दृष्टोत्पत्तीस आलें. मद्रास येथील राष्ट्रीय सभेबद्दलची हकीकत सारांशरूपानें देण्याचें आह्मीं आज मनांत आणिलें आहे, ही हकीकत आमच्या सर्व वाचकांस अत्यंत प्रिय होईल ही आमची खातरी आहे.

---

## या राष्ट्रीय सभेचें पूर्व स्वरूप.

मद्रास येथील राष्ट्रीय सभेस पूर्णपणें यथार्थत्व यावें याबद्दल तेथील प-

मुख गृहस्थांनीं ही सभा भरण्यापूर्वी बरेच दिवस जी अश्रांत मेहेनत केली ती अगदीं अद्वितीय होती यांत संशय नाहीं. मद्रास इलाख्यांतूनच-काय पण हिंदुस्थानांतील सर्व इलाख्यांतून या सभेस सभासद होऊन येण्याचे ते लोकनियुक्त असावे याकरितां मद्रास येथील महाजन सभेनें हिंदुस्थानांत चोहींकडे हजारों पत्रें पाठविलीं, व मद्रास इलाख्यांत चालू असलेल्या निरनिराळ्या भाषेमध्यें सुमारें तीस हजार प्रश्नोत्तर रूपाचीं लहान लहान पुस्तकें छापून काढून तीं प्रत्येक शहरांत, प्रांतांत, तालुक्यांत, खेडेगांवांत फुकट वाटलीं. या पुस्तकांत इंग्रजसरकारचें राज्य ह्मणजे काय, महाराज्ञी ही हिंदुस्थानची कोण आहे, राष्ट्र ह्मणजे काय, राष्ट्रीयसभा ह्मणजे काय, प्रत्येक मनुष्याचे हक्क ह्मणजे काय, ते आपल्या राज्यकर्त्यांपासून कशा रीतीनें संपादन करावे, एकी ह्मणजे काय, ती हिंदुस्थानांतील सर्व लोकांची कशी होईल, वगैरे अनेक गोष्टींबद्दल सोप्या भाषेनें ऊहापोह केला होता. महाजन सभेनें आपले सभासद जागोजाग पाठवून त्यांच्याकडून या राष्ट्रीय सभेबद्दल व्याख्यानें देवविलीं, जागोजाग सभा भरविल्या व त्या सभांकडून लोकनियुक्त सभासद राष्ट्रीय सभेस येतील अशी व्यवस्था करविली.

## राष्ट्रीय सभेचे द्वेष्टे.

ही राष्ट्रीय सभा सुरू झाल्यापासून कांहीं विघ्नसंतोषी इंग्रजांनीं व त्यांच्या पुढें शेंपूट हालविणाऱ्या एतद्देशीय मुसलमान लोकांनीं उत्तर हिंदुस्थानांत या सभेचे हेतु व रचना विकलित करण्याकरितां नानाप्रकारच्या खटपटी आरंभिल्या. यांनीं या सभेस मुसलमान वर्गाची संमति नाहीं सबब या सभेस राष्ट्रीय सभा असें ह्मणतां येत नसून ही हिंदूंची सभा आहे असें या सभेच्या संबंधानें आक्षेप आणिले. यांणीं गेल्यावर्षीं कलकत्ता येथें कांहीं 'आपके वास्ते जो हुकुम' मुसलमानांकडून ही सभा नको आहे व आपणास संमत नाहीं अशा प्रकारचीं पत्रें पाठविलीं. पण या लोकांची गेल्या सालीं कलकत्त्यास जी फजिती उडाली ती कांहीं पुसूंच नका. सभेपुढें पांच पंचवीस प्रमुख मुसलमान आले व त्यांणीं या खाविंदचरणारविंद मिलिंदायमान मुसलमानांचीं दुष्ट कारस्थानें पुढें आणिलीं व ही

खरी राष्ट्रीयसभा आहे, हिंदु व मुसलमान हे एक आहेत, त्यांचे हक्क सारखे आहेत व या सभेस हिंदुस्थानांतील सर्व मुसलमानांची संमति व सहाय्य आहे असें निर्भयपणें या सभेपुढें बोलून दाखविलें. गेल्या मद्रास येथील सभेंत तर या संबंधानें पूर्ण निकालच झाला. राष्ट्रीय सभेंत कोण कोण लोक निवडून पाठवावे हें ठरविण्याकरितां ज्या मद्रास इलाख्यांत सभा झाल्या त्यांचीं अध्यक्षस्थानें बऱ्याच सभां मधून मुसलमानांनींच काय पण युरोपिअन लोकांनींही स्वीकारिलीं व सभासदांमध्यें बरेच मुसलमान लोक निवडून पाठविले. मोठमोठे मुसलमान नबाब, राजेरजवाडे यांणीं या सभेकरितां मोठमोठ्या वर्गण्या भरल्या व ते प्रत्यक्ष सभेस हजर झाले. या सर्वांचा कळस हा झाला कीं, आपल्या मुंबई इलाख्यांतील पूर्ण देशाभिमानी व विद्वान-आनरेबल बद्रुद्दिन तय्यबजी बारिस्टर अॅट् लॉ यांणीं या सभेच्या अध्यक्षाचें काम मोठ्या आनंदानें पत्करलें व आपल्या प्राथमिक भाषणांत हिंदु व मुसलमान हे एक आहेत हें तर काय पण हिंदुस्थानांतील महाराणी साहेबांची सर्व प्रजा मग ते हिंदु असोत, मुसलमान असोत अगर हिंदुस्थानांत येऊन रहाणारे इंग्रज असोत सर्व एक आहेत व या सर्वांनीं आपलीं सुखंदुःखें एके ठिकाणीं जमून महाराज्ञीस कळवावीं व आपले योग्य हक्क योग्य रीतीनें आपण राज्यकर्त्यांपासून मागून घ्यावे हें प्रत्येक हिंदुस्थानवासी मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे, असें बोलून दाखविलें.

---

## राष्ट्रीय सभेस गेलेले सभासद व प्रेक्षक.

मद्रास येथें हजर असलेल्या सभासदांची संख्या सहाशांवर येऊन टेपली व हे सर्व लोकनियुक्त होते. हिंदुस्थानच्या उत्तर टोंकापासून ह्मणजे हिमालयापासून तो दक्षिण टोंकापर्यंत ह्मणजे कन्याकुमारीपर्यंत व पूर्व समुद्रापासून तो पश्चिम समुद्रापर्यंत सर्व प्रांतांतून, इलाख्यांतून, शहरांतून व तालुक्यांतून जागोजाग सभा भरून त्यांणीं निवडक असे सभासद पाठविले. पंजाब, लाहोर, कराची, उत्तर हिंदुस्थान, बंगाल, सिंध, मध्यप्रांत, मुंबई, पुणें, सातारा, सोलापूर, अहंमदनगर, बेळगांव, धारवाड, कारवार, सिरसी, सुरत, भडोच, अमदाबाद, काठेवाड व इतर गुजराथ प्रांत व मद्रास

इलाख्यापैकीं प्रत्येक शहरांतून, तालुक्यांतून व कांहीं मोठ्याशा खेडेगांवांतूनही सभासदांच्या झुंडी मद्रासेस लोटल्या. फार तर काय पण यदां एतद्देशीय संस्थानांतूनही या सभेस सभासद आले होते. या सभासदांमध्यें राजे, अमीर उमराव, जमीनदार, व्यापारी, बारिस्टर, वकील, वर्तमानपत्रकर्ते वगैरे मोठमोठे सन्माननीय विद्वान् गृहस्थ होते. बंगाल्यांत एतद्देशीय व युरोपियन यांचें नातें बऱ्याच प्रसंगीं तुच्छत्वाचें दिसतें, मुंबई इलाख्यांत हें नातें बेपर्वाईपणाचें दिसतें; पण चमत्कार हा आहे कीं, मद्रास इलाख्यांत तें जास्त निकटपणाचें दिसतें. मद्रास येथील एतद्देशीय व युरोपियन यांच्या या निकट संबंधामुळें मद्रास बंधूंनीं बंगाल व मुंबई यांवरही ताण करून दाखविली कीं त्यांणीं तेथील भारदस्त मनाच्या कांहीं युरोपियनांचीं मनें या राष्ट्रीय सभेकडे पूर्णपणें आकर्षण करून घेतलीं. तीं इतकीं कीं, या सभेंत कांहीं विद्वान् व उदार मनाची युरोपियन मंडळी ( डेलिगेट ) लोकनियुक्तसभासद होऊन आली, व त्यांणीं सभेच्या कामांत अत्यंत कळकळ दाखविली. लोकनियुक्त सभासदांखेरीज या सभेस सर्व हिंदुस्थानांतून प्रेक्षक मंडळी बरीच आली होती व ती तिऱ्हाईत रीतीनें सभासदांस मनोभावानें मदत करीत होती.'

## सभासदांचें आदरातिथ्य.

महाजन सभेनें राष्ट्रीय सभेचे हेतु मद्रास इलाख्यांतील रावापासून रंकापर्यंत कळविण्याची मेहेनत बहुतेक वर्षभर केली. त्याचें फल हें झालें कीं, ही सभा सुव्यवस्थितपणें पार पडण्याकरितां खेड्यापाड्यापासून तों मोठमोठ्या शहरापर्यंत राजेरजवाडे यांपासून तों कारागीर व शेतकरी यांपर्यंत सर्वांनीं या सभेचा खर्च उरकण्यास वर्गणीरूपानें द्रव्यद्वाराही मदत मोठ्या संतोषानें केली. शाळांतील मुलांनींही आपआपल्यांत वर्गणी करून महाजन सभेकडे पैसे पाठविले. सिंगापूर येथील व्यापाऱ्यांनीं न मागतां सभेच्या खर्चाकरितां रक्कम पाठविली. राजेरजवाडे, जमीनदार, सावकार, श्रीमान् गृहस्थ, गरीब शेतकरी, कारागीर व शाळेंतील मुलें या सर्वांनीं यथाशक्ति भराभर आंकडे भरले त्यांची रक्कम पंचवीस हजार रुपयांपर्यंत येऊन पोहोंचली! सभासद मद्रास इलाख्याच्या हद्दींत पोहों-

चतांच जागोजाग आगगाडीच्या स्टेशनांवर त्यांचें आदरातिथ्य करण्यास मंडळी तयार. ताडपत्री स्टेशनावर गाडीस संध्याकाळ होते; त्या ठिकाणीं तेथील प्रमुख मंडळींनीं गाडी अर्धा तास थांबते त्या वेळांत स्टेशनाच्या बाहेर, गाडींत असलेल्या सर्व सभासदांस मोठ्या आदरानें बोलावून त्यांच्या फराळाची उत्तम व्यवस्था ठेविली, व पुन्हा सभासद गाडींत बसल्यावर गाडी निघण्याचे वेळीं त्यांनीं जो आनंद प्रदर्शित केला त्याची आठवण ज्या पर इलाख्याच्या सभासदांस होईल, त्यांस या मद्रासबांधवांच्या प्रेमाबद्दल व कळकळीबद्दल अत्यंत समाधान वाटल्याखेरीज कधींही राहणार नाहीं. सभासद मद्रासेस पोहोंचल्याबरोबर त्यांस राहण्याकरितां मोठमोठाले तीन बंगले घेतले होते. एका बंगल्यांत मुंबई इलाख्यांतील सभासद यांची, दुसऱ्यांत बंगाल्यांतील व इतर इलाख्यांतील सभासदांची व तिसऱ्यांत मुसलमान बंधूंची सोय केली होती. प्रत्येक सभासदास निजण्याकरितां पलंग, एक एक टेबल खुर्ची व लिहिण्याचीं सर्व साधनें, सकाळ संध्याकाळ चहा काफी, उत्तम साधें भोजन, स्नानास ऊन पाणी, सुधारलेल्या बंगाली व इतर लोकांकरितां हाटेलच्या सोई, सभेच्या कामास जाण्या येण्याकरितां रोजच्या ठरविलेल्या दीडशें घोड्यांच्या गाड्या, प्रकाशाकरितां प्रत्येक बंगल्याभोंवतीं विजेचे दिवे, वगैरे जी उत्तम प्रकारची व्यवस्था मद्रासबंधूंनीं ठेविली होती, त्याचें वर्णन कोठवर करावें! सभासदांच्या आदरातिथ्याकरितां प्रत्यक्ष ग्राजुएट तयार असत. सारांश मद्रास बांधवांना आपले प्रत्यक्ष जांवई कमी पण राष्ट्रीय सभेचे सभासद जास्त असें कांहीं झालें होतें.

---

## राष्ट्रीय सभा.

ही या गेल्या डिसेंबर महिन्यांत तारीख २७, २८, २९ व ३० या रोजीं चार दिवस भरली होती. म्याकेचा बाग ह्मणून मद्रास शहरापासून सुमारें दोन कोसांवर एक विस्तीर्ण स्थान आहे त्या ठिकाणीं एक भला मोठा मंडप उभारला होता. या ठिकाणीं ही प्रचंड सभा भरली होती. या मंडपाला पांढरें शुभ्र छत देऊन चोहींकडे झालरी व कृत्रिम पुष्पगुच्छ सोडले होते. सभेच्या खांबांना केळींचीं तोरणें लाविलीं

होतीं. सभासदांस बसण्याची जागा चोहोंकडून दोऱ्यांनीं वेष्टित करून त्याच्या बाहेर प्रेक्षक जनांस बसण्याकरितां जागा केल्या होत्या. मंडपाच्या मध्यभागीं उंच जागा करून त्या जागेंत एक मोठें टेबल ठेविलें होतें. मध्यभागीं सभेचे अध्यक्ष व त्यांच्या दोहों बाजूंस राजेरजवाडे व मोठमोठे प्रसिद्ध मद्रासचे राजा सर. टी. माधवरावांसारखे विद्वान् व अनुभविक गृहस्थ यांकरितां खुर्च्या मांडल्या होत्या. अध्यक्ष साहेबांच्या मागल्या बाजूस पण सभासद बसण्याच्या सीमेच्या बाहेर उच्चस्थानावरच इतर साहेब, मडमा, सरकारी कामगार वगैरे मंडळीस बसण्याची सोय केली होती. सभासदांच्या आवारांत एक दालन मुंबई इलाख्याकरितां, दुसरें मद्रास इलाख्याकरितां, अध्यक्षाच्या समोरचें दालन बंगाल्याकरितां व त्याच्या पलीकडील इतर इलाख्यांकरितां अशीं निरनिराळीं दालनें केलीं होतीं, व प्रत्येक दालनांत ज्या त्या इलाख्यांतील सभासद व्यवस्थित रीतीनें बसत असत. अध्यक्षाच्या समोर खालचे बाजूस एक लांब टेबल ठेविलें होतें. त्या सभोंवतीं वर्तमानपत्रांचे रिपोर्टर सुमारें वीस असामी बसत असत. प्रत्येक सभासदास एक एक रेशमाचें फूल आपल्या आंगरख्यांत खोंवण्याकरितां दिलें होतें, यामुळें सभासद कोण व इतर प्रेक्षक कोण हें तावडतोब समजत असे. अशा थाटानें तारीख २७ रोजीं संध्याकाळीं तीन वाजतां सभेस आरंभ झाला. मंडपांत सभासद व इतर प्रेक्षक मिळून सुमारें दोन हजार मंडळी जमली होती. या प्रचंड हिंदुस्थान देशामधला, निरनिराळ्या प्रदेशांतील, प्रांतांतील, शहरांतील, गांवांतील, निरनिराळ्या जातीचा, वर्णाचा, धर्माचा, रीतरिवाजाचा, पेहेरावाचा, भिन्न प्रकारचा, जनसमूह एक समयावच्छेदेंकरून एके ठिकाणीं जमून उत्कंठित मनानें त्या शहाणपणाचा व दूरदर्शित्वाचा बाणा मिरविणाऱ्या राजा सर. टी. माधवरावाच्या तोंडचें प्राथमिक स्वागताचें भाषण ऐकत होता. त्या वेळचा देखावा काय वर्णावा ! तीं मुंबई इलाख्यांतील चित्रविचित्र रंगाचीं पागोटीं व पगड्या, आपला हिंदुपणा कायम ठेवण्याच्या हेतूनें बूट स्टाकिंग पाटलूनविरहित ते त्यांचे साधे पोषाक, व अंगावरील उपरणीं, त्या सिंधेमधील उभ्या टोप्या, त्याचप्रमाणें अद्याप कडकडीत धर्म पालन करणाऱ्या मद्रास बांधवांचे ते पांढरे फेक डोकीचे रुमाल, स्वच्छ धुवट साध्या तऱ्हेचे आंगरखे, धोतरें व उपरणीं,

कपाळीं रेखलेलीं काळ्या चेहेऱ्यावर शोभणारीं गंधें व तें त्रिपुंड्र, युरोपिअन–आचार–प्रिय त्या बंगाली लोकांचे ते फयाशनेबल कृष्णवर्णाचे पोषाख, त्यांचीं तीं उघडीं बोडकीं सकेशमस्तकें, त्यांचीं तीं बोलकीं पण तरतरीरहित कृष्णवदनें, महाराज रणजितसिंगाच्या राज्यांत वाढलेले शूर पुरुषांचे सदृढ वंशज जे पंजाबी, त्यांचे ते ऐटबाज पोषाख या सर्वांचें उत्तम चित्र वठविण्याची कोणाची प्राज्ञा लागून गेली आहे? पहिल्या दिवशीं बद्रुद्दिन तय्यबजी यांची अध्यक्षस्थानीं नेमणूक झाल्यावर त्यांनीं आपल्या स्थानीं विराजमान होऊन आपलें पहिलें भाषण केलें. हें भाषण मोठ्या खुबीचें, शहाणपणाचें, दूरदर्शित्वाचें व पूर्ण देशाभिमानाचें होतें. या भाषणांत त्यांनीं असें सांगितलें कीं, हिंदु व मुसलमान हे एक आहेत. या सभेस सर्व हिंदुस्थानवासी प्रजेचीच काय पण इंग्रज लोकांचीही मदत होत गेली पाहिजे. सभेचीं सर्व कामें व्यवस्थितपणें व शांतपणें चालल्यास या सभेपासून अनंत फायदे होतील. इंग्रजांचे राज्यापासून हिंदुस्थानास फार फायदे झाले आहेत, इंग्रज हिंदुस्थानांतून खोऱ्यावारी पैसा ओढून नतात अशी जरी रड आहे तरी ते आपल्यास त्याचे बदला उत्तम राज्यव्यवस्थेंत तरबेज करीत आहेत हा आपल्याला मोठा फायदा आहे. शेवटीं सभेनें आपणास अध्यक्षाची जागा दिली हा त्यांणीं आपणास फार मोठा मान दिला आहे असें सांगून त्या दिवशींची सभा बरखास्त केली. दुसरें दिवशीं बारा वाजतां सभा भरली. सभेचा पहिला ठराव राष्ट्रीय सभेच्या रचनेबद्दल होता. याबद्दल नियम करण्याकरितां कांहीं सभासदांची एक कमिटी नेमली व तिणें नियम ठरवून ते सभेपुढें शेवटल्या दिवशीं हजर करावे असें ठरलें. सभेचा दुसरा ठराव अत्यंत महत्वाचा होता. हा ठराव हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलांत कांहीं सभासद लोकनियुक्त असावे अशाबद्दल होता. या ठरावाची सूचना बंगाल्यांतील प्रसिद्ध वक्ते सुरेंद्रनाथ बानरजी यांणीं केली. या प्रसंगीं या बाबूंचें भाषण अत्यंत मनोवेधक होतें. या भाषणानें सर्व सभा थक्क होऊन गेली. वक्तृत्वामध्यें बंगाली लोक हे सर्वतोपरी अग्रगण्य आहेत यांत संशय नाहीं. हा गुण मुंबई इलाख्यांत नाहीं व मद्रास इलाख्यांतही नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे. परंतु मुंबई व मद्रास येथील लोकांत फार भपका न करितां पतकरलेलीं कामें दूरवर वि-

चार करून धिमेपणानें देशाभिमानास हरताळ न लावितां पार पाडण्याची जी हातोटी आहे ती बंगाली लोकांत नाहीं. बंगाल्यांत साधारण कामांतही मत-भेद दृष्टीस पडतो याचें उदाहरण त्यांच्यामध्यें पूर्ण दृष्टीस पडतें. प्रत्येक प्रमुखास मी मोठा व माझें मत वजनदार असें वाटत असतें व तें स्थापन करण्यास वेळेस भांडणापर्यंतही मजल येऊन ठेपते. मुंबई व मद्रास येथील वक्तृत्वाची उणीव पुढल्या वर्षी अलाहाबादच्या राष्ट्रीय सभेंत नाहींशी होईल, अशी फार आशा आहे. असो. या कायदे कौन्सिलाबद्दलच्या ठरावाबद्दल मद्रास येथील प्रसिद्ध तरुण बारिस्टर नार्टन साहेब यांचें फार महत्वाचें व जोरदार भाषण झालें. हे भाषणास उभे राहिल्यापासून त्यांचें भाषण संपेपर्यंत योग्य प्रसंगीं टाळ्यांचा एक सारखा गजर चालला होता व आपलें भाषण सर्वांस रुचतें याबद्दल या साहेबांसही फार धन्यता वाटत होती. यांचें सर्व भाषण सरळ, कपटरहित मोक्या विद्वत्तेचें व उत्सुकतेचें होतें. यांचें भाषण वर्तमान पत्रांत साद्यंत आलें आहे, तें प्रत्येक स्वदेशाभिमान्यानें एक वेळ तरी वाचून पहावेंच. या भाषणाचा सारांश या छोट्याशा निबंधांत देणें अशक्य आहे पण त्यांतील थोडासा मासला*

---

* "With the enthusiastic welcome still ringing in his ears, he was enabled to face the vast assembly present in a spirit of glad exaltation for,in the first place,he tasted something of that which would make their relations in future more harmonious than they were at present (cheers). Not unfrequently the reproach had been cast in their teeth that an irreconcilable gulf, which could not be bridged over existed between the European and the Native——a reproach that the objects of the Congress were confined to the native classes. He asked to be permitted to refute such a reproach as a base falsehood. He was not a self-elected delegate. He had been sent there, unsolicited, to place before the congress the views which his constituents, however humble, desired him to express on their behalf. He felt honestly and assuredey, that there were thousand of Englishmen whose voices were tied in consequence of their being in the Government service, yet who were animated by sentiments of the kindest sympathy with the

खालीं टिपेंत इंग्रजींत आमच्या वाचकांकरितां दिला आहे, त्यावरून सर्व भाषण कशा थाटाचें झालें याचें अनुमान त्यांस करितां येईल. सभेचा तिसरा ठराव, न्याय करण्याचें व त्याचा अंमल बजाविण्याचें हीं दोन्ही कामें हल्लीं एकाच कामगाराकडे असतात तीं निरनिराळ्या कामगारांकडे सोंपवावीं हा होय. या ठरावाच्यासंबंधानें कालिचरण बानरजी यांचें भाषण मोठें जोरदार झालें व सर्वानुमतें हा ठराव पसंत ठरला. सभेच्या तिसऱ्या दिवशीं ह्मणजे तारीख २९ रोजीं चार ठराव पसंत झाले, त्यांपैकीं पहिला ठराव हिंदुस्थानांतील लोकांचा लष्करी खात्यांतील मोठे अम्मलदारलोकांमध्यें शिरकाव व्हावा व सर्व लोकांस लष्करी ज्ञान प्राप्त होण्याकरितां लष्करी विद्या ज्यांत शिकविली जाईल अशीं विद्यालयें स्थापन करावीं. दुसरा ठराव, व्हॉलेंटियर कोर (ह्मणजे आपखुषीनें लष्करी काम करण्यास तयार असलेल्या लोकांच्या पलटणी) सरकारानें तयार करण्याबद्दल, होता. तिसरा ठराव, इन्कम्‌टॅक्साबद्दल गरीब लोकांचे सोईकरितां हल्लीं जी ५०० रुपये उत्पन्नापर्यंतची माफी आहे ती एक हजारापर्यंत करावी, व यामुळें उत्पन्नांत तूट आल्यास आयात मालावर कर बसवावा, अशा प्रकारचा होता. या दिवशींचा शेवटचा ठराव हिंदुस्थानांतील लोक गरीब होत चालले आहेत, तेव्हां सरकारानें कलाकौशल्याचें व यांत्रिक शिक्षण सर्व लोकांस देण्याचें सुरू करावें वगैरेबद्दल होता. हे सर्व ठराव वादविवाद होऊन सर्वानुमतें कायम झाले. तारीख ३० ह्मणजे सभेच्या चवथ्या दिवशीं चार ठराव झाले. यांपैकीं पहिल्या ठरावाचे वेळीं जो वादविवाद झाला तो फार महत्वाचा होता. ठराव हत्यारांचा कायदा रद्द कर-

---

Congress .(Cheers ).Of all the resolutions to be laid before the Congress, there was none so important as that which concerned the reconstitution of the Legislative Councils. That was the keystone of all fnture progress and liberty. ( Cheers ). He had been thrust unwillingly into new capacity. Only th:: previous evening he had assumed a new character. He has been told that, he had laid himself open to being called, and, in fact, he was called a seditionist. If it were sedition to resist tyranny and such like things, then he would be glad to be called a seditionist. "

ण्याबद्दलचा होता. या ठरावावर बंगाल्यांतील एका गृहस्थानें असा आक्षेप आणिला कीं सर्व हत्यारांचा कायदा रद्द करून मागितला असतां तसें सरकार कबूल करणार नाहीं,सबब त्या कायद्यामध्यें परवाने देण्याबद्दल कलमें आहेत त्यांमध्यें दुरुस्ती करून मागावी.ती अशी कीं,हत्यारें वापरण्याचे परवाने देण्याचें काम लोकल बोर्ड व म्युनिसिपालिटी यांजकडे ठवावें. दुसऱ्या एका गृहस्थानें असें सुचविलें कीं, युरोपियन लोकांना परवाने लागत नाहींत, पण एतद्देशीय लोकांना लागतात हाच काय तो या कायद्यांत जाचणारा भाग आहे तो नाहींसा करावा. ग्लाडस्टन साहेबांना विलायतेंत भेटलेले व ब्राईट साहेबांच्या हातांत हात घातलेले मुंबईचे विद्वान् चंदावरकर यांणीं सर्व सभासदांस असें कळविलें कीं, कोणच्याही ठरावाचा सभासदांनीं विचार करणें तो व्यावहारिक रीतीनें राजकीय विचार करणारे आपण आहोंत अशा नात्यानें करावा, शाळेंतल्या विद्यार्थ्यांप्रमाणें करूं नये. मूळ ठरावावर सूचना आली ती सभासद मान्य न करितील तर सर्व सभासद शाळेंतील मुलें आहेत असें होणार आहे. यांच्या या भाषणानें सर्व सभासदांचीं मनें अत्यंत अस्वस्थ झालीं व चोहोंकडून या वक्त्यावर रागाचे उद्गार निघूं लागले. एकंदरींत या विद्वानांचे हे चार शब्द सर्व सभासदांस अत्यंत अप्रासंगिक असे वाटून सर्व सभा खवळून गेल्यासारखी दिसूं लागली. यांचें भाषण संपण्याबरोबर बंगालचे प्रसिद्ध वक्ते सुरेंद्रनाथ हे पुढें झाले व त्यांनीं आपल्या वक्तृत्वास आरंभ केला. अध्यक्षासमोर येऊन उभे रहातांच या वक्त्यांचें पहिलें वाक्य " मी या सभेपुढें चंदावरकरांच्या शाळेंतील विद्यार्थी या नात्यानें बोलण्यास उभा रहात आहें. " या प्रसंगाचा या विद्वान् वक्त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ अद्वितीय होता. हे म्हणाले कीं सुदैवानें इंग्रज लोकांस हत्यारें वापरण्याबद्दल परवान्याची जरूर नाहीं असें असतां अशा परवान्याची एतद्देशीयांस जरूर लागते, म्हणून इंग्रज लोकांसही जरूर पाडण्यास लावावी असें ह्मणणें किती शहाणपणाचें होईल ! जे आपल्यापेक्षां वर चढले आहेत त्यांच्याबरोबर जाऊन पोहोंचण्याची आपण इच्छा करावी कीं त्यांस आपल्याबरोबर खालच्या पायरीवर आणून ठेवण्याचे इलाज करावे ? हत्यारांचा कायदा हा इंग्रजांच्या कायदेग्रंथांत एक काळा डाग आहे, तो नाहींसा करून टाकलाच पाहिजे, असें प्रतिपादन करणारे विलायतेंतील

मा.का. ३०७ (२१)

प्रसिद्ध राजकार्यधुरंधर ग्लाडस्टन यांना एक शाळेंतील मुलगा जसें ह्मणावें काय? हत्यारांचा कायदा रद्द करावा अशी आज किती वर्षे लोकांची ओरड आहे, तरी सरकार तो बंद करीत नाहीं ह्मणून तो तसाच ठेवावा असें आपण त्यास ह्मणावें काय?" अहाहा! या बाबूंनीं या वेळीं आपल्या अलौलिक वक्तृत्वानें सर्व समाज आपल्याकडे झरदिशीं वळवून घेतला! युरोपिअन लोकांना विलायतेंतील हौस आफ् कॉमन्सची आठवण झाली. सर्व समाजांतून हा कायदा रद्द झालाच पाहिजे असे उद्गार निघूं लागले. शेवटीं अध्यक्षानीं पांच मिनिटें फुरसत दिल्यावर सर्व सूचना करणारे व अनुमोदन देणारे यांच्या सल्लचानें सर्व सभेस पसंत पडेल असा ठराव तयार करण्याबद्दल सभेची परवानगी मागितली ती सर्व सभेनें आनंदानें दिली. अखेरीस हत्यारांच्या कायद्याचा जो भाग हत्यारें वापरण्याच्या संबंधानें विरुद्ध होता तो रद्द करण्याविषयीं सरकारास विनंती करावी. अशा प्रकारचा सर्व सभासदांस अनुकूल असा ठराव होऊन तो सर्वानुमतें पसंत ठरला. यानंतर इतर किरकोळ ठराव या दिवशीं होऊन अध्यक्षांचें शेवटलें भाषण झाल्यानंतर ही प्रसिद्ध राष्ट्रीय सभा बरखास्त झाली.

मराठी ग्रंथ संग्रह

---

## सभासदांनीं केलेलीं कामें.

राष्ट्रीय सभेंतील सभासदांनीं ह्या सभेचें काम व्यवस्थित चालावें याबद्दल आपापले परी पुष्कळ मेहेनत केली. या सभेस सभासद होऊन जाण्याचें ह्मणजे केवळ मौजेखातर जाण्याचें असा सभासदांपैकीं एकाचाही समज नव्हता. आपल्या हातून यत्किंचित् तरी देशसेवा घडावी हा हेतु मनांत बाळगून प्रत्येक साभसद सभेस गेला होता. या सभेस एकंदर सातशें शहात्तर सभासद होते, ते आपल्या खर्चानें मद्रास येथें गेले. ठोकळ मानानें प्रत्येक सभासदास जाण्यायेण्याचा खर्च शंभर रुपये झाला असें धरलें तर, एकंदर पंचाहत्तर हजार रुपये होतात, ते व मद्रास येथील लोकांनीं या सभासदांच्या आदरातिथ्याकरितां खर्चलेले पंचवीस हजार रुपये मिळून अदमासें एक लाख रुपये तरी या राष्ट्रीय सभेप्रीत्यर्थ खर्च झाले असतील यांत संशय नाहीं. ही एवढी रक्कम के-

वळ मौजेकरितां लोक खर्च करतील हें ह्मणणें कधींही शोभणार नाहीं मुंबई इलाख्यांतून सुमारें सत्याण्णव सभासद गेले होते. त्यांनीं मोठ्या सभेंत होणाऱ्या ठरावांबद्दल आपल्यांत सभा भरवून प्रत्येक ठरावाबद्दल वाटाघाट केली व कांहीं ठरावाच्या संबंधानें नवीन सूचना लिहून काढल्या. त्यांपैकीं एक दोन सूचना सभेस मान्य झाल्या व बाकींच्याबद्दल सभेला वेळ कमी म्हणून पुढील सभेंत त्यांचा विचार करण्याचें अध्यक्ष साहेबांनीं ठरविलें तें मुंबईकरांनीं मान्य केलें.ही मुंबईकरांनीं खटपट केली ह्मणून प्रत्येक ठरावाच्या वेळीं त्या ठरावावर वादविवाद झाले. राष्ट्रीय सभा ह्मणजे वक्तृत्वसमारंभ नव्हे. अमका चांगलें बोलला व अमका वाईट बोलला अगर तमका मुळींच बोलला नाहीं यामुळें त्याची फजिती झाली. हें ठरवून घेण्याकरितां सभासदांनीं सभेस जावयाचें असें नाहीं. देशहिताविषयीं मनांत खरी कळकळ बाळगून सरकाराजवळ योग्य प्रकारें सर्वांनीं एके ठिकाणीं जमून आपले हक्क मागून घेणें अगर ते आपणास द्यावे अशी सरकारापाशीं पुन्हां पुन्हां ते हक्क मिळेपर्यंत विनंति करणें, हें प्रत्येक सभासदानें पूर्ण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. सभासदांचें दुसरें कर्तव्य हें आहे कीं, या राष्ट्रीय सभेबद्दलची माहिती त्यांणीं अडाणी शेतकऱ्यापर्यंतही नेऊन भिडविली पाहिजे.याचें एक उदाहरण या सालीं मद्रास इलाख्यांत घडलें. एका देशहितचिंतकानें चाळीस पन्नास अडाणी शेतकरी एके ठिकाणीं गोळा करून मद्रासेस राष्ट्रीय सभेस चालविले. एका इंग्रज कामगारानें त्या गृहस्थाला हीं गरिबें कोठें घेऊन चाललांत ह्मणून विचारिलें. गृहस्थानें सांगितलें कीं,साहेब यांना मद्रास येथें राष्ट्रीय सभेला नेतों. साहेब ह्मणाले या गरिबांना राष्ट्रीय सभा ह्मणजे काय हें समजलें असल्यास हा हिंदुस्थानाला मोठा सुदिन उगवला असेंच ह्मटलें पाहिजे.आम्ही असेंच ह्मणतों कीं,हिंदुस्थानांतील सर्व आबालवृद्धांना श्रीमंत गरिबांना या सभेचे खरे हेतु ज्या दिवशीं कळूं लागतील तोच दिवस सुदिन. सर्व सुशिक्षित लोकांनीं या कामीं निरपेक्ष बुद्धीनें व खऱ्या कळकळीनें प्रयत्न केले असतां काय होणार नाहीं ! असा हा सुदिन अगदीं जवळ येऊन ठेपेल. असो, मद्रास बांधवांनीं सर्व सभासदांचा अत्यादरें अति उत्तम पाहुणचार केला, सबब त्यांचे आभार मानण्याकरितां मुंबईकरांनीं मद्रास येथील आगतस्वागत करण्याकरितां नेमिलेल्या मंडळीस एक मेजवानी दिली.व त्या वेळीं त्यांणीं

केलेल्या उत्तम व्यवस्थेबद्दल सर्व प्रकारची माहिती करून घेतली.

## सरकारानें व लोकांनीं सभेस दिलेला मान.

सभा सुरू असतां सभेच्या सभासदांना नार्टन साहेबांनीं एके रात्रीं मोठी जंगी मेजवानी दिली. साहेबांनीं आपल्या भव्य बंगल्या समोर मोठा मंडप उभारला होता व मोठा दीपोत्साह केला होता. मंडपांत तंजावर येथील देवदासींचा नाच उभा केला होता. त्या नाना प्रकारचे गोफ विणीत, नाचत व गायन करीत. साहेबांनीं सभासदांचें स्वागताकरितां उत्तम भाषण केलें. त्याला सभेच्या अध्यक्षानीं समर्पक उत्तर दिलें. या तरुण विद्वान् साहेबांच्या कळकळीबद्दल व प्रेमाबद्दल जितकें लिहावें तितकें थोडेंच. यांनीं या प्रसंगीं दाखविलेलें प्रेम सतत कायम राहिलें तर हे साहेब, एतद्देशीयांना एक मोठी देणगीच लाधली असें ह्मटलें पाहिजे.

मद्रास येथील वृद्ध गव्हरनर याणीं या सभेचा मोठा बहुमान केला. सभासदांना उपवनविहाराला बोलावून प्रत्येकाशीं शेकहॅन्ड केला व प्रत्येक सभासदाला कुशलप्रश्न विचारिले, त्यांचे करितां फलादि उपहाराची तजवीज ठेविली, व त्यांना सरकारी थोरला दिवाणखाना पहाण्यास जाण्याविषयीं सुचविलें.

मद्रास येथील सुशिक्षित मंडळींनीं कॉसमापॉलिटन क्लब ह्मणून एक मोठा समाज स्थापन केला आहे. या समाजाचे पुरस्कर्ते मद्रास येथील मोठमोठे श्रीमान् व विद्वान् गृहस्थ असून बडे साहेब लोकही या मंडळींत सभासद आहेत. या क्लबाकरितां मोठा एक बंगला विकत घेतला आहे. या बंगल्याभोंवतीं ऐसपैस मोठें पटांगण आहे; त्यामध्यें मंडळीनीं मोठा थोरला बाग केला आहे व नानाप्रकारचे खेळ खेळण्याकरितां मोठमोठे चौक केले आहेत. प्रत्यक्ष बंगल्यांत एक मोठें वाचनगृह आहे, त्या ठिकाणीं टेबलावर वर्तमानपत्राच्या चळतीच्या चळती पडलेल्या असतात. या बंगल्यास एक मोठी विस्तीर्ण गच्ची आहे. राष्ट्रीय सभेच्या सभासदांस या क्लबच्या मंडळींनीं एक बडी मेजवानी दिली. या मेजवानीच्या समारंभाची वेळ रात्रीच्या सात वाजल्यापासून दहा वाजे पर्यंत होती. या ठिकाणीं त्या रात्रीं विद्युद्दीप–प्रकाशित–सौधातलावर

खुर्च्या मांडल्या होत्या. त्यांवर शेंकडों सभासद व मद्रासचे प्रमुख गृहस्थ थंड गार हवा खात परस्परांना कुशल प्रश्न विचारीत मौजेमध्यें अधिष्ठित जहाले होते. नंतर फलादिकांचा उपहार झाल्यानंतर सभासद आपल्या ठिकाणीं परत आले. हे सर्व मद्रासबांधवांचे आदरातिथ्याचे प्रसंग सभासदांनीं जन्मवेरी ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत.

## राष्ट्रीय सभा व सरकार.

गतवर्षी हिंदुस्थानचे व्हाइसरॉय साहेब यांणीं एके प्रसंगीं असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणें दहा वर्षांनीं अगदीं कठीण होऊन जाणार आहे. या त्यांच्या ह्मणण्यांत बराच तथ्यांश नाहीं असें नाहीं. हिंदुस्थानच्या २१ कोट प्रजेचीं सुखदुःखें लक्ष्यांत आणून सर्व व्यवस्था करण्याची आहे. आज या हिंदुस्थानावर इतके राजे होऊन गेले पण सर्व देशाचें एकछत्री राज्य असें इंग्रज लोकांनींच चालविलें, ही गोष्ट कोणाच्यानें खोटी म्हणवणार आहे? परंतु इंग्रजांच्याच कृपेनें जसजसा विद्येचा फैलाव देशभर जास्त वाढत जाणार, सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या युरोप व अमेरिका यांजमधील राजकीय विद्येचें शिक्षण जसजसें लोकांच्या मनांत बिंबत जाणार, प्रत्येक व्यक्तीचीं कर्तव्यकर्मे, त्यांचे हक्क, त्यांच्या सुधारणा, ह्या गोष्टी प्रत्येकास जसजशा जास्त कळत जाणार तसतसें, या सर्व गोष्टींपासून हिंदुस्थानच्या प्रजेला आपण विन्मुख करूं असें जर सरकार ह्मणेल तर, तें कधींही चालणार नाहीं. एवढ्या मोठ्या देशाचा राज्यकारभार उत्तम प्रकारें चालविण्यास त्या राज्यकारभारामध्यें लोकांना घेतलेंच पाहिजे. यंदांच्या राष्ट्रीय सभेंत, हिंदुस्थानावर परचक्र आलें असतां प्रत्येक डोक्यामागें एक आणा कर गोळा करून सरकारच्या खजिन्याची भर करण्यास आपण तयार आहोंत असें ह्मणणारे कृतज्ञ लोक महाराज्ञीच्या राज्यांतले आहेत, हें पाहून परकीय राष्ट्रांनीं तोंडांत बोटेंच घातलीं असतील. जसा रयतेचा महाराज्ञीवर सर्वतोपरी भरंवसा आहे तसाच महाराज्ञीनें हिंदुस्थानवासी लोकांवर ठेविला पाहिजे, ह्मणजे या हिंदुस्थानाला कधींच वाईट दिवस येणार नाहींत.

# भाऊबंदांत कलह उत्पन्न होऊन, विभक्तपणा होतो त्याचीं कारणें काय? आणि त्या कारणांच्या निवारणाचे उपाय कोणते? *

हा विषय सामाजिक असून, अंशतः त्याला राजकीय संबंधाचेंही स्वरूप प्राप्त होतें. तें कसें, हें आह्मीं पुढें योग्य स्थळीं दाखविलें आहे.

हा विषय लोकोपयुक्त व सर्वांनीं विचार करण्यासारखा आहे. तो सर्वांनीं वाचावा, व सर्वांस कळावा; ह्मणून आह्मी तो लांबट न करितां-होतां होईल तितका थोडक्यामध्यें आणण्याचा यत्न केला आहे. त्याचप्रमाणें, त्याची भाषा जितकी प्रौढ, शुद्ध आणि मनोरंजक करितां येईल, तितकी करण्याचा यत्न केला आहे. त्यांत सांगितलेल्या गोष्टी सर्वांच्या मनांत ठसाव्या ह्मणून, सर्वांच्या अनुभवाचीं अशीं उदाहरणें सुचलीं तेवढीं देऊन, या विषयाचा विचार केला आहे.

या विषयाचें प्रतिपादन करण्यापूर्वीं दोन गोष्टी गृहित धरिल्या आहेत. त्या कोणत्या तर भाऊबंदांत कलह उत्पन्न होतो, ही एक गोष्ट व त्या कलहामुळें ते विभक्त होतात, ही दुसरी. या विषयाचे मुख्य दोन भाग मानितां येतील. भाऊबंदांत कलह उत्पन्न होऊन, त्या कलहा-

---

* हा निबंध बालबोधाच्या सन १८८७ च्या आगष्ट महिन्याच्या अंकांत, रा. रा. जावजी दादाजी निर्णयसागर छापखान्याचे मालक, यांनीं जाहिरात दिल्यावरून, आम्हीं यथामति रचून त्यांजकडे पाठविला होता. त्यांनीं नेमिलेल्या परीक्षकांकडून, त्याचा निकाल नुकताच होऊन, बक्षीस रा. रा. बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर यांस मिळालें. परीक्षकांच्या पटांत या निबंधाचा दुसरा नंबर लागला, असें समजतें. पहिल्या नंबरच्या निबंधास बक्षीस मिळून, तो निर्णयसागर छापखान्यांत स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला जाणार आहे. परंतु हाही समग्र निबंध जगापुढें यावा, या हेतूनें आम्ही तो या पुस्तकांत घालण्याची योजना केली आहे. एकंदर निबंधावर परीक्षकांनीं शेरा दिला आहे तोः– "निबंध फार चांगला लिहिला आहे. असे निबंध फार थोडे आहेत. पुष्कळांचा कोठें कोठें मत-भेद होईल. तरी एकंदरींत विषयाचा विचार चांगल्या रीतीनें केला असून, लिहिण्याची व्यवस्था चांगली आहे. भाषा फार चांगली आहे." प्रस्तुत निबंध छापण्यापूर्वीं, परीक्षकांच्या सूचनेवरून, ठिकठिकाणीं थोडाबहुत फेरबदल केला आहे.

गो. वा. का.

मुळें ते विभक्त होतात; असा हा प्रकार होण्याचीं कारणें काय काय असतात हा एक भाग. दुसरा भाग, त्या कारणांचा प्रतिबंध करतां येईल कीं काय, ह्मणजे कलह होऊन विभक्तपणा होतो, या गोष्टीला कांहीं उपाय आहेत कीं काय, व असतील तर ते कोणते ? याप्रमाणें या विषयाचे मुख्य दोन भाग पडतात. तथापि मुख्य विषयाकडे वळण्यापूर्वीं थोडासा उपोद्घात करणें अवश्य दिसतें. प्रथम भाऊबंद कोणास ह्मणावें याचा विचार केला पाहिजे.

प्रत्येक **समाज** अनेक **कुटुंबें** मिळून झालेला असतो. आणि प्रत्येक **कुटुंब** अनेक **व्यक्ति** मिळून झालेलें **असतें**. या एका कुटुंबांतील **जे अवयव**, ते भाऊबंद होत. आतां, हें उघडच आहे कीं कुटुंबांतील अवयवांचा ह्मणजे भाऊबंदांचा विचार केला असतां पुष्कळ अंशांनीं समाजाचाही त्यांत विचार केल्यासारखें होणार आहे.

इंग्रज लोक कुटुंब ह्मणजे फक्त नवराबायको व त्यांची संतति एवढेंच समजतात. परंतु आमच्या प्राचीन पद्धतीप्रमाणें कुटुंब शब्दाची व्याप्ति मोठी असून, मूळ पुरुषाची संतति, व त्या संततीचा विस्तार मिळून झालेला जो समुच्चय त्यांस कुटुंब समजतात.

यावरून एका गोत्रांत, एका वंशांत, किंवा एका कुळांत जन्म पावलेलीं जीं माणसें, त्यांस भाऊबंद असें ह्मणतात. अशा या भाऊबंदांमध्येंही दोन प्रकार असतात. एक लांबचे भाऊबंद; व दुसरा जवळचे भाऊबंद. पूर्वीं एकत्र रहात असलेल्या कुटुंबाची कालेंकरून निरनिराळीं कुटुंबें होऊन तीं विभक्तपणानें राहूं लागतात. तेव्हां या लांबच्या भाऊबंदांचा आपणास येथें विचार करण्याचें कारण नाहीं. कां तर त्यांचीं निरनिराळीं घराणीं झालेलीं असून प्रत्येक घराचा दुसऱ्या घराशीं अर्थाअर्थीं संबंध राहिलेला नसतो. त्याची वतनवाडी, पैसा, व्यवसाय वगैरे निरनिराळेंच असतें.

ज्या भाऊबंदांचा आपणास विचार करणें आहे, ते दुसऱ्या प्रकारांतले म्हणजे जवळचे भाऊबंद होत. हे एका घराण्यांतले, एके ठिकाणीं रहाणारे, व ज्यांचा परस्पर अगदीं निकट संबंध असतो असे असतात. ह्मणजे, एका कुटुंबांत रहाणारीं, आई, बाप, बंधु, चुलतबंधु, काका, पुतणे आदिकरून माणसें एकत्र ठिकाणीं रहातात. ह्याचें मुख्य कारण स-

मत्व होय. ते सहोदर किंवा चुलतबंधु, अथवा ज्यांचा संबंध फार जवळचा असतो, असे ममत्व–पाशानें बद्ध झालेले आप्त–जन असतात.

लौकिकांत ' भाऊबंद ' या शब्दाचा अर्थ जो समजतात, तोही सांगितला पाहिजे. एका कुटुंबांतील, एका वंशांतील मनुष्यें, व पुरुष-संततील व्यक्तींच्या संबंधानें, परकीय कुटुंबांतून विवाह व दत्तक अशा संबंधानें येणारीं मनुष्यें यांस **भाऊबंद** असें म्हणतात. मूळ पुरुषाचे वंशज जितके असतील, त्या सर्वांना मिळून कधीं कधीं ' भाऊबंद ' ही समुच्चयवाचक संज्ञा देतात. मग त्यांचा. विभक्तपणा झालेला असो किंवा नसो. ही साधारणतः भाऊबंद या शब्दाची व्याख्या झाली. तथापि आपल्या विषयाच्या संबंधानें भाऊबंद या शब्दाचा अर्थ ' एकत्र असलेल्या कुटुंबांतील माणसें ' एवढाच घेतला असतां, पुरे होईल असें वाटतें.

धर्मशास्त्रदृष्ट्या भाऊबंद या शब्दाची व्याख्या कशी करावी, तोही विचार करूं. संस्कृतांत भाऊबंदास 'दायाद' अशी संज्ञा आहे. म्हणजे वडिलोपार्जित धनाचा अधिकारी. जीं माणसें दाय–विभागाला अधिकारी असतात, तींच ' भाऊबंद ' होत. ज्या पुरुषानें मूळ मिळकत मिळविली असेल,, त्या पुरुषाचे संबंधी म्हणून मिळकतीचा विभाग मागण्यास जितकीं माणसें पात्र असतात त्या सर्वांस **भाऊबंद** असें म्हणतात. याप्रमाणें भाऊबंद या शब्दाचा अर्थ आहे. आतां विभक्तपणा या शब्दाचा थोडासा विचार करूं.

भाऊबंदांत कलह उत्पन्न होऊन विभक्तपणा होतो असें जें म्हटलें आहे त्यावरून अशी एक शंका मनांत येते कीं, विभक्तपणा होतो तो कलह न होतां झाला, तर चांगला किंवा वाईट ? चांगला आहे असें म्हटल्यास त्याचीं कारणें कोणतीं ? वाईट आहे असें म्हटल्यास त्याचीं कारणें काय आहेत ? असे प्रश्न उत्पन्न होतात. म्हणून आपण प्रथम याच मुद्याचा विचार करूं.

प्रस्तुत विषयाच्या संबंधानें, बऱ्याच लोकांचें मत आहे कीं, कुटुंबांत कलह होऊं नये एवढेंच नव्हे, तर विभक्तपणा होणें हीच गोष्ट मुळीं वाईट आहे. म्हणून कधींही ती होऊं नये. अर्थात् कुटुंबाचा एकत्रपणा, अथवा एकत्र–व्यवहार कधींच मोडूं नये. हा हेतु सफळ होण्यासारखा आहे कीं काय ? याविषयीं पुष्कळ समंजस लोकांस पुष्कळ

संशय वाटत असतो. एवढेंच या ठिकाणीं सांगणें बस आहे. या मताबद्दलचा आमचा अभिप्राय प्रस्तुत ठिकाणीं आह्मी सांगत नाहीं. तथापि कांहीं कालपर्यंत तरी कुटुंबाचा एकत्रपणा राखणें इष्ट असेल, तर हा इष्ट हेतु सिद्ध कसा होईल व त्याचीं साधनें काय आहेत, याचा विचार करणें अवश्य दिसतें. एवढें सांगून पुढें चालूं.

विभक्तपणा होतो तो, कलह न होतां झाला तर कसें? ह्मणजे असा हा विभक्तपणा झाला असतां चांगला किंवा वाईट? या संबंधानें इतकी गोष्ट ध्यानांत आणिली पाहिजे कीं, एकत्रपणा असल्यापासून पुष्कळ प्रकारचे फायदे आहेत, व हित आहे, हें खरें. तथापि, विभक्तपणाची ही स्थिति केव्हां ना केव्हां तरी येणारच कीं नाहीं? त्या अर्थीं कांहीं दिवस एकत्रपणा असून, पुढें विभक्तपणा होणें, ह्या दोन्ही गोष्टी स्वाभाविक आहेत; व त्या टाळण्याचा यत्न केला असतां, टाळितां येतील, असें नाहीं. जी गोष्ट आपणास टाळिली पाहिजे, जी अनिष्ट आहे, व दुःखप्रद आहे, ती 'कलह' ही होय. तेव्हां कलह न करितां, किंवा निदान, **कलह उत्पन्न होण्यापूर्वींच,** विभक्तपणा होणें, ही गोष्ट चांगली नव्हे काय? असें निदान प्रथमदर्शनीं तरी वाटतें. त्याचीं कारणें काय आहेत तीं पाहूं.

कुटुंबाची मूळची स्थिति अशी असते कीं, आई, बाप व त्यांचा परिवार, ह्मणजे त्यांचीं मुलें व मुली, जोंपर्यंत लहान असतात, तोंपर्यंत तीं आईबापांच्याच छायेखालीं रहातात. त्यांच्या सुखदुःखांचा सर्व विचार आईबापांसच करावा लागतो. ही जबाबदारी किंवा हें कर्तव्य आईबाप बजावीत असतां, त्यांस प्रवर्तक किंवा प्रोत्साहक असें कारण, त्यांच्या अंतःकरणांत सृष्टीनें 'ममत्व' ह्मणून जो एक धर्म उत्पन्न केला आहे, तोच होय. मुलें जों जों वाढत जातात, व जों जों त्यांस स्व-पर कळूं लागतें, व जों जों त्यांस स्वतंत्र निर्वाह करण्याचें सामर्थ्य येतें, तों तों आईबापांची जबाबदारी कमी होत जाते. पशु-पक्ष्यांमध्येंही अशीच स्थिति दृष्टीस पडते. पक्ष्यांचीं पिलें जोंपर्यंत अशक्त व दुर्बळ असतात, ह्मणजे आपला चारापाणी मिळविण्याविषयीं असमर्थ असतात, तोंपर्यंत त्यांचीं आईबापें त्यांचें संगोपन करितात. त्यांस एकदां पंख फुटून तीं हिंडूं फिरूं लागलीं, आपलें भक्ष्य मिळविण्याकरितां

रानांत जाऊं येऊं लागलीं, म्हणजे त्यांचे आईबाप आपला संबंध हळूहळू तोडूं लागतात. इंग्रज लोकांमध्यें जी पद्धत आहे, ती अशीच आहे. मुलगा जोंपर्यंत आपल्या व आपल्या बायकोच्या निर्वाहाविषयीं समर्थ झाला नाहीं, व त्यानें बायको केली नाहीं, तोंपर्यंत तो बापाच्याच घरीं राहतो. परंतु तो एखादा स्वतंत्र उद्योग करूं लागला, आपला निर्वाह आपण करूं लागला, व त्यानें आपलें लग्न केलें, ह्मणजे मग त्यानें निराळें घर केलेंच पाहिजे; असा त्यांचेमध्यें नियम आहे. असा हा प्रकार पाहतां नैसर्गिक दिसतो. ह्मणजे तो सृष्टि-नियमास अनुसरूनच आहे असें वाटतें.

असें अनुभवास येतें कीं, जोंपर्यंत कुटुंबांतील माणसें एकमेकांवर प्रीति करतात; एकमेकांविषयीं एकमेकांच्या मनांत आढी नसते; एकाचें जें हित तेंच सर्वांचें हित, असें जोंपर्यंत सर्वांस वाटत असतें; तोंपर्यंत विभक्तपणा होत नाहीं; व होणें इष्टही नाहीं. कारणांचा अभाव असल्यामुळें अर्थात् कार्यही होत नाहीं. एखाद्या जड-पदार्थांत जोंपर्यंत आकर्षक गुण आहे, ह्मणजे त्या पदार्थाच्या परमाणूंमध्यें एकमेकांस चिकटून रहाण्याची शक्ति असते, तोंपर्यंत त्या पदार्थाचे परमाणु एकत्रस्थितींत रहातात; परंतु, उष्णता किंवा विद्युत्-शक्ति, अशा एखाद्या बाह्यशक्तीच्या संयोगानें त्या परमाणूंतील आकर्षक गुणाचा लोप झाला ह्मणजे, तो पदार्थ छिन्नभिन्न होऊन त्याचे परमाणु निरनिराळे होतात म्हणजे, त्यास विभक्त-स्थिति प्राप्त होते. त्याचप्रमाणें कुटुंबाचाही प्रकार आहे. एकत्र रहाणें हें एका पिढींत होईल; फार तर दोन पिढ्या होतील; कदाचित् तिसरी पिढीही एकत्रपणांतच जाईल. परंतु पुढें लौकरच विभक्त होण्याचा प्रसंग त्या माणसांवर येईल.

एकंदर मिळकतीची व्यवस्था व्हावी, व अनेकांच्या अनेक हक्कांचा निर्णय व्हावा, ही गोष्ट अगदीं अवश्य दिसते. वृक्षाच्या मूळ खोडापासून शाखा जशा निरनिराळ्या होतात, त्याचप्रमाणें त्यांतील अनेक पिढ्या मिळून झालेला जो एक कुटुंब-वृक्ष, त्याच्या शाखा लांबवर पसरत जाऊन, अखेर तो अनावर होतो. ज्याप्रमाणें केळीसारखे कांहीं वृक्ष आपली संतति आपापल्या पोषणाविषयीं समर्थ झाल्यानंतर आपण अंतर्धान पावतात, त्याचप्रमाणें एका कुटुंबाचे काळेंकरून विभाग होऊन

त्यांचीं निरनिराळीं कुटुंबें होणें हें अगदीं साहजिक आहे. असें नसतें तर आपल्यामध्यें एकाच आडनांवाचीं जीं अनेक कुटुंबें आपण पहातों तीं तशीं झालीं नसतीं. या सर्व गोष्टींचा विचार करून, व मुख्य तत्त्व ध्यानांत आणून, हिंदुधर्मशास्त्रकर्त्यांनीं, 'सोयीचें पडेल त्या वेळेस बापानें मुलास आपल्या मिळकतीच्या वांटण्या करून द्याव्या' असा स्पष्ट ठराव केला आहे. बापाचा वृद्धापकाळ झाला व पुढें प्रजा होण्याचा संभव नाहीं असें त्याला वाटलें, किंवा तो व्याधि-ग्रस्त झाला म्हणजे आपण होऊन पूर्वार्जित व स्व—कष्टार्जित धनाचा विभाग करावा, म्हणून उपदेश केला आहे. व्यवहारांत जे परिणाम किंवा ज्या गोष्टी अवश्य घडणारच, त्या धर्म—शास्त्र—कर्त्यांनीं मान्य करून त्यांची व्यवस्था होतां होईल तितकी चांगल्या प्रकारें लावण्याचा यत्न केला आहे. 'जी गोष्ट मनुष्यस्वभावाप्रमाणें झालीच पाहिजे, व जी कधींना कधीं होतेच, व केली नसतां शेवटीं तंटेबखेडे होऊन होते, ती आपण होऊन एकमेकांच्या विचारानें,थोडी अगोदर घडवून आणिल्यास त्यापासून पुष्कळ त्रास चुकून सर्वांचेंच हित होण्याचा संभव आहे.' *

अंमळ विचार केला असतां असें वाटतें कीं, विभक्तपणा मनाचा नसून, केवळ बाह्य पदार्थांचा असेल तर, त्यांत मोठेंसें वाईट आहे असें नाहीं. कुटुंबांतील सर्व माणसांची मनें जर शुद्ध आहेत, जर तीं एकमेकांवर प्रीति करीत आहेत, एकमेक एकमेकांच्या हिताकरितां जपत आहेत, तात्पर्य, त्यांचीं अंतःकरणें जर एकमेकांस चिकटून आहेत—तर त्यांचें खाणें पिणें, त्यांचें उठणें बसणें, त्यांचे बाह्य व्यवहार, जरी निराळे असले अथवा विभक्तपणाचे दर्शक असले तरी त्यांत कांहीं नुकसान आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. कारण, अशी कल्पना करूं कीं, जें एकत्रपणामध्यें कुटुंब असतें त्या वेळेस त्याचें बाह्य—स्वरूप केवळ एकत्रपणाचें असून जर अंतर्यामीं द्वैत आहे, कुटुंबांतील माणसें परस्परांशीं सुखानें व आनंदानें वागत नाहींत, प्रेमभावाचा अगदींच लोप झाला आहे, एकमे-

---

* 'एकत्र रहाणें चांगलें कां ? या संबंधानें केसरी पत्राच्या अगदीं आरंभीं म्हणजे, सन १८८१ सालच्या १०।११ अंकांत लहानसा निबंध आहे; तो पहाण्यासारखा आहे.

कांची नेहेमीं धुसपूस चालू आहे, घरांत मारामाऱ्या, कलह, वगैरे अनिष्ट प्रकार माजून राहिला आहे, तर अशा स्थितींत केवळ लौकिकाकरितां एकत्र म्हणून राहिलेलें जें कुटुंब, त्यास बाह्यात्कारी एकत्र दिसण्यापासून कितीसा फायदा होणार आहे !

जोंपर्यंत आईबाप असतात व त्यांचीं मुलें अज्ञान असतात, विवाहसंबंधाचा निराळा पाश त्यांच्यामागें लागलेला नसतो, तोंपर्यंत मनोविकारांपैकीं मातृ—भक्ति, पितृ—भक्ति, किंवा बंधु-प्रीति यांचाच पगडा मनावर जास्त असतो. परंतु विवाह-संबंध झाल्यामुळें अगदीं परक्या कुटुंबांतील स्त्रीविषयीं प्रत्येक मनुष्याचे मनांत जो एक प्रकारचा पाश उत्पन्न होतो, तो बऱ्याच अंशानें विभक्तपणास कारणीभूत होतो. आपल्या प्राचीन इतिहासांत पाहिलें तर या गोष्टीचीं अनेक उदाहरणें सांपडतील. पांडवांची गोष्ट घ्या ना, पांडवांच्या सापत्न बंधूंनीं त्यांची धर्मपत्नी जी द्रौपदी, तिचा अपमान केल्यामुळें, महाभारतांत वर्णिलेला प्रसंग येऊन ठेपला. पुरुषांशीं घडून येणारा स्त्रियांचा संबंध किती चमत्कारिक आहे, ही गोष्ट ध्यानांत आणण्यासारखी आहे. यावरून कलह व विभक्तपणा होण्यास कारणीभूत स्त्रिया होतात, अशा प्रकारचा आरोप त्यांजवर पुष्कळ लोक करितात, तसा आम्हीही करितों, असें कोणी समजूं नये. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, बंधु—प्रीतीस विघातक असें कारण, स्त्रियांचा पुरुषांशीं जो संबंध घडत असतो, तो बऱ्याच अंशानें होतो असें मानण्यास पुष्कळ आधार आहे.

यावरून हें उघडच आहे कीं, अशा या दृष्टीनें विचार केला असतां, केवळ सोयीकरितां व व्यवहाराकरितां विभक्तपणा करणें, ही गोष्ट अहितकारक किंवा अनिष्टकारक आहे, असें ह्मणतां येत नाहीं. आपणास असा अनुभव आहे कीं, कुटुंबांतील माणसें एकत्र-स्थितींत असतांही, त्यांच्या बाह्य-व्यवहारांत संसार-संबंधानें विभक्तपणा असतोच असतो ! उदाहरण, एका कुटुंबांत जितकीं माणसें असतात, तितक्यांस निरनिराळे पदार्थ बरेच लागत असतात. अशी कल्पना करूं कीं, एका कुटुंबांत दहा माणसें आहेत, त्यांस अनुकूलता असल्यास दहांना दहा पाट, दहांना दहा भांडीं, दहा बिछाने, दहा आंगरखे, दहा पागोटीं, दहा जोडे, इत्यादि पदार्थ, दहा जीव निरनिराळे असल्या कारणानें निराळे लागतातच. ह्मणजे, अद्वैतांत

द्वैताचा प्रकार सहजच उत्पन्न होतो; व एकत्रपणांतच निराळेपणा असतो ! दुसरें असें असतें कीं, दहांच्या दहा प्रकृति असतात. त्यामुळें त्यांच्या आवडी किंवा अभिरुचि भिन्न भिन्न असतात.

जें एकास रुचतें, तें दुसऱ्यास रुचत नाहीं. जें करणें एकास योग्य व इष्ट वाटतें, तेंच दुसऱ्यास अयोग्य व अनिष्ट वाटतें. आपल्या समाजाची स्थिति इंग्रजी राज्याच्या आरंभापासून अनेक बाबतींत बरीच बदलली आहे, हें लक्ष्यांत आणिलें पाहिजे. कारण, हें स्थित्यंतर अगदीं उघड दिसत आहे. नवे विचार व जुने विचार, असा प्रकार पुरुषांतच झाला आहे असें नाहीं. कांहीं कुटुंबांतील स्त्री-वर्गांतही हा प्रकार हळूहळू वाढत चालला आहे. यामुळें रुचिवैचित्र्य अधिकाधिक होत आहे. तेव्हां अशा स्थितींत कलहाचें बीज उत्पन्न होणें किती स्वाभाविक आहे बरें ?

आतां राष्ट्राराष्ट्रांत जे कलह उत्पन्न होतात, त्यांचीं कारणें पहातां अनेक असतात. कुटुंबांत जो कलह उत्पन्न होतो, त्यासही तशाच प्रकारचीं कारणें असतात. कारण, कुटुंब ह्मणजे एक लहानसें राज्यच नव्हे तर काय ? कुटुंबांत कलह होतो, तो तरी माणसांमाणसांतच होतो कीं नाहीं ? दोन राष्ट्रांत परस्पर कलह उत्पन्न होण्याचीं कारणें काय काय असतात, तीं पाहिलीं पाहिजेत; व त्या कारणांपैकीं कुटुंबांत कलह उत्पन्न करणारीं कोणतीं, त्याचाही विचार केला पाहिजे. जर कांहीं विशेष कारणें असतील तर, तींही लक्ष्यांत आणिलीं पाहिजेत. या जगांत कलह कसे उत्पन्न होतात, तें प्रथम पाहूं.

मनुष्यमात्रास काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, इत्यादि मनोविकार, स्वार्थ–बुद्धि; महत्वाकांक्षा; स्वातंत्र्याची इच्छा; वगैरे गोष्टी परमेश्वरानें लावून दिल्याच आहेत.

या संसाररूप रंगभूमीवर मनोविकाराचे खेळ नानातऱ्हेचे नित्य चालूच आहेत. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास जिंकणें, एका शेजाऱ्यानें दुसऱ्या शेजाऱ्याशीं भांडणें व एकानें दुसऱ्याच्या मिळकतीचा अपहार करूं पहाणें, मारामाऱ्या, चहाड्या, लबाड्या, चोऱ्या, दरवडे, जारकर्म इत्यादि जे कलहाचे व भांडणाचे प्रकार जगांत आढळतात, ते सर्व खेळ मनुष्यांच्या दुष्ट मनोविकारांचे नाहींत, असें कोण ह्मणेल ? विश्वामित्रानें वसि-

धाचे शंभर पुत्र मारिले, **रावणानें रामाशीं** द्वेष केला; व त्याची प्रियपत्नी **जानकी** हरण करून नेली; **कौरवांनीं पांडवांशीं** वैर धरिलें; **कैकयीनें** बिचाऱ्या **रामचंद्रास** चौदा वर्षें वनवास भोगण्यास लाविलें; **आनंदीबाईनें** दक्षिणचा हिरा जो **नारायणराव** पेशवा त्यास ऐन तारुण्याच्या भरांत यमसदन दाखविलें, व सर्व **महाराष्ट्रास** दुःखसमुद्रांत लोटिलें; **नानासाहेब** पेशव्याच्या योग्य हक्काची व **महाराष्ट्राच्या** स्वातंत्र्याची पायमल्ली झाल्यामुळें **हिंदुस्थानावर** सन १८५७ सालचा भयंकर प्रसंग गुदरला; हे सर्व चमत्कार कशाचे? तर मनुष्याच्या उच्छृंखल मनोविकाराचे! असो, तेव्हां असे हे मनोविकार एकत्र कुटुंबाच्या माणसांतहीं कलह उत्पन्न करण्यास कारणीभूत होतात, यांत नवल काय?

मनुष्याच्या चित्तरूपी सागरांत अनेक प्रकारचे वृत्तितरंग असतात. कांहीं चित्तवृत्ति सुखकारक असतात, कांहीं मध्यम तऱ्हेच्या असतात व कांहीं इतक्या प्रचंड असतात व त्यांचा विस्तार इतका मोठा होतो कीं चित्ताब्धीला त्या आकुल करून सोडितात, व उच्छृंखलपणें विकास पावूं लागतात. मनोविकार अगोदर तरंगाप्रमाणें चंचल असतात, त्यांत जर का त्यांना षड्रिपूंपैकीं कोणा एकाचें तरी पाठबळ मिळालें तर, तुफान फारच भयंकर होतें. जोंपर्यंत चित्तलहरी सौम्य असतात, तोंपर्यंत त्यांपासून अपाय होण्याची भीति नाहीं ह्मणून त्या सौम्य ठेवण्याकडे मनुष्यांचें पूर्ण लक्ष्य असलें पाहिजे. *

असो. तात्पर्य, अशा या मनोविकारांचें जगांतील प्रत्येक व्यक्तीवर कमजास्त प्राबल्य असून, त्यांपैकीं एखादा फारच तीव्र असतो; ह्मणजे तो पराकाष्टेप्रत गेलेला असतो. त्यामुळें कधीं कधीं फारच भयंकर परिणाम होतात. ज्याप्रमाणें एखाद्या डोंगराच्या कड्यावरून एखादी मोठी धोंड सुटली ह्मणजे ती अनावर होऊन पिछेहाट तर घेतच नाहीं, परंतु जों जों ती पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या घेऱ्यांत येऊन पोंचते, तों तों तिला अधिकाधिक गति प्राप्त होते, त्याचप्रमाणें एखाद्या दुष्ट मनोविकारानें एखाद्या

---

* केसरी सन १८८४ अंक २८.

मनुष्यावर एकदां आपला पगडा बसविला, ह्मणजे तो बेफाम झाल्यासारखा होऊन, ज्या इतर शक्तींनीं, मनोविकारांनीं, किंवा पाशांनीं त्याचें संयमन व्हावें, व तो कांहीं एका मर्यादित स्थितींत रहावा, तसा न रहातां संकटाच्या गर्तेंत पडतो. तो आपण एकटाच पडतो असें नव्हे; तर आपल्याबरोबर आपल्याशीं एकत्रपणानें रहात असलेले जे आपले भाऊबंद त्यांजवरही तेंच संकट ओढवतें. व त्यांसही आपल्याबरोबर तो दुःखार्णवांत बुडवितो. मग असें होतें कीं, जसा एखादा शरीराचा अवयव व्याधिग्रस्त झाला असतां, शरीराच्या इतर अवयवांस त्यापासून पीडा होऊन दोन गोष्टींपैकीं कोणती तरी एखादी गोष्ट घडवून आणणें अवश्य होतें, ह्मणजे एक तर तो व्याधिग्रस्त व निरुपयोगी झालेला अवयव शरीरापासून मुळींच दूर करावा लागतो. किंवा, तसें न केलें तर त्या एका अवयवाबरोबर समग्र शरीर व्याधिग्रस्त होऊन नाश पावतें. अशाच प्रकारचे प्रसंग कुटुंबांत येत असलेले पुष्कळांस आठवत असतील. कोणी अफूबाज, कोणी गांजेकस, कोणी सुराभक्त, कोणी बाहेरख्याली, असे निघतात. असा एखादा मनुष्य एकंदर कुटुंबास लांछन आणणारा निघाला, ह्मणजे बाकीच्यांस अर्थात् असें वाटूं लागतें कीं, या मनुष्याचा संबंध जर सुटेल तर फार चांगलें होईल. आणि यास आपणापासून निराळा केला, ह्मणजे आपणावरील लोकापवादही बराच कमी होईल. अशा समजुतीनें कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यास असें वाटूं लागतें कीं, आपण यापासून एकदांचें विभक्त व्हावें. जो मनुष्य अत्यंत व्यसनासक्त होतो, त्याच्या योगानें एकत्रपणांतली कुटुंबाची वडिलोपार्जित मिळकतही बरीच नाश पावत जाते. त्या मनुष्यास त्याची एकत्रपणांतील मिळकत पाहून सावकार कर्ज देण्यास एका पायावर उभे असतात. तो व्यसनी मनुष्य स्वतः द्रव्याची कांहींच किंमत समजत नसतो. कारण, त्यांचे बुद्धीस व्यसनपरायणतेमुळें विलक्षण मांद्य उत्पन्न होतें. आमच्या अनुभवास असें एक उदाहरण आलें आहे कीं, एकत्रपणांत असलेल्या अशा एका धनाढ्य कुटुंबांतील मनुष्यास दहावीस रुपयांची गरज लागली तर, त्यानें बेलाशक सावकारास

सं. ग्रं. ३८५



शंभर रुपयांचा रोखा लिहून द्यावा. त्याचे वेश्येनें त्याजपाशीं हट्ट घेतल्यास तिला घरांतील पाहिजे तो दागिना किंवा मौल्यवान् किंमतीचें एखादें वस्त्र बलाशक चोरून नेऊन द्यावें. फार काय, त्याच्या घराशेजारीं किराणा माल विकणारा एक वाणी होता, त्याचे दुकानांतून दिवाळीचे प्रसंगीं त्यानें भारंभार सोनें देऊन, भारंभार फटाक्याच्या पेट्या घ्याव्या ! इतका तर बाळ्या विद्वान् होता ! असे हरीचेलाल व कुलदीपक एखाद्या कुटुंबाच्या दुर्दैवानें उत्पन्न झाल्यास त्या कुटुंबाच्या माणसांत शांतता रहाणें व त्यांचा एक विचार असणें सर्वथा असंभव आहे. मग जसा सडलेला अवयव शस्त्रवैद्याकरवीं तोडून टाकणें भाग पडतें, त्याप्रमाणें अशा मनुष्याचा संबंध तोडणें, त्या कुटुंबाच्या माणसांस भाग पडावें, यांत काय आश्चर्य आहे ! मूळ जें एक कुटुंब होतें, त्यास एकवार असें छिद्र पडलें ह्मणजे, इतर मनुष्यें थोडक्याच दिवसांत निराळीं रहाण्यास इच्छितात. नेहेमीं हें असेंच व्हावयाचें, किंवा घरोघर असे प्रकार घडतातच असें आह्मी ह्मणत नाहीं. तर आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, कुटुंबांतील एखादा मनुष्य दुर्वर्तनी निघाला असतां असें होण्याचा पुष्कळ संभव असतो.

**स्वार्थपरायणता**—बहुधा प्रत्येक मनुष्यास स्वार्थबुद्धि असते असें ह्मटल्यास मोठीशी चूक होणार नाहीं, स्वार्थपरायणता किंवा आप्पलपोटेपणा याच्या योगानें एक राजा दुसऱ्या राजाशीं, एका देशांतील लोक दुसऱ्या देशांतील लोकांशीं, एक कुटुंब दुसऱ्या कुटुंबाशीं अथवा एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीशीं, भांडणें करितात, असा इतिहासावरून व जगांत होणाऱ्या अनेक उलाढालींवरून अनुभव येतो. आपल्यांत ह्मण आहे कीं, प्रत्यक्ष देवालाही स्वार्थ सुटला नाहीं, मग मानवांची काय कथा !

इंग्रज लोक तीन हजार कोसांवरून येऊन त्यांनीं आमचा देश काबीज केला, तोही याच कारणांमुळें; पहातां पहातां **थीबा** राजावर अन्यायवर्तित्वाचा वगैरे आरोप आणून **ब्रह्मदेश** ज्या इंग्रज बहादरांनीं घशांत टाकिला तोही स्वार्थाकरितांच; **अमेरिके**सारख्या रानटी लोकांनीं भरलेल्या देशांत **यूरोपां**तील सुधारलेल्या देशांतील लोकांनीं जाऊन आपल्या

वसाहती केल्या व तेथील लोकांचा समूळ नाश केला, तोही परिणाम कशाचा ? तर स्वार्थबुद्धीचा. **पंतांनीं** म्हटलें आहे: " निजहितलोभें धरितो शिशुहि मुखीं एक अन्य थान करीं. " अशी ही स्वार्थबुद्धि जगाच्या मागें लागलेलीच आहे. तेव्हां ती कुटुंबांतील एकत्र रहाणाऱ्या माणसांसच कशी बरें सोडील! त्यांसही जर ' निजहितलोभाची पीडा झाली तर त्यांनीं मोठेंसें पातक केलें असें म्हणतां येईल काय ? लोभ मिळून काय तो स्व-सुखाचा. स्व-सुखाच्या आड येणारीं विघ्नें टाळण्याविषयीं मनुष्यें होईल तितका प्रयत्न करितात. स्वसुखाविषयीं अत्यंत निरपेक्ष अशीं माणसें जगांत फारच विरळा. तथापि, जगांतील बहुतेक माणसांची 'आपलें सुख ' ह्मणून जी समजूत असते, ती बहुधा फारच असमंजसपणाची व संकुचित अशी असते. व्यवहारांत असा नियम आढळतो कीं, आपणास सुखाचा बराच वांटा मिळावा असें ज्याच्या मनांत असेल त्याला आपल्या थोड्याशा सुखावर पाणी सोडून, दुसऱ्याच्या सुखावर नजर द्यावी लागते. आपलें अंग मोडून दुसऱ्याच्या सुखाकरितांही कधीं कधीं आपणास झटलें पाहिजे. जगांतील बहुतेक मनुष्यें ' आपलें सुख ', ' आपला अर्थ ', ' आपलें कार्य ', या खेरीज दुसरें कांहीं जाणत नाहींत. ज्याला त्याला वाटतें कीं आपलें कार्य साधावें. आतां आपलें कार्य सिद्ध होण्यास आपण स्वतः झटलें पाहिजे, हें खरें; तथापि, आपलें झटणें परंपरेनें दुसऱ्याचें कार्यहि साधण्यास कारणीभूत होतें, हें लक्षांत ठेविलेंच पाहिजे. ' आत्मवत् सर्व भूतानि ' या थोरांच्या वाक्याचें तत्त्व तरी असेंच आहे कीं, जो, आपल्याप्रमाणेंच इतर सर्व प्राण्यांस स्वसुख प्रिय आहे, व दुःख अप्रिय आहे असें जाणून वागतो, त्यालाच सर्वांहून सुखाचा वांटा अधिक मिळतो. परंतु लोक बहुधा परमार्थद्रष्टे नसतात, ह्मणजे त्यांस खऱ्या स्वार्थाची कल्पना नसते. यामुळें भलत्याच मार्गांत जातात. असें पहा कीं, आपला देश स्वतंत्र होण्यास देशांतील लोकांची एकी झाली पाहिजे, ह्मणजे एक विचार असला पाहिजे. देशांतील लोकांचा एक विचार होण्यास, प्रत्येक कुटुंबांतील माणसांस एका विचारानें वागण्यास शिकलें पाहिजे. कुटुंबांत एक विचारानें वागण्यास शिकण्यापूर्वीं प्रत्ये

(पुढें चालू)

क व्यक्तीला प्रत्यक्ष आपल्या सुखाच्या स्वातंत्र्याच्या व विशेषेंकरून आपल्या संकुचित अर्थाच्या स्वार्थाच्या कांहीं अंशावर पाणी सोडून दिलें पाहिजे. **स्वार्थ** व **परमार्थ** यांचीं खरीं स्वरूपें कशीं आहेत, व परस्पर संबंध कसा आहे, हा प्रश्न फार गहन आहे. त्याचें निरूपण स्वतंत्र निबंधानेंच केलें पाहिजे. ह्मणून प्रस्तुत विषयाच्या संबंधानें झालें इतकेंच प्रतिपादन पुरे आहे.

**महत्वाकांक्षा**—प्रत्येक मनुष्यास घरांत आपण मालक असावें, घरांत आपल्यासच महत्व असावें, इतर सर्वांवर आपली हुकमत चालावी अशी जी मनुष्यमात्रास साहजिक इच्छा असते, त्या इच्छेविरुद्ध कुटुंबांत कांहीं प्रकार घडून आला ह्मणजे सहजच मनास वाईट वाटतें. जोंपर्यंत कुटुंबांत एकसूत्री कारभार चालतो, व त्या कारभाराला प्रतिकूल अशा प्रकारच्या गोष्टी नसतात तोंपर्यंत गाडा सुयंत्रित चालतो. परंतु कुटुंबांतील माणसांस या महत्वाकांक्षेनें घेरिलें, व बहुनायकी उत्पन्न झाली ह्मणजे कलहाचा पाया घातल्यासारखें होतें. हल्लीं बहुनायकीचा प्रकार जितका वाढलेला दिसतो, तितका जुन्या काळीं नव्हता असें वाटतें. यामुळें पूर्वीं घरांत कितीही माणसें असलीं, तरी बहुतेक महत्वाच्या गोष्टी घरांत जो वडील किंवा कर्ता असे त्याच्याच इच्छेप्रमाणें होत असत, व त्याच्याच अनुरोधानें बाकीच्यांस वागावें लागत असे. वडील माणसाच्या आज्ञेस अनुसरून चालणें हें आपलें कर्तव्यकर्मच आहे व आपला धर्मच आहे, अशी जोंपर्यंत बहुतेक व्यक्तींची दृढ श्रद्धा होती, तोंपर्यंत या महत्वाकांक्षेचें प्राबल्य त्या कालीं फारसें चाललें नाहीं. परंतु हल्लीं कालमान फिरल्यामुळें व तदनुसार पुष्कळ नव्या कल्पना आमच्या लोकांच्या मनांत शिरल्या गेल्यामुळें घरांतील बाप ह्मणा, भाऊ ह्मणा, कोणी तरी जो वडील असेल, जो कर्ता असेल, त्याच्या इच्छेप्रमाणें चालण्याचें लोकांस रुचेनासें झालें आहे. बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांत एकसत्तात्मक राज्याविषयींची गोडी हळूहळू नाहींशी होऊन लोकसत्तात्मक राज्य असावें, असें ज्याप्रमाणें लोकांस वाटूं लागलें त्यांतलाच हा प्रकार होय, व असें होणें हेंही स्वाभाविकच आहे, त्यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, हल्लीं दहा वीस किंवा पांच पन्नास वर्षांमध्यें जितकी लोकसंख्या वाढली आहे, तितकी पूर्वीं वाढली नसून त्या कालीं

लोक बरेच संपन्न होते. मोठमोठ्या कुटुंबाचें पोषण एकाच ठिकाणीं होण्यासारखी स्थिति होती. यामुळें माणसांस आपापलें कुटुंब सोडून देशांतरास निर्वाहाचें साधन मिळविण्याकरितां जावें लागत नसे. परंतु आलीकडे बरेच दिवस ही स्थिति हळूहळू नाहींशी होत जाऊन कुटुंबांतील दहा माणसांस दहा ठिकाणीं आपापल्या पोटापाण्याच्या तजविजीकरितां जाणें भाग पडूं लागलें त्यामुळें तेथेंच त्यांचा परिवार वाढून मूळ कुटुंबाशीं असलेला संबंध सहजच सुटत चालला. यामुळें महत्वाकांक्षा व स्वतंत्रतेची इच्छा या प्रवृत्तींस अधिकाधिक अवसर मिळूं लागला.

महत्वाकांक्षेचीं उदाहरणें इतिहासांत बरींच आढळतात; त्यांपैकीं कांहीं येथें सांगतों.

**शिकंदर** बादशहानें बहुतेक **पृथ्वी** जिंकली असतांही त्याची महत्वाकांक्षा अवशिष्ट राहिलीच राहिली ! असें सांगतात कीं, शेवटीं सर्व **पृथ्वी** जिंकल्यावर, 'आतां मला जिंकण्यास कांहीं उरलें नाहीं' असें ह्मणून त्यानें अश्रुपात केला ! **नेपोलिअन बोनापार्ट** ह्मणजे महत्वाकांक्षेची प्रत्यक्ष मूर्तिच होती ! **कोलंबस** याची महत्वाकांक्षा प्रथमतः 'सुवर्णभूमि' ह्मणजे आमची भरत-भूमि ही पाहण्याची असून त्यास अमेरिकाच सांपडली ! इंग्लंडचा पहिला **रिचर्ड** मोठा पराक्रमी राजा होता, त्याला 'सिंहहृदयी' अशी पदवी प्राप्त झाली होती. त्यानें एशियांतील '**पालेस्टाईन**' ह्मणजे **ख्रिस्ताची** मूळ जन्मभूमि ती मुसलमानांच्या हातून सोडविण्याकरितां, अनेक धर्मयुद्धें करून कोट्यवधि माणसांची प्रणहानि केली ! तो तरी महत्वाकांक्षेचाच परिणाम होय. आमचे इकडील राजर्षि जो **विश्वामित्र** त्यानें आपणास नुसतें ब्रह्मर्षि म्हणवून घेण्याकरितां केवढा प्रचंड कलहाग्नि पेटवून दिला ! आलीकडच्या इतिहासांतील महत्वाकांक्षेचीं प्रसिद्ध उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे **शिवाजी महाराज, नानाफडणवीस, सदाशिवरावभाऊ** हीं होत. **सदाशिवरावभाऊं**ची तर अशी इच्छा होती कीं, आपला प्रिय पुतण्या **विश्वासराव** याला दिल्लीपति करावा ! ही आपली महत्वाकांक्षा पूर्ण करावी एतदर्थ त्यानें आपल्या प्राणाचाही बळी दिला ! अशीं महत्वाकांक्षेचीं उदाहरणें स्त्रियांतही आहेत. **कुन्ती** व **गांधारी** यांजमध्यें **गज्ञ-गौ-**

रीच्या संबंधानें केवढें भांडण माजून राहिलें होतें ! **रामचंद्रासारखा** सत्वस्थ व पितृभक्त मुलगा असतां तो आपला सापत्न मुलगा म्हणून **कैकेयीनें दशरथाला** केवढ्या घोंटाळयात पाडिलें ? फार काय—आपला सख्खा मुलगा जो **भरत** त्यास राज्य-पद मिळावें म्हणून बिचाऱ्या सद्गुण-मूर्ति **रामचंद्राला जानकी** व **लक्ष्मण** यांसह वनवासासही लाविलें. **सत्यभामा** तरी काय कमी होती ? त्याचप्रमाणें, **आनंदीबाई** व **गोपिकाबाई** वगैरे स्त्रियांच्या महत्वाकांक्षेचीं उदाहरणें अर्वाचीन इतिहासांत सांपडतात. प्रसिद्ध **झांशीची** राणी महत्वाकांक्षेच्या भरांत धारा-तीर्थी मरून गेली; परंतु इंग्रजबहाद्दरांना तिनें आपली पाठ दाखविली नाहीं. सारांश, ही महत्वाकांक्षा जगांत जसे लहानमोठे, बरेवाईट खेळ करिते तसे कुटुंबांतही तिचे खेळ दृष्टीस पडले तर, त्यांत कांहीं आश्चर्य आहे काय ?

**स्वतंत्रतेची इच्छा**—मनुष्यमात्रास स्वातंत्र्य प्रिय असतें. दुसऱ्यांच्या आज्ञेंत राहणें, दुसऱ्यांच्या तंत्रानें वागणें, हें त्यांस अपमानकारक, नीचत्व आणणारें, असें भासतें. स्वतंत्रतेच्या इच्छेस विरोध आला ह्मणजे मग सहजच कुटुंबांतील मनुष्यांत द्वेषभाव उत्पन्न होतो. त्यांतून अलीकडे इंग्रजी विद्याप्रसारानें तर लोक अधिकाधिक स्वातंत्र्यप्रिय होत चालले आहेत, या कारणानें, आजपर्यंत कुटुंबांतील मनुष्यें जशीं एकमेकांच्या तंत्रानें वागत असत, तशीं पुढें वागण्याचा संभव हळूहळू कमी होत चालला आहे. आतां, या संबंधानें कदाचित् कोणी असा आक्षेप घेतील कीं, पूर्वीच्या काळीं लोकांच्या मनांत स्वतंत्र रहाण्याची इच्छा मुळींच नव्हती कीं काय ? व ही इच्छा अलीकडेच **देवानें** लोकांच्या मनांत उत्पन्न केली कीं काय ? या प्रश्नाचें समाधान इतकेंच कीं, ही इच्छा मनुष्यमात्रास जात्याच असते. ती पूर्वींचे काळीं नव्हती असें नाहीं, तथापि तिचा परिणाम दुसऱ्या अनेक कारणांमुळें लोकांच्या मनावर जितका व्हावा, तितका होत नसे. स्वधर्मावर श्रद्धा, जनापवाद, बहुत दिवसांपासून चालत आलेल्या रूढींचें बंधन, आईबापांविषयीं किंवा वडिल माणसांविषयीं पूज्यबुद्धि, कुटुंबाचा वियोग दुःसह वाटणें, अशा कांहीं कांहीं कारणांमुळें, या स्वातंत्र्याच्या इच्छेचा पगडा मनावर विशेष बसत नसे. राज्यक्रांतीमुळें व विचारक्रांतीमुळें त्या कारणांचें सामर्थ्य कालेंकरून कमी होत गेलें,

यामुळें स्वतंत्र वागण्याची इच्छा सहजच बळावत गेली; परंतु आमच्या दुर्दैवानें खरें स्वातंत्र्य ह्मणजे काय याची कल्पना लोकांस न होऊन ज्याच्या योगानें पूर्ण पारतंत्र्य चिकटेल अशालाच ते स्वातंत्र्य समजूं लागले! 'व्यक्तिस्वातंत्र्य' या विषयावर एक निराळाच स्वतंत्र ग्रंथ होईल. तेव्हां या ठिकाणीं खऱ्या स्वातंत्र्याचें निरूपण यथासांग कसें करितां येईल? तथापि, स्वातंत्र्याची इच्छा, ही मनुष्याच्या अंतःकरणांत प्रबळ असते. व एकत्रपणाच्या स्थितींत अनुभवास येणाऱ्या पारतंत्र्यास मन विटून, मनुष्यास स्वतंत्र होण्याविषयीं ही इच्छा बऱ्याच अंशानें उद्युक्त करिते, ही गोष्ट निर्विवाद आहे. वस्तुतः पहातां, आपला समग्र देश अत्यंत लज्जास्पद अशा पारतंत्र्याखालीं चेंगरून गेला असतां, आपण आपल्या कुटुंबांतून निराळे झालों, व आपला हिस्सा निराळा काढून घेऊन स्वतंत्र ह्मणवून राहिलों, तरी कपाळीं जें पारतंत्र्य लागलें आहे, तें तेवढ्यानें चुकतें आहे काय? पण इतका खोल विचार मनुष्यमात्रास कोठून सुचणार व सुचला तरी, त्या विचाराचा परिणाम त्या आकुंचित मनावर कसा होणार? 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी उदात्त चित्तवृत्ति फारच थोड्यांची असणार. दुसरें असें होतें कीं, स्वतंत्रतेविषयींची जी इच्छा आमच्या लोकांस होते, तिचा बहुधा दुरुपयोग होतो. ह्मणजे ती स्वतंत्रतेची इच्छा स्वजनांशीं व आपल्या कुटुंबांतल्या माणसांशीं कलह करण्यास मात्र उद्युक्त करिते. तिच्या योगानें आमच्या अंगीं उद्योगपरायणता, आत्मसंयमन, स्वदेशभक्ति, आत्मावलंबन, वगैरे चांगले चांगले गुण जडावे ते न जडतां, आह्मी व्यसनासक्त, निरुद्योगी, उदासीन, असे मात्र होतों. वास्तविक जी स्थिति आहे ती सांगणें भाग आहे. ज्या प्रकारची आमची स्वतंत्रतेची इच्छा हल्लीं माजून राहिली आहे, ती बरी आहे किंवा वाईट आहे, याचा येथें अधिक विचार करण्याची गरज नाहीं. तिच्या योगानें कलहास उत्तेजन मिळून, आमच्यांत विभक्तपणा करण्यास ती बऱ्याच अंशानें कारणीभूत होते, एवढेंच आह्मांस येथें सांगावयाचें आहे.

याखेरीज खालीं लिहिलेलीं कारणें कलहास उत्पादक होतात. तीं:--

**स्वभाववैचित्र्य.**—आपल्यांत ह्मण आहे कीं, 'जितक्या व्यक्ति, तितक्या प्रकृति'. या जगांत एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीसारखी नसते.

जसे एका माणसाचे अवयव दुसऱ्या माणसाच्या अवयवांसारखे नसतात, त्याचप्रमाणें एकाचे आचारविचार दुसऱ्याच्या आचारविचारांशीं मिळत नाहींत. प्रत्येकाची बुद्धि निराळी, विचार निराळे, संवयी निराळ्या, असा प्रकार संसारांत दृष्टीस पडतो. कोणी स्वार्थासाठीं दुसऱ्याच्या माना कापितात; कोणी परोपकारास्तव तनमनधनाचा निरंतर व्यय करण्यासाठीं सिद्ध असतात; कोणी कामुक व विषयलंपट होऊन शरीराची व द्रव्याची हानि करून घेतात. कोणास द्रव्याच्या अभिलाषाची जबरदस्त पीडा असते; कोणाचा रागच फार अनिवार असतो; कोणाला दुसऱ्याचा घात, विपत्ति, दुःख, यांतच संतोष वाटतो; कोणी दुसऱ्याचें सुख व उत्कर्ष पाहून सुख मानितो; अशा निरनिराळ्या स्वभावांच्या मनुष्यांनीं भरलेली ही पृथ्वी आहे. ही बाह्यसृष्टि जशी विचित्र आहे, त्याप्रमाणेंच अंतःसृष्टिही बहुविध आहे. कुटुंबांत एके ठिकाणीं पुष्कळ मनुष्यें रहात असतात, त्यांचे स्वभाव निरनिराळे असल्यामुळें, त्या निरनिराळ्या तत्त्वांचें परस्पर संघर्षण होण्याचा नेहेमीं संभव असतो. मनुष्यांच्या प्रकृति भिन्न भिन्न असतात. कांहीं माणसें शांत असतात व कांहीं रागीट असतात; कांहींस दुसऱ्यावर दया करावीसें वाटतें व कांहीं दुसऱ्याचा छल करण्यास तत्पर असतात; कोणतेंही काम करणें झाल्यास कांहीं माणसें विचार करून करितात व कांहींस विचार म्हणजे काय हें मुळींच समजत नाहीं; कांहींस स्वप्राणापेक्षांही सत्य अधिक आंवडतें व कांहींस पदोपदीं खोटें बोलल्यावांचून होतच नाहीं; कांहींस द्रव्याची म्हणून बिलकूल पर्वा नसते व कांहींस शिवराई खर्च करणें म्हणजे महत्संकट वाटतें; कांहीं बहुभाषी असतात व कांहीं मितभाषी असतात; कांहीं सदाचारी असतात व कांहीं दुराचारी असतात; कांहींस नवीं मतें आवडतात व कांहींस जुनींच मतें प्रिय वाटतात; कांहींस दुसऱ्याची वस्तु विषतुल्य वाटते व कांहींस दुसऱ्यांच्या व आपल्या वस्तूंत भेदच वाटत नाहीं; कांहीं डौली असतात व कांहींस साधेपणाच आवडतो; कांहींस उद्योगावांचून काळ घालविणें जिवावर येतें व कांहींस हातपाय हालवावे असें वाटतच नाहीं; कांहींस व्यापारांत भांडवल घालावेसें वाटतें, कांहींस शेतींत घालावेसें वाटतें, कांहींस जमिनींतच पुरून ठेवावेसें वाटतें, व कांहींस

दागिनेच करावेसें वाटतें ! असो, असें हें स्वभाव-वैचित्र्य, विचार-वैचित्र्य किंवा रुचि-वैचित्र्य जगांत असल्या कारणानें, कुटुंबांतील मनुष्यांत भिन्न भिन्न मतें उत्पन्न होऊन, त्या योगानें अर्थात् कलहाचें बीजारोपण होतें.

अलीकडे आमच्या मध्य-वर्गांतील कुटुंबांत हें स्वभाव—वैचित्र्य अधिक होत चाललें आहे, असें आढळतें. एकास वाटतें, आपल्या स्त्रीस लिहितां वाचतां यावें, आपल्या स्त्रीनें नूतन '**स्त्री-हायस्कुलांत**' जावें, व ज्ञान-संपन्न व्हावें. परंतु इकडे पहावें तों त्याचा बाप, किंवा त्याची आई, व-हिणी, काका, काकू, यांस हा प्रकार मुळींच आवडत नसून, तेवढ्याच कारणाकरितां तो मुलगा व त्याची बायको त्यांस अप्रिय वाटूं लागतात! **रमाबा-ई** जर घरांत एकीकडे एखादें पुस्तक घेऊन वाचीत बसली, तर तिची सा-सू **लक्ष्मीबाई**, किंवा नणंद **ठकूताई**, त्या बिचारीला नासकें कुचकें बोलून पुरेपुरेसें करते ! * समजा कीं, एखाद्या मुलीच्या शाळेंत बक्षिसें वांटण्या-चा समारंभ व्हावयाचा आहे व त्या प्रसंगीं **रमाबाईच्या** नवऱ्यास 'आ-पण या समारंभास सहकुटुंब येऊन समारंभ साजरा करावा.' अशा प्र-कारची आमंत्रणचिठ्ठी आली, व त्यानें **रमाबाईजवळ** त्या आमंत्रणाची गोष्ट काढिली व 'तूं मजबरोबर चल,' असें त्यानें तिला सांगितलें अ-

---

* प्रस्तुत स्थळीं रमाबाईचा कैवार आह्मीं घेतला असें पाहून आमच्या एका मित्रा-नें, "आपलीं गृह-कृत्यें करण्याचें टाकून देऊन, रमाबाईनें असें केलें तर, हें चांगलें के-लें काय ?" असा प्रश्न केला होता. त्यावर आह्मीं उत्तर दिलें. 'रमाबाई घरांतलें काम आटोपल्यावर फावल्या वेळीं करमणुकीकरतां एखादें पुस्तक घेऊन वाचीत बसली, तर त्यांत काय तिनें कोणाचें घोडें मारिलें ? किंवा वडिलांचा अपमान केला ? चमत्कार अ-सा कीं, शेजारच्या चिमाबाईशीं उगीच कांहीं गप्पा सांगत, उगीच कांहीं वायफळ बोल-त, किंवा परक्याची निंदा करीत बसली तर, त्या रमाबाईचें इतकें कोणास वाईट वाटत नसतें, इतका तिटकारा तिच्या वाचनाचा घरांतील इतर बायकांस येत असतो ! कालें-करून ही स्थिति कोठें कोठें कमजास्ती होत चालली आहे, ही गोष्ट निराळी. परंतु सद्-गृह प्रश्न आमच्या विद्वान् मित्रांनीं आह्मांस मोठ्या गंभीरपणानें विचारला, हें पाहून फा-रच आश्चर्य वाटलें ! कशीदा काढीत बसणें, रांगोळी घालणें, किंवा गाणीं ह्मणत बसणें अशा प्रकारच्या करमणुकीच्या गोष्टी माहेरवाशिणी करीत असतात, त्यांस कोणी हरकत करीत नाहीं. कांहीं ठिकाणीं सासुरवाशिणीही करितात. असें असतां एखादें पुस्तक वा-चीत बसणें, यांतच काय मोठेसें पातक घडत असेल, किंवा धर्म-विरोध होत असेल, या-ची कल्पना खरोखर आह्मांस करितां येत नाहीं !

**नि. का.**

सतां, ती ह्मणते, 'थोरल्या बाई येतील किंवा वन्सं येतील तर मी येईन-नाहीं तर कशी बरें येऊं?' वन्संनां किंवा थोरल्या बाईनां विचारायला गेली म्हणजे, त्यांनीं कपाळास आंठ्या घालून नाकें मुरडून ह्मणावें, "तूं आपली जा बाई, तुझ्या नवऱ्याची परवानगी तुला आहे. इश्शश बाई! आम्हाला नकोत हे नवे नवे ढंग आणखी हें पुरुषांत जाणं! तेथें तो मेला साहेब येणार आहे म्हणून म्हणतात!" झालें. असा प्रकार झाल्यावर त्या रमाबाईला एकीकडे आड आणि एकीकडे विहीर. 'मी येत नाहीं' असें ती म्हणाली तर इकडे नवऱ्याची मर्जी खप्पा होणार* व तिला स्वतःलाही जर तो समारंभ पहाण्याची हौस असली, तर तीही पुरी होत नाहीं. बरें, 'येतें' म्हणून जर म्हणावें, तर सासू किंवा नणंद किंवा थोरली जाऊ म्हणणार, 'काय मेला तरी चमत्कार, शेवटीं आपण आपली एकटी नवऱ्याबरोबर गेली!'

कधीं असा चमत्कार घडतो. घरांत लग्नकार्य निघालें ह्मणजे या स्वभाव-वैचित्र्याचा व रुचि-वैचित्र्याचा प्रकार कसा स्पष्ट दिसतो पहा.

---

* प्रस्तुत स्थळींही पूर्वीं निर्दिष्ट केलेल्या आमच्या मित्रानें आम्हास सवाल केला तो येणेंप्रमाणें:—"काय म्हणे नवऱ्याची मर्जी खप्पा होणार—ती कां म्हणून? त्या सुशिक्षित नवऱ्यानें समाजाच्या ठरीव रुढीविरुद्ध एकदम मुळीं अगोदर जावेंच कां?" यावर आह्मीं त्यास उत्तर दिलें:—"त्याची मर्जी खप्पा होऊं नये, आणि होते हा त्याचा मूर्खपणा आह्मी ह्मणतों कदाचित् कबूल करितां येईल- परंतु, प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आपणास जगांत वस्तुतः गोष्टी घडत आहेत कशा, हें पहाणें आहे. नवऱ्याची मर्जी मानवी पडल्यामुळें 'खप्पा' होते ही गोष्ट खरी. माणसाच्या मताप्रमाणें किंवा अभिरुचीप्रमाणें कोणतीही गोष्ट घडली नाहीं, ह्मणजे त्यास राग येणें हा सृष्टिनियमच आहे, यापेक्षां अधिक काय सांगतां येईल? आलीकडील सर्व सुशिक्षित नवरे म्हणजे तुम्ही का प्रत्यक्ष शुक्राचार्य समजतां कीं काय? ह्मणजे त्यांचा आत्मनिग्रह इतका कीं ज्यांनीं आपले राग, लोभ, गर्व इत्यादि विकार चटसारे मारून टाकिले आहेत! आतां एवढें बरोक म्हणतां येईल खरें कीं वर ज्या विकारांचा किंवा कारणांचा उल्लेख आह्मीं केला तीं कारणें किंवा ते विकार जर जगांत मुळीं नसते तर हल्लीं जग जितकें कठोर, कंटक-मय, अमंगल व विघ्नमय आहे, तितकें नसून फार मृदु, मंगल व शांतिसुखानें भरलेलें असें झालें असतें! आणि मग विभक्तपणारूप किंवा सुधारणा-किंवा कुधारणारूप कां होईना-जें विघ्न तुह्मी मानितां व दूर करण्याची इच्छा करितां तें पाहण्याचा तुह्मांस प्रसंगच आला नसता! असो. सारांश, वस्तुस्थिति काय आहे एवढेंच या निबंधांत दाखविण्याचा आमचा मुख्य उद्देश आहे.

नि. का.

बायकामंडळीस मिरवण्याकरितां, ब्यांड पाहिजे, ताशा पाहिजे; पुरुष जर अंमळ विचारी व समंजस असले तर हीं दुष्ट रणवाद्यें अशा मंगल–प्रसंगीं त्यांस नकोतशीं वाटतात. पण उपयोग काय? त्या म्हणतात कीं, 'ताशा नसला, तर आह्मी घराबाहेर पाऊल टाकणार नाहीं!* असें समजा कीं, एकत्र–कुटुंबांत एकाच्या मनामध्यें असें आलें कीं, मुलीला सातवें किंवा आठवें वर्ष लागलें, आतां तिचें लग्न केलेंच पाहिजे. बरें, त्याच कुटुंबांतील दुसरा मनुष्य, आलीकडील नव्या मताचा असल्यामुळें, त्यास वाटतें कीं, त्या मुलीस दहावें वर्ष लागल्याखेरीज तिचें लग्न करूं नये.

---

* या ठिकाणीं एकानें असें म्हटलें होतें कीं "अशा प्रसंगीं स्त्रियांच्या हौशी पुरविण्याकरितां पुरुष आपले विचार किंवा अभिरुचि एकीकडे गुंडाळून ठेवीत नाहींत काय? तर मग तंटा कां? आणि अशा क्षुल्लक कारणावरून पुरुषांनीं स्त्रियांपासून विभक्त रहाणें योग्य होईल काय? आम्हीं वर जें उदाहरण दिलें आहे, तें पुरुष स्त्रियांपासून, किंवा स्त्रिया पुरुषांपासून विभक्त होतात या गोष्टीचा संबंध आणण्याकरितां दिलें नाहीं. कधीं कधीं केवळ रुचि-वैचित्र्य, गैरमेळास किंवा कलहास कारणीभूत होतें एवढें-च दाखविण्याच्या हेतूनें दिलें आहे. वर दिलेल्या उदाहरणांत स्त्रियांच्या ऐवजीं समजा कीं पुरुषांपैकींच कोणा असा हट्ट घेतला कीं, ब्यांड पाहिजे व ताशाही पाहिजे; आणि हीं वाद्यें असल्याखेरीज लग्नास शोभाच नाहीं! असें झालें तरी परिणाम सारखाच होणार कीं नाहीं! वितुष्ट व्हावयाचें तें होणारच आहे. क्षुल्लक कारणांवरून वितुष्ट उत्पन्न होऊं नये हें म्हणणें ठीक आहे. क्षुल्लक कारणांवरून कलह करावा असें आह्मी तरी कोठें प्रतिपादन करीत आहों? आमचें ह्मणणें एवढेंच कीं अशा अनेक क्षुल्लक गोष्टी एकत्र होऊन कुटुंबांतील माणसांत वितुष्ट उत्पन्न करण्याला कारणीभूत होतात ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे असें आह्मांस वाटतें.

काहीं दिवसांपूर्वी केसरींत 'नीतिमीमांसा' या सदराखालीं जे निबंध प्रसिद्ध झाले आहेत त्या निबंधांत या संबंधानें आह्मीं एक टीप दिली होती. तिचा संग्रह प्रस्तुत स्थळीं आमच्या वाचकांकारितां करणें इष्ट दिसतें:—ती अशी:—

"आमच्या उत्सव-प्रिय व सोसाळू स्त्रिया व आह्मी पुरुष, यांजमध्यें प्रस्तुत संबंधाचा किती फरक आढळतो! लग्नादि उत्सव-प्रसंगीं पुण्यासारख्या किंवा मुंबई सारख्या ठिकाणीं बासरी, मुरली, सनई, सुंदरी, अलगुज, इत्यादि मधुर-वाद्यें वाजविणारे लोक मिळण्यासारखे असतां, आमच्या स्त्रियांस तास व 'इंग्रजी बाजे' इत्यादिकांसारखींच कर्ण-कठोर रणवाद्येंच प्रिय होतात, किंवा तशा प्रसंगीं अवश्य वाटतात! 'पिछेसे आई आगे चली!' कसेंही असो, परंतु अशा प्रसंगाच्या तडाक्यांत आह्मी अनेक वेळ सांपडलों गेल्यामुळें आह्मी आपला अनुभव सांगतों. तो पुरुषांचा गंभीर समाज, व शालजोड्यांचा भार वहाणाऱ्या स्त्रियांचा तो थाट पाहून, एका अर्थी मोठी मौज वाटते; पण बिचाऱ्या सुस्वर सनईच्या आवाजांत तो ताशांचा कडकडाट, व 'भों भों करणाऱ्या'

( पुढें चालू. )

तेव्हां या ठिकाणीं मत—भेद येऊन विचाराची गोष्ट आली की नाहीं? अर्थात् दोघांपैकीं एकास हार गेलें पाहिजे. किंवा दुसरी काहीं तडजोड काढिली पाहिजे. किंवा असें समजा कीं, घरांत बाळ्याचें लग्न निघालें, बाळ्याच्या चुलत्यास रोजगार मोठा असल्यामुळें, त्यास वाटलें कीं, आपलें थोरामोठ्याचें घर, लग्न—समारंभ मोठ्या कडाक्यानें उडाला पाहिजे! त्याचा दुसरा चुलता नवीन विचाराचा किंवा नव्या मताचा असल्या कारणानें तो म्हणतो कीं, आपल्या देशास दिवसानुदिवस दरिद्रावस्था अधिकाधिक प्राप्त होत चालली आहे. जे विधि अवश्य केलेच पाहिजेत, व जो खर्च अवश्य केलाच पाहिजे, तेवढा करून पुष्कळ खर्चाच्या बाबतींस फांटा द्यावा. वेड्यावांकड्या हौशी न पुरविल्या तरी चालेल. तेव्हां अशा ठिकाणीं त्या दोघांच्या मध्यें वितुष्ट येण्याचा प्रसंग येणार कीं नाहीं? याप्रमाणें संसारांत नेहमीं घडून येणारीं अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. सारांश रुचि—वैचित्र्यामुळें परस्पर गैर समजुती होऊन, एकमेकांचीं मनें एकमेकांबद्दल कशीं विटतात, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

**प्राप्तींत कमजास्तपणा—परमेश्वरानें** सर्वांस सारखी बुद्धी किंवा सारखी शक्ति दिली आहे, असें नाहीं. माणसें एकत्रपणांत जरी असलीं तरी तीं सगळीं सारख्याच बुद्धीचीं असतात असें नाहीं. दैवयोगानें ह्मणा, किंवा उद्योगानें ह्मणा, किंवा विद्येनें म्हणा, निरनिराळ्या मनुष्यांच्या प्राप्तींत कमजास्तपणा असतोच असतो. यामुळें, एवढ्याच संबंधानेंही वैषम्य उत्पन्न होतें. एकत्र कुटुंबांत साधारणतः अशी कल्पना आहे कीं, कुटुंबाचे संबंधानें सर्वां-

---

बेंडबाजाचें स्वारस्य यांची ती मिश्र चटणी कर्णास किती रुचकर लागते ह्मणून सांगावी-अशा वेळीं खरोखर सूक्ष्मावलोकनांतीं असें दिसेल कीं, त्या मंगल-प्रसंगीं त्या नाना कर्ण-कठोर-ध्वनींची अमंगळ भेसळ पाहून किंवा ऐकून पुरुषांपैकीं बहुतेक व्यक्ति वेडीं वांकडीं तोंडें करितात, नाकें मुरडतात, व आपणास प्रतिकूल वेदना उर्फ त्रास होतो, असें दाखवितात पण बिचाऱ्या बायकांकडे पहावें तों बहुतेक व्यक्ति हंसत बोलत जात असून प्रसन्नमुख दिसतात! यामुळें 'जी कांहीं मौज आहे, ती यांतच आहे,' असें त्यांस वाटत असावें, असें अनुमान होतें. हें उदाहरण प्रस्तुत स्थळीं वाचकांनीं लक्षांत वागविण्यासारखें आहे.

नि. का.

चे सारखेच हक्क असतात, निदान पुरुषाचे संबंधानें तरी असतातच असतात. अशा स्थितींत, तीं माणसें निरनिराळे उद्योग करीत असून, त्यांची प्राप्ति कमजास्त असली ह्मणजे, सहजच त्यांच्या प्राप्तीच्या मानानें कुटुंबांत त्यांचा मानापमान होतो. त्यांत कांहीं जर श्रम न करणारे असतील, किंवा त्यांची प्राप्ति फारच कमी असेल, तर त्यांची किंमत इतरांस कांहींच वाटत नाहीं, एवढेंच नव्हे, तर त्यांच्या मनांत त्यांजविषयीं तिरस्कारबुद्धिही उत्पन्न होते. अशा प्रकारानें कलहाचें बीज उत्पन्न होत असतें.

**श्रमविभागाचा अभावः**–ज्याप्रमाणें एकंदर व्यवहारांत, त्याचप्रमाणें कुटुंबाच्या व्यवसायांतही, श्रमविभाग असणें, हें अगदीं अवश्य आहे. परंतु, एकत्रपणांत राहिलेल्या पुष्कळ कुटुंबांत कालेंकरून असा परिणाम होत जातो कीं, या श्रमविभागाकडे अगदींच दुर्लक्ष होत जातें. एकत्र स्थितींत असतांना परावलंबनाचा प्रकार जास्त वाढत असतो. प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें झटून श्रम करणें व देवानें आपणास जी बुद्धि दिली आहे, त्या बुद्धीचा उत्तमोत्तम उपयोग करून घेणें, हें व्हावें तसें होत नाहीं. ज्या मानानें माणसांचीं मनें विचारसंपन्न होत जातात, त्या मानानें प्रत्येक व्यक्तीचें जें हित तेंच समाजाचें हित, ही गोष्ट त्यांस कळून उद्योगपरायणता त्यांच्या अंगीं येते. प्रत्येक मनुष्यास आपला आदा किती व खर्च किती, याचें अनुमान बरोबर करतां आलें पाहिजे, हें उघड आहे. स्वतःवरच कुटुंबभरणाचें ओझें पडत असलें ह्मणजे, द्रव्य संपादन करणें किती कष्टकारक आहे, व त्याचा विनिमय कसा केला पाहिजे, हें चांगलें कळून येतें. पोटासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यानें, मनुष्याची योग्यता आणि स्वातंत्र्य हीं कमी होतात; त्यामुळें उद्योग मागें पडतो. जो मिळविणारा असतो, त्याला वाटतें, मी एकटाच कष्ट करकर करितों, व मला एकट्याला हीं इतकीं माणसें पोसावीं लागतात, हें कां? खरोखर एकट्यानें मिळवावें व बाकीच्यांनीं स्वस्थ बसून खावें, हें चांगलें नाहीं, हें कोणीही कबूल करील. यावरून अशी तोड निघते कीं, कुटुंबांतील सर्व जाणतीं माणसें जर आपापल्या शक्तीप्रमाणें व बुद्धीप्रमाणें उद्योग करितील, व संसारशकटास हातभार लावितील तर एक मोठी कुरकुर टळणार आहे. आणि कलहाच्या

व विभक्तपणाच्या एका मुख्य कारणाचा वींमोड होणार आहे. एकानें किंवा कांहींनीं मिळवावें, व बाकीच्यांनीं नुसतें आळशासारखें भुईभार होऊन खात बसावें, असा प्रकार पुष्कळ कुटुंबांतून दृष्टीस पडतो. या संबंधानेंही कांहीं गोष्टी विचार करण्य सारख्या आहेत. ह्मणजे कधीं कधीं श्रमविभाग संसारकृत्यांत पूर्णपणें आढळतो. कुटुंबांत जा लहान बालकें असतील, त्यांजबद्दल विभागाच्या अभावाची नुसती कुरकुरही करितां येणार नाहीं. कारण, बोलून चालून अज्ञान बालकें; तीं कुटुंबास हातभर काय लावणार? स्त्रिया असतात त्यांस गृहकृत्यांपैकीं तीं तीं कामें करावीं लागतातच; म्हणजे, त्यांजकडे दळणकांडण, केरपोतेरें, मुलांची शुश्रुषा, स्वयंपाक करणें, पाणीं आणणें, धुणीं धुणें, वगैरे उद्योग असतात; आणि कांहीं स्त्रिया न करतील तर, त्यांनीं कांहीं तरी कामें केलींच पाहिजेत, हें रास्त आहे. कुटुंबाच्या माणसांपैकीं जर कांहीं वृद्ध माणसें असलीं तर, त्यांचें संगोपन इतरांस केलेंच पाहिजे. कारण तें त्यांचें कर्तव्यकर्म होय; एवढेंच नव्हे, तर अशा माणसांचें दुःख, त्यांजवर दयेनें म्हणा, किंवा ममतेनें म्हणा, जेणेंकरून कमी करितां येईल, अथवा त्यांस त्याचा विसर पाडितां येईल, तीच गोष्ट केली पाहिजे; हेंच मनुष्यपणाचें लक्षण होय. हेंच खरें औदार्य, व हीच खरी धार्मिकता! असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां राहतां राहिली पुरुष मंडळी. अशी जर कांहीं असली तर, त्यांनीं उद्योगशाली व्हावें, हें आह्मीं वर सांगितलेंच आहे, आणखी यापेक्षां जास्ती काय सांगतां येईल?

परंतु, अशा प्रकारचा श्रमविभाग ज्यांत बरावर आहे, व कुरकूर करण्यास ज्यांत जागा नाहीं, अशीं सर्वच कुटुंबें असतात असें म्हणतां येणार नाहीं. ज्या कुटुंबांत आळशी, फुकटखाऊ, पोशीं, निरुद्योगी, अशीं कांहीं माणसें असतात, अशांची संख्या बरीच सांपडेल, नाहीं असें नाहीं. आणि ज्या ठिकाणीं अशीं माणसें असतात, तेथें त्यांच्याविषयीं इतर उद्योगी माणसांच्या मनांत वैषम्य आल्याशिवाय रहात नाहीं. आणि उद्योगी मनुष्यास विनाकारण कलह माजविण्यास, किंवा दुसऱ्याच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत बसण्यास, फुरसतच सांपडत नाहीं. तीं आपापल्या कामांत निमग्न असतात. आळशी मनुष्यांस कधींही चैन नस--

तें. त्यांच्या मनास कशाचा व्याप नसतो. यामुळें कलह उत्पन्न करण्यांतच त्यांस मौज वाटते. ज्या कुटुंबांत योग्य श्रमविभाग असतो, व ज्यांतील माणसें उद्योगरूप व स्नेहरूप पाशानें बद्ध झालेलीं असतात त्यांचें सामर्थ्य कांहीं विलक्षण असतें. जशीं एकमेकांस चिकटून नम्रतेनें राहिलेलीं लव्हाळ्याचीं झाडें कितीही मोठा पूर आला, किंवा सोसाटयाचा वारा सुटला, तरी त्यास दाद देत नाहींत, तसेंच त्या कुटुंबावर कितीही संकटें आलीं, कशीही विपत्ति लोटली, तरी त्याला तें कुटुंब दाद देत नाहीं.

**अज्ञान**—कुटुंबांतील कलहाला अज्ञान हें एक कारण असतें. जर कुटुंबांतील माणसें समजूतदार असलीं, आपलें खरें हित कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे, हें त्यांस चांगलें कळत असलें, तर तीं कधींही परस्परांशीं भांडत नाहींत. प्रत्येक व्यक्तीच्या योग्य अडचणी जर दूर होतील ह्मणजे प्रत्येकाच्या सुखाला आवश्यक अशा ज्या गोष्टी त्या सर्व जर त्याला अनुकूल असल्या, तर कोणतीही कुरकूर रहाणार नाहीं. कारण, आपण विभक्त झालों म्हणजे, सध्यांच्या एकत्रपणांत आपणास ज्या कांहीं उणीवा वाटतात त्या नाहींनशा होतील, असें विभक्त होऊं इच्छिणारांस वाटतें, त्या उणीवाच जर नाहींतशा केल्या, ह्मणजे त्यांची पूर्तता एकत्रस्थितींत असतांच करितां आली, तर कलहाचें कारणच राहणार नाहीं. एकत्र कुटुंबांतील बायकामाणसांचें नेहेमीं परस्पर संघर्षण होत असतें.

ज्या ठिकाणीं लहानमोठ्या वयाच्या दहा बायका असतात, त्यांच्यामध्यें बहुधा अशा प्रकारचीं बोलणीं चालतात. "वहिनीबाई दादाशीं बोलल्या; दादा वहिनीबाईंच्या अंकित झाले, अमुक जावेनें, किंवा भावजयीनें किंवा नणंदेनें, एवढेंच काम केलें; सासूबाई अमुक अमुक बोलल्या; अमकीतमकीचे मुलास चांगलीं चांगलीं वस्त्रें, अमकीतमकीस दागदागिने चांगले केले, मला एवढेच कां असावे? माझा नवरा मिळवितो, त्यास कष्ट पडतात; अमकीचा नवरा फक्त घरचाच कारभार करून स्वस्थ बसतो; माझा नवरा देणें घेणें करून पैसे मिळवितो; अमकीस मुलें लेंकरें पुष्कळ; मलाच थोडीं किंवा मुळींच नाहींत; अमकीच्या मुलाचें लग्न झालें, त्याचा हुंडा फार घेतला, व्याही चांगला पाहिला,

लग्नही चांगलें झालें, दागिने पुष्कळ घातले.'' एक म्हणतेः—"माझे मुलीचें लग्न झालें त्या वेळीं इतका खर्च झाला नव्हता, व व्याहीही चांगला पाहिला नाहीं. लग्नप्रसंगीं अमुक जावेप्रमाणें माझी हौस पुरविली नाहीं, पायघड्यांवरून मिरवतांना पुढें दारूच फार सोडिली, अमकीचा भाऊ, अथवा बहीण, अथवा आई, किंवा भावजय, अमुक दिवस येऊन घरीं राहिली, माझ्या माहेरचें कुत्रेंसुद्धां यांच्या दारांत उभें राहिलें नाहीं!" एक का दोन—अशीं अनेक प्रकारचीं बोलणीं ऐकतांना, एखाद्यास हंसूंच यावयाचें!

आपल्या लोकांत नवराबायकोनीं कुटुंबांतील इतर माणसांदेखत परस्परांशीं कसें वागावें, अशाबद्दल कांहीं ठरलेल्या समजुती आहेत. घरांतील वडील माणसांच्या देखत नवऱ्यानें बायकोशीं किंवा बायकोनें नवऱ्याशीं बोलतां कामा नये. बोलतांना दुसऱ्यानीं पाहिलें म्हणजे, त्यांच्या तोंडून बहुधा अशा प्रकारचे उद्गार निघतातः—"काय बाई! निर्लज्जपणा हा! अशी कांहीं रीत कुठें पहाण्यांत येत नसेल.नवराबायको झालीं म्हणून काय झालें! कांहीं मर्यादा पाहिजे कीं नाहीं!काय बाई चमत्कार! दिवसंदिवस मनु पहावा तो अगदीं फिरत चालला!नवराबायकोनीं खोलींत गेल्यावर काय पाहिजे तें बोलावें!" वगैरे विशेषेंकरून दुर्दैवानें ज्या नणंदा घरीं आलेल्या असतात, त्यांस तर आपल्या भावजई, आपल्या नवऱ्यांशीं दिवसा उजेडीं व आपल्या देखत बोललेलें बिलकूल कसें तें खपत नाहीं! वैधव्यदुःखानें गांजलेल्या नणंदा आपल्या बापांच्या घरीं येऊन रहातात, अशीं उदाहरणें घरोघर आढळतात! परंतु आश्चर्य हें कीं, अशा नणदांसही आपल्या भावजई पतिसुखाचा उपभोग घेतांना पहावत नाहीं.त्यांस वाटतें, आमचे भाऊ व आमच्या भावजई यांनीं आम्हांस वाटतें तसेंच वागलें पाहिजे. आमच्या देखत त्यांनीं एकमेकांशीं बोलूं नये, हंसूं नये, खेळूं नये, एकमेकांकडे नुसतें पाहूंसुद्धां नये, घरांतील सगळें काम भावजयांनींच करावें, व आह्मी म्हणूं तसें त्यांनीं कराकर वांकावें, व आमच्याशीं नम्रतेनें वागावें.

अशा प्रकारें आमच्या स्त्रीवर्गाच्या अज्ञानाचें विवेचन करावें तेवढें थोडेंच. पूर्वींपासून स्त्रियांच्या दुःस्वभावाचें वर्णन स्फुट श्लोकांत वगैरे केलेलें आढळतें. हें पाहून विचारी मनुष्यास वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं. स्त्री

म्हणजे दुर्गुणांचें भांडें ! असा भयंकर आरोप अनेक पंडितांनीं केलेला बहुत ठिकाणीं आढळतो. आतां हा आरोप सर्वस्वी खरा आहे असें जरी धरून चाललें, तरी त्याचें खापर पुरुषांच्या डोक्यावर फोडणें वाजवी होत नाहीं काय ? प्राचीन काळीं व अर्वाचीन काळींही शहाण्या व सद्गुणी अशा पुष्कळ स्त्रिया होऊन गेल्या व हल्लींही कोठें कोठें आहेत, हें आजकाल कोणता समंजस पुरुष नाकबूल करणार आहे ? **रामलक्ष्मणांची** प्रीति परस्परांवर किती विलक्षण होती! तेही बंधूच होते.तथापि **जानकी**-च्या* शहाणपणामुळें व सौजन्यामुळें त्या उभयतां बंधूमधील प्रेम कसें निस्सीम राहिलें ? अशी वहिनी आमच्या आलीकडील प्रत्येक भावास मिळाली तर कुटुंबांतील सुख शतगुणित होणार नाहीं काय ? त्याचप्रमाणें, **पांच पांडवां**मध्यें तरी बंधुप्रीति कशी होती ? त्यांत कांहीं प्रसंगीं विवात होण्याचा योग आला तर, त्या महासाध्वी **द्रौपदीनें** आपल्या चातुर्यानें, त्यांचा एकविचार रहावा, व त्यांजमधील प्रेम कायम रहावें, म्हणून काय काय युक्त्या लढवाव्या !

**थोरले माधवराव पेशवे** यांची धर्मपत्नी **रमाबाई** हिचें चरित्र आमचे विद्वान् मित्र रा.रा.**विनायक जनार्दन कीर्तने** यांनीं आपल्या ऐतिहासिक नाटकांत दिलें आहे. तें वाचून कोणत्या पुरुषाच्या अंतःकरणांत त्या माउलीविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहील ? असो.

तात्पर्य, स्त्रियांच्या अज्ञानावस्थेस आपण पुरुषच कारणीभूत आहों, हें आपणास प्रांजलपणें कबूल केलेंच पाहिजे. पुरुष ह्मणजे जात्याच

---

* कनक-मृगाच्या पाठीमागें राम लागला व जानकीच्या रक्षणार्थ लक्ष्मण रानांत एकटाच राहिला. त्या प्रसंगीं कपटी राक्षसानें रामचंद्रासारखा "मेलों रे मेलों, लक्ष्मणा धांव!" असा करुण शब्द काढिला. तेणेंकरून जानकी भ्याली, व लक्ष्मणाला ह्मणूं लागली कीं, 'रामचंद्र कांहीं तरी संकटांत आहे, तूं त्याच्या साहाय्यास जा.' 'जानकीला एकटीला टाकून तूं जाऊं नकोस.' ह्मणून रामाज्ञा झाली होती. यामुळें लक्ष्मण जानकीचें प्रथम ऐकेना; यानंतर जानकीनें लक्ष्मणास कठोर अशा वाग्बाणांनीं ताडण केलें. त्यामुळें लक्ष्मणास फार दुःख झालें—वगैरे प्रसंग आमच्या लक्षांत नाहीं असें नाहीं. तथापि ती सर्व कपटी राक्षसी माया असून पति-प्रेमामुळें जानकी विव्हल होऊन, भलभलतें बोलूं लागली, ही गोष्ट विसरतां कामा नये.

व आइच्या पोटांतून निघाल्यापासूनच चांगला असतो, व बायकोची जात ह्मणजे मूळचीच वाईट असते, अशांतली गोष्ट नाहीं. दोघेही मनुष्य प्राणी आहेत. दोघांसही परमेश्वरानें बुद्धि दिली आहे. दोघांसही मनोविकार दिले आहेत. दोघांच्याही मनावर जसजसे चांगले किंवा वाईट संस्कार घडतील त्याप्रमाणें तीं बरीं वाईट निपजतील, ही गोष्ट अमळ सूक्ष्म विचार केला असतां ध्यानांत येण्यासारखी आहे. आपण असेंही पहातों कीं, पुष्कळ कुटुंबांत पुरुषही अज्ञान असतात, व बायका शहाण्या असतात. त्याचें पुरुषांच्या मनावर एक प्रकारचें वजन असतें. पुरुष दुराचारी निघाला असतां, त्याची बिचारी बायको सत्वस्थ वृत्तीची असल्यास आपल्यावर दुर्दैवानें ओढवलेलें दुःख किती धैर्यानें व संतोषवृत्तीनें सहन करीत असते!* पुष्कळ कुटुंबांतून सासुरवासिनींना असह्य सासुरवास होत असतो, अशीं उदाहरणें वारंवार आढळतात. पण त्या बिचाऱ्या मुली कितीएक दिवस तो सासुरवास मुकाट्यानें सहन करीत असतात, व दिवस लोटीत असतात. आपल्या सुनांस गांजणारी सासू कुटुंबांत असणें ह्मणजे त्या कुटुंबाचें सुख काय विचारावें!

---

* आमच्या प्रत्यक्ष अनुभवापैकीं अशी एक चमत्कारिक गोष्ट घडली कीं, एका कुटुंबांत तीन भाऊ असून, त्यांच्या तीन बायका होत्या. त्यांस त्यांची सासू फारच छळी. त्यांपैकीं एका बिचारीवर तर असा प्रसंग आला कीं, तिचा नवरा घरांतील कचकचीला त्रासून व वैतागून एके दिवशीं बैरागी होऊन चालता झाला! मग त्या पोरीला सासुरवास झाला तो काय विचारावा! पण पोर मोठी पाणीदार व धीराची होती. तिनें थोडक्याच दिवसांत, आपल्या नवऱ्याचा शोध लावण्याचा विचार करून घर सोडिलें. सहा महिनेपर्यंत प्रवास करितां करितां व पूसतपास करितां करितां, शेवटीं गाणगापुरासारख्या एका पुण्यक्षेत्रीं, बैरागी झालेला आपला पति मोठ्या युक्तिनें गांठिला. त्याची अनेक प्रकारें समजूत घालून, या साध्वीनें पुनः त्याला घरीं आणिलें! वर्ष सहा महिने लोटून गेले. उभयतां स्त्री-पुरुषांनीं संसार केला. ती गर्भवती झाली; तों पुनः ते फक्कड घर सोडून चालते झाले! याप्रमाणें एक दोन वेळां, त्या बिचारीनें आपला पति घरीं आणून, तो संसारांत नांदेल, ह्मणून होता तेवढा यत्न करून पाहिला. पण भवितव्यता बलवती-अखेरीस तिचे सर्व कष्ट व्यर्थ गेले. व तो जो नाहींसा झाला, तो पुनः तिच्या दृष्टीस पडला नाहीं. ही गोष्ट कादंबरी नव्हे, तर खरोखर घडलेली आहे. हाय! हाय! अशा प्रकारच्या कादंबऱ्या संसारांत हरहमेष घडत असतात. मात्र त्या आपल्या मंद मेंदुस व कठोर हृदयास मासाळ्या त्याप्रमाणें द्रावक भासत नाहींत.

नि० का०.

आमच्या एका मित्रानें "**कार्पण्यदोषदर्शन**" म्हणून एक सुरेख नाटक वरून '**हिंदुपंचांत**' छापविलें आहे. त्यांत अशा एका कुटुंबांतील सासुरवासाच्या दुःखाचें हुबेहुब चित्र वठविलें आहे. अशीं कुटुंबें जगांत किती असतील हें कोणीं सांगावें? तेव्हां हाही अज्ञानाचा भयंकर परिणाम नव्हे काय? या जगांत असा एक नियम आढळतो कीं, जुलुमाच्या छायेखालीं जे वाढतात, ते आपण स्वतः स्वतंत्र झाल्यावर इतरांसही जुलुमानेंच वागवितात! ज्या मुलींस अतिशय सासुरवास होतो, त्या मुली पुढें आपण स्वतः सास्वा झाल्या म्हणजे आपल्या सुनांसही सासुरवासाचें दुःख भोगण्यास लावितात. कारण, त्यांचीं मनें दुःसंगतीनें व दुष्टप्रकृति माणसांच्या सहवासानें दूषित होतात. जुलमी राजाच्या प्रजेचीं मनेंही क्रौर्यानें व दुष्ट मनोविकारांनीं ग्रासलीं जातात. '**फ्रान्सदेशांतील राज्यक्रांति**' व आमच्याइकडील '**१८५७ सालचीं धामधूम**' या दोन प्रसंगीं लोकांच्या हातून जीं राक्षसी व अनन्वित कर्में घडलीं, त्याचें तरी कारण हेंच, असें पुष्कळ विद्वान् इतिहासकारांचें म्हणणें आहे. असो. तेव्हां अशा या अज्ञानरूपी राक्षसाची बाधा कुटुंबांतील माणसांस न व्हावी, याबद्दल आपणास इलाज करणें अवश्य आहे. हें दुष्ट, विघ्नकारक अज्ञान जोंपर्यंत कायम राहील, तोंपर्यंत कलहाचें बीज कुटुंबांत नेहमीं पुरून ठेविलेलेंच आहे असें समजावें. येणेंप्रमाणें कलहाच्या कारणांची संक्षिप्त मीमांसा झाली. आतां, कुटुंबांत उत्पन्न होणाऱ्या कलहाच्या प्रतिबंधार्थ आम्हांस जे कांहीं उपाय सुचतात, ते येणेंप्रमाणें:—

१ विद्यावृद्धि किंवा ज्ञानप्रसार.
२ दायविभागांत फेरफार करणें.
३ स्त्रियांची गृहकृत्यांत सुधारणा.
४ सत्सहवास किंवा सुसंगति.
५ शेवटचा:—विभक्त होणें.

आतां या प्रत्येक उपायाचें दिग्दर्शन करूं.

**विद्यावृद्धि किंवा ज्ञानप्रसार.**—देशांत विद्येचा प्रसार झाल्यानें लोक समनस होऊन, कुटुंबांत कलह होण्याचा प्रकार कमी होत जाईल; हें म्हणणें कित्येकांस भ्रांति मूलक वाटतें. त्याचीं कारणें ते अशीं दर्शवितात. ते म्हणतात,

चा कितीही प्रसार झाला तरी, देशांतील सर्वच लोक विद्वान्, दूरदर्शी, शांत व सुस्वभावी होतील असें नाहीं. कोठेंही झालें तरी, अशा माणसांची संख्या नेहमीं थोडीच असावयाची. समाजांतील प्रत्येक व्यक्तीस विद्यामृत पाजून, त्या व्यक्तीच्या अंगीं वरील सद्गुण उत्पन्न होतील, जगांतील कलह किंवा माणसांमाणसांचे तंटे बंद होतील, अशी आशा करणे, ह्मणजे केवळ आकाशास गवसणी घालण्याचा यत्न करण्यासारखें आहे ! माणसें कितीही विद्वान् झालीं तरी, तीं धनलोभादिकांसारख्या मनोविकारांच्या तडाक्यांतून सुटतील असें मुळींच व्हावयाचें नाहीं. लोभाच्या पायीं चांगल्या व शहाण्या मनुष्याचे हातून किती भयंकर परिणाम झाले आहेत, हें इतिहासप्रसिद्ध आहेच ! फार काय, शांतमूर्ति, मंगलधाम, असा जो **परमेश्वर,** त्यानें या प्रचंड सृष्टीस ज्या नियमांनीं बद्ध केलें आहे, त्या सृष्टींत देखील अनेक प्रसंगीं अद्भुत गोष्टी घडतात, व भयंकर परिणाम घडत असलेले दिसतात. समुद्रावरील प्रचंड वादळें, भूमीवर होणारे भयंकर जलप्रलय, नुकतेच परवां घडलेले **जावा** बेटांतील भयंकर भूमिकंप, इत्यादि प्रसंग पाहून शांत व धीरप्रकृति मनुष्याचेंही चित्त क्षोभून जातें. त्याच्या ठिकाणीं आत्मसंयमन करण्याचें जबरदस्त सामर्थ्य नसेल तर, त्याच्या हातूनही दुष्कर परिणाम घडून येण्याचा संभव असतो. सागरासारखी गंभीर ज्याची वृत्ति व जो महा विचारी असा जो **धर्मराज** त्यासही द्यूतकर्म करावेंसें वाटलें!व 'नरो वा कुंजरो वा' असें संशयात्मक वाक्य स्वहिताकरितां त्यास खोटेंच बोलावें लागलें ! अस्तु. सारांश विद्येच्या प्रसारानें हें अरिष्ट टळेल असें नाहीं. दुसरें, जे देश आज या **पृथ्वी**वर विद्याचारसंपन्न ह्मणून म्हणवीत आहेत, व सुधारणेच्या शिखरास पोंचले आहेत, त्यांजकडे लक्ष्य दिलें असतां, त्या देशांतही न्यायाचीं कोर्टें, पोलिसांचीं खातीं, तुरुंग, वगैरे कलहाचीं दर्शक चिन्हें आहेतच. यावरून विद्याचारसंपन्न राष्ट्रांत कलहाचा अगदीं बीमोड झाला आहे व त्या राष्ट्रांतून न्यायाच्या कचेऱ्या वगैरे केवळ शोभेकरितां म्हणून बाळगीत आहेत, व तदर्थ प्रतिवर्षी अवाढव्य खर्च मजेखातर चालवीत आहेत, असें नाहीं. यावरून विद्येच्या प्रसारानें, जगांत व कुटुंबांत तंटे कमी होतील, असें मानण्यास विशेष आधार अद्यापि मत नाहीं.

ग्रंथ संग्रहालय

याप्रमाणें कांहीं लोकांचें म्हणणें असतें. या म्हणण्यांत कांहीं तथ्यांश आहे खरा, तरी यांत दर्शविल्याप्रमाणें आपण इतकें उदास व्हावें असें आम्हांस वाटत नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं विद्येच्या प्रसारापासून जे लाभ होतात, त्याचें सविस्तर प्रतिपादन करूं लागल्यास निराळाच एक विषय होईल. तथापि प्रस्तुत स्थळीं इतकी गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, कोणत्याही उपायाचें फल आपणास एकदम मिळत नाहीं, किंवा जितकें मिळावें म्हणून वाटत असतें, तितकें मिळत नाहीं; कारण, त्यास प्रतिकूल अशीं अनेक कारणें असतातच. विद्येचा मुख्य हेतु बरें वाईट समजणें हा होय. त्याचप्रमाणें मनुष्याचे बुद्धीला जों जों सद्विद्येचा अधिकाधिक संस्कार घडत जातो, तों तों तिच्यांत एका प्रकारची विशालता येत जाते. मनुष्यमात्र आपापल्या कल्पनेप्रमाणें आपला स्वार्थ साधण्यास झटत असतो ही गोष्ट जरी खरी आहे, तरी ज्या मनुष्याच्या मनाला विद्येचा संस्कार फार थोडा असतो, किंवा मुळींच नसतो, त्या मनुष्याची स्वार्थाची कल्पना फारच आकुंचित असते. कोणताही मनुष्य एखादें काम तो आपल्या समजुतीनें आपल्या स्वार्थाकरितां करीत आहे अशा वेळीं त्याचा खरा स्वार्थ कोणता, या गोष्टीचा विचार केला तर, वास्तविक जी गोष्ट तो करीत असतो, त्या गोष्टीनें त्याचा खरा स्वार्थ सिद्ध होत नसून, उलट तीच त्याला अनर्थावह होण्याचा अधिक संभव असतो. सारांश, आपला खरा स्वार्थ कोणता, याची कल्पना मनुष्यास विद्येच्याच योगानें हळूहळू समजत जाते. दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, आपला यत्न उत्कृष्ट प्रकारची स्थिति प्राप्त करून घेण्याचा नेहमीं असला पाहिजे. ज्याप्रमाणें राजा **रामचंद्राचें** राज्य किंवा **धर्माचें** राज्य, किंवा **अकबराचें** राज्य, किंवा **शार्लमेन्चें** राज्य, ह्मणजे ज्या राज्यांत प्रजेस मुळींच पीडा नाहीं, दुःखाचा लवलेश नाहीं, व प्रजाजन अत्यंत सुखाचा उपभोग घेत आहेत, अशा प्रकारचें काल्पनिक राज्य, किंवा अशा प्रकारची एक राज्यपद्धति, डोळ्यांपुढें ठेवून, तिच्या प्राप्तीस्तव नेहमीं यत्न केला पाहिजे. दुष्प्राप्य जें सुखधाम त्याची प्राप्ति करण्याविषयीं मनुष्यांनीं नेहमीं यत्न चालविला पाहिजे; व तें वस्तुतः कधीं काळीं प्राप्त होणार नाहीं, अशी जरी गोष्ट असली, तरी आपली प्रवृत्ति त्याच्याकडेच ठेविली पाहिजे.

या संबधानें एक गणित शास्त्रांतलें उदाहरण लक्षांत आणण्यासारखें आहे. तें हें कीं, 'एक' या अंकापासून आरंभ केला असतां, शून्यलब्धि कधींच होणें नाहीं, असा गणिताचा सिद्धांत आहे. एकामध्यें व शून्यामध्यें अंतर अनंत आहे. ह्मणजे एकाचे $\frac{१}{२}$, $\frac{१}{४}$, $\frac{१}{८}$, $\frac{१}{१६}$, $\frac{१}{३२}$, $\frac{१}{६४}$, असे कितीही विभाग करीत गेलें तरी, शून्यलब्धि कधींही होणार-नाहीं ! तसेंच जी उत्तमोत्तम अशी काल्पनिक स्थिति म्हणजे, स्वर्गसुखच म्हणाना—ती प्राप्त करून घेण्याची आपण उमेद राखिली व नेहमीं ती आपल्या डोळ्यासमोर बाळगिली असतां, हळूहळू आपण तिच्या जवळ कांहीं अंशानें तरी जाऊंच जाऊं. असो.

सद्‌विद्येच्या योगानें मनुष्यांस बरें वाईट समजतें. तेव्हां, कुटुंबांतील मनुष्यांस सद्विद्येचा संस्कार झाला तर आपलें हिताहित कशांत आहे, हें-ही त्यांस कळणार आहे. एकत्र रहाण्यापासून मितव्यय, परस्परसाहाय्य, इत्यादि जे फायदे आहेत ते त्यांच्या लक्ष्यांत येण्यास व आत्मसंयमन करण्याची शक्ति त्याच्या अंगीं येण्यास मुख्य विद्याच कारण आहे. निदान कलह हा वाईट आहे, चांगल्या, सभ्य व शहाण्या माणसास तो भूषणावह नाहीं ही गोष्ट विद्यासंपन्न मनुष्याच्या ध्यानांत अगोदर येईल किंवा अविद्वान् मनुष्याच्या ध्यानांत अगोदर येईल ? विद्वान् मनुष्याच्या, हें उघडच आहे. तेव्हां, कुटुंबांतल्या मनुष्याच्या मनावर सद्विद्येचा संस्कार झाल्यास परस्परांच्या सोयींकरितां विभक्तपणा झालाच पाहिजे, असें जरी त्यांस विचाराअंतीं कदाचित् वाटलें, तरी ते कलह न करितां विभक्त होतील, हें उघडच आहे. आणि विभक्त झाल्यानंतर परस्परांशीं प्रेमभावानेंही वागतील. याच्या उलट, म्हणजे तंट्याचा प्रकार आपण जगांत जो पहातों, तो बहुधा विचाराचाच असतो, असें कोण म्हणेल ? आणि ज्या अर्थीं सद्विद्येचें फल विवेक किंवा विचार हें होय, त्या अर्थीं तिच्या प्रसारापासून मनुष्यांत कमजास्त मानानें विवेक उत्पन्न होऊन, तो कलहाची प्रवृत्ति बंद करण्यास अंशतः तरी कारणीभूत होईल, ही गोष्ट निर्विवाद आहे. विलायतेंतील लोकांत **बांबे बडोदा, जी. आय. पी.** वगैरेसारख्या आगगाड्यांच्या कंपन्या, किंवा **ट्रेचर आणि कंपनी** वगैरे सारख्या मोठमोठ्या व्यापारी मंडळ्या उत्कर्ष पावतात, व बहुत दिवस चालतात. यांतलें मूळबीज एवढेंच आहे कीं, त्यांतलीं बहुते-

क माणसें विचारी असतात, शहाणीं असतात, सुशिक्षित असतात; यामुळें एका विचारानें आचरण वागलों असतां त्यांत स्वार्थ आहे, ही गोष्ट जाणून ते व्यवहार करितात आणि व्यवस्थेनें वागतात, कलह माजवीत नाहींत. यामुळें त्यांस आपल्या भांडवलावर पुष्कळ किफायत मिळते. ते आपल्या देशांत आमच्या देशांतून पुष्कळ पैसा नेतात. याचें कारण त्यांच्यांत विद्याप्रसार हें होय. कोणी म्हणतील, ते मोठे उद्योगी असतात व हें फळ त्यांच्या उद्योगाचेंच आहे. पण असा विचार केला पाहिजे कीं, उद्योगास विचार लागतो. आणि उद्योग व विचार, यांस कारणीभूत विद्या असते. तीन हजार कोशांवरून इंग्लंडच्या लोकांनीं इकडे येऊन आमच्या पंचवीस तीस कोटी प्रजेचें राज्य बळकावलें, ते जबरदस्त शहाणे व विद्यासंपन्न ह्मणूनच मिळविलें कीं नाहीं? मग खरोखर युद्धकुशलत्वानें मिळविलें ह्मणा, किंवा फितुरानें म्हणा, पण शहाणपणानें मिळविलें. यावरून त्यांच्यांत एकी व उद्योग हे दोन्ही गुण स्पष्ट दिसतात. आफ्रिकेंतील किंवा दुसऱ्या एखाद्या जंगली देशांतील रानटी लोकांनीं येऊन आमचें राज्य काबीज केलें नाहीं; आणि तें त्यांनीं काबीज केलें असतें तर, विद्येच्या संबंधानें हें आमचें ह्मणणें खोडल्यासारखें झालें असतें. असो. सारांश, विद्याप्रसार हा, कलह न होण्यास उपाय नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. कलहाच्या प्रतिबंधार्थ सुचणाऱ्या उपायांमध्यें विद्या प्रसाराची गणना करणें योग्य आहे. असें वर निर्दिष्ट केलेल्या अल्प निरूपणावरून ध्यानांत येईल.

**दायविभागांत फेरफार करणें.**—कलह न होण्याचा दुसरा असा एक उपाय आहे कीं, हल्लीं जो आपला दायविभागाचा प्रकार आहे, त्यांत फेरफार झाला पाहिजे. यासंबंधानें इंग्लंडची जी दायविभागाची पद्धत आहे, ती विचार करण्यासारखी आहे. ती इकडे सुरू करावीच म्हणून आह्मी निश्चयपूर्वक सांगत नाहीं. तथापि, तिजपासून कोणकोणते फायदे आहेत, याबद्दल विचार करण्यासारखा आहे. इंग्लंडांत पहिल्यापासून दायविभागाची अशी पद्धत आहे कीं, ‘ जो वडील मुलगा असेल, तो एकंदर स्थावर मिळकतीचा वारस होतो. व इतर भावांस बाकी राहिलेल्या जंगम मिळकतीचा सारखा वांटा मिळतो. आणि वडिलोपार्जित मिळकतीचें मृत्युपत्र करण्याची बापाला मुभा असते. ’

आपले इकडे दायविभागाचा सामान्य नियम असा आहे कीं, ' मुलगे किंवा मूळ पुरुषाचे प्रत्यक्ष जे वंशज, ते सारखे हिस्सेदार असतात. चार भाऊ असले तर त्यांचे मुलगे आपापल्या बापाच्या वांट्याचे सारखे हिस्सेदार होतात. खेरीज बापाला वडिलोपार्जित मिळकत, आपल्या मृत्युपत्रानें कोणास देऊन टाकितां येत नाहीं, किंवा तिची पाहिजे तशी व्यवस्था करितां येत नाहीं. स्वकष्टार्जित, ह्मणजे बापानें स्वतः मिळविलेली जी मिळकत असते, तिची मात्र त्याला पाहिजे तशा रीतीनें व्यवस्था करितां येते. ' विलायतेमध्यें दायविभागाची जी पद्धति आहे, त्या पद्धतीमुळें भांडणाचा पुष्कळ प्रकार कमी होतो. ह्मणजे अमुक मुलगा माझा वारस नाहीं, किंवा माझे मिळकतीपैकीं त्यास कांहीं मिळूं नये, किंवा अमक्यासच सर्व मिळकत मिळावी, इतकें ह्मणण्याचा बापास अधिकार असतो. यामुळें बहुतेक मुलगे बापाच्या मिळकतीची आशा करीत नाहींत; व वडिलोपार्जित मिळकतीपैकीं आपणास हक्कानें कांहीं मिळालेंच पाहिजे, असेंही त्यास वाटत नाहीं; यामुळें बहुधा ते उद्योगशाली होतात. बापाच्या मरणानंतर त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें कांहीं एक व्यवस्था केली नसेल तर, स्थावर मिळकत ह्मणजे घरें, शेतेंभातें, वतनवाड्या, वगैरेंचा वडील मुलगाच वारस होतो. यामुळें एकंदर स्थावर मिळकतीचा सगळा भाग एकत्र राहून, त्याची व्यवस्थाही रहाण्यास चांगलें होतें. आणि आमच्या इकडे त्याचे जसे वंशपरंपरेनें तुकडे तुकडे होतात, तसे तिकडे होत नाहींत. या ठिकाणीं या संबंधानें एक दोन उदाहरणें आमच्या आढळण्यांत आलीं आहेत तीं सांगण्यासारखीं आहेत म्हणून सांगतों.

आमच्या एका मित्राचें घाटावर मूळ रहाण्याचें गांव आहे. त्या ठिकाणीं त्याचे वाडवडिलांचे वेळची दहावीस बिघ्यांची एक वतनवाडी आहे. ही लहानशी वतनवाडी प्रथम सात आठ भावांमिळून होती. हे सात आठ भाऊ घरांतील गरीबीमुळें, चार दिशेला पोटाचा उद्योग पहाण्याकरितां घर सोडून गेले. त्या सर्वांत जो धाकटा होता तो, आपल्या बापाजवळ कोणीच नाहीं म्हणून सर्वांनीं त्यास घरीं ठेविलें, व तोही शेतीभातीची व्यवस्था पाहूं लागला. पुढें त्या पांच सात भावांचा वंशविस्तार वाढतां वाढतां फारच वाढला. तो इतका कीं दहा ठिकाणीं पसरलेली

जीं माणसें होतीं तीं जर आपल्या मूळ गांवीं असतीं तर किंबहुना त्यांना सारा गांवही रहाण्यास पुरला नसता. अशा स्थितींत वडील भावानें कांहीं एक व्यवस्था करून त्या मूळच्या वतनवाडीचा विभाग, किंवा वांटणी होण्याचा प्रसंग बहुत दिवस टाळिला. त्यामुळें मूळची वतनवाडी त्या धाकट्या भावाकडे अद्याप चालत असून, ती जशीची तशीच अजून कायम राहिली आहे. त्या मिळकतीचा हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दायविभाग झाला असता तर, त्या कुटुंबाचा मूळचा वाडा व मूळची वतनवाडी एक तर परक्याच्या, ह्मणजे अगदीं तिऱ्हाइताच्या हातांत गेली असती; किंवा त्या कुटुंबाचा पुढें जो मोठा वंशविस्तार झाला, त्यापैकीं कित्येक माणसांच्या हातांत काळ्या मातीचें एकेक ढिखळ आलें असतें! याखेरीज शुष्क कलह माजून जें कांहीं नुकसान झालें असतें तें निराळेंच!

याप्रमाणें दुसऱ्याही एका मित्राची गोष्ट सांगण्यासारखी आहे. ती अशी कीं, एका गृहस्थाच्या मूळ कुटुंबाचीं तीन घराणीं झालीं होतीं. त्यांचा जो बाप होता तो मूळचा अगदींच गरीब स्थितींतला असून, त्यानें आपल्या शहाणपणानें व उद्योगानें शेतवाड्या केल्या व बरीच संपत्ति मिळविली. ही संपत्ति अर्थात् वडिलोपार्जित नसून त्याची स्वकष्टार्जित होती. पुढें त्याचीं मुलें मोठीं झालीं असतां, त्यांपैकीं दोन मुलगे वाईट चालीचे निघून आपल्या बापाशीं व भावाशीं मिळकतीच्या अभिलाषानें भांडू लागले. तेव्हां बापानें त्यांस स्पष्ट सांगितलें कीं, ‘ जर तुह्मी भलेपणानें आणि व्यवस्थेनें वागाल, तरच तुम्हांस मी आपल्या मिळकतीची वांटणी देईन. नाहीं तर सर्व मिळकत मी आपल्या वडील मुलास देऊन टाकून तुह्मांस सुतळीचा तोडा देखील देणार नाहीं ! मग तुह्मी आपले पाहिजे तिकडे भिक मागत जा. ’ तो बाप मोठा तामसी आणि हट्टी असल्या कारणानें व मुलांचें वर्तन बरोबर नाहीं असें पाहून, शेवटीं त्यानें आपली सर्व मिळकत वडील मुलासच देऊन टाकिली. परंतु पुढें त्याचा परिणाम असा झाला कीं, बाकीचे जे दोन वाईट चालीचे मुलगे होते, ते ताळ्यावर आले व कृतकर्माचा त्यांस पश्चात्ताप होऊन, ते स्वतः व त्यांचे मुलगे उद्योगी निपजले. व ‘ आह्मी आपल्या उद्योगानें आणि शहाणपणानें आपल्या वडील घराण्याशीं टक्कर मारूं, असा त्यांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें आजमितीस तीं दोन्हीही कुटुंबें भर-

मराठींत नांदत आहेत. अशा प्रकारचीं चमत्कारिक उदाहरणें व्यवहारांत आपल्या दृष्टीस अनेक पडतात. परंतु त्या सर्वांचा येथें उल्लेख करण्याची गरज नाहीं. दृष्टांताकरितां जीं एक दोन उदाहरणें दिलीं तीं पुरें आहेत.

यावरून विलायतेंतील दायविभागाची पद्धति कांहीं अंशीं चांगली आहे व विचार करण्यासारखी आहे, असें आह्मांस वाटतें. तिचें सर्वांशीं, किंवा कांहीं अंशीं आपण अनुकरण करावें किंवा नाहीं, याचा विचार येथें करितां येत नाहीं. हा एक स्वतंत्र विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तथापि, प्रस्तुत स्थळीं आह्मी एवढेंच सांगतों कीं, ही पद्धत आमच्या इकडेही संस्थानें, जहागिरी, राज्यें, अशा मोठमोठ्या मिळकतीच्या संबंधानें दृष्टीस पडते, **शिंदे, होळकर, गायकवाड,** यांस जीं मुलें होतात, त्यांपैकीं वडील मुलासच सर्व राज्य मिळतें; हें सर्वांना ठाऊकच आहे. त्याचप्रमाणें **मिरजकर, सांगलीकर,** वगैरे जीं लहान लहान संस्थानें आहेत, त्यांतही तोच प्रकार आहे. तेव्हां आजकाल 'विलायतेंतील कांहीं गोष्टींचें अनुकरण करावें' असें ह्मणणाऱ्यांची * टर

* प्रस्तुत वाक्य वाचीत असतां आमच्या एका विद्वान् मित्रानें आह्मांस बराच टोला दिला तो असा:—

"टर उडविण्याची चाल उगीच पडली नाहीं. यांतच वर सांगितलेली गोष्ट संस्थानिकांत आहे, तीच सर्वत्र लागू करावी, असें सांगून 'विलायतेंतही असें आहे' असें ह्मणून पुष्टीकरण केलें असतें तर बरें होतें. सुधारलेले लोक कांहीं गोष्टी चांगल्या आहेत व कांहीं वाईट आहेत याचा विचार न करितां केवळ युरोपिअन् लोकांत आहेत ह्मणून करितात, व लोक हसूं लागले ह्मणजे आपल्या कडील प्रमाणें देतात. पूर्वींचे लोक मांस खात होते, हें प्रमाण आपण मांस खावें अशाविषयीं देतात. पण पूर्वींच्या लोकांप्रमाणें यज्ञयाग कां करूं नये ? तात्पर्य काय कीं, जी गोष्ट आवडते ती, प्रमाणें देऊन, वकिलाप्रमाणें, चांगली ठरवावयाची. ती चांगली आहे ह्मणून घ्यावयाची असें नाहीं. यामुळें बाबा टर होते !"

या कोटीक्रमास दुसरें उत्तर काय द्यावें ! "शाबास शास्त्रिबोवा ! खूप केलीं." एवढें ह्मणून स्वस्थ बसण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं.

पण कायहो शास्त्रीबोवा ! कोणतीही गोष्ट 'चांगली' किंवा 'वाईट' मानावयाची किंवा ठरवावयाची ती कशावरून ? या प्रश्नाचा विचार करण्यास आमच्या विद्वान शास्त्रीबोवांस कदाचित् एक निदान ५०० पृष्ठांचा तरी ग्रंथ लिहावा लागेल. दुसरें असें 'वकिलाप्रमाणें चांगली ठरविण्या'चा 'चार्ज' ऊर्फ आरोप उभयपक्षकारांवर सारखाच येऊं पहात नाहीं काय ?

नि. का.

उडविण्याची जी चाल पडली आहे, तशांतला हा कांहीं प्रकार नाहीं. आम्हांमध्यें जी गोष्ट किंवा जी पद्धति पूर्वीं पासूनच चालू आहे, तिचाच उपयोग, किंवा तिचीच योजना सोईस वाटल्यास सर्वत्र करून घ्यावी किंवा नाहीं, एवढाच काय तो विचार आहे. बापाची किंवा वडिलांची स्थावर मिळकत, म्हणजे, बहुतेक महत्वाची मिळकत, ती वडील मुलासच मिळावी, असा नियम केल्यास त्यांत एक मुख्य फायदा होईल तो असा कीं, त्या मिळकतीविषयीं इतर मुलगे उदासीन राहून तिची अपेक्षा कर-रणार नाहींत; त्यामुळें कलहही होणार नाहीं. कारण, ज्यावर आपला हक्क कायद्यानें ठेविला नाहीं, व ज्याचा वांटा मिळण्याची आपल्याला आशाही नाहीं, त्याबद्दल माणसें भांडणही करणार नाहींत. निदान, भांडण्याचें बरेंच कारण मोडेल, असें आम्हांस वाटतें. प्रसिद्ध न्यायशास्त्रवेत्ता व अर्थशास्त्रवेत्ता **जॉन् स्टुअर्ट मिल्ल** यानें आपला अभिप्राय या पद्धती विरुद्ध दिला आहे. त्याचें मुख्य कारण त्यानें असें दिलें आहे कीं, अशा व्यवस्थेपासून फार अन्याय होतो. म्हणजे वडिलोपार्जित द्रव्याचा अथवा मिळकतीचा लाभ वडिल मुलासच होऊन इतर मुलांस होत नाहीं त्यामुळें त्यांचे फार हाल होतात व नुकसान होतें. दुसरींही आणखी कांहीं कारणें त्यानें दिलीं आहेत.

आतां ही दायविभागाची पद्धति फार अन्यायाची आहे. एकाच बापाच्या संततीपैकीं, एक पूर्वीं, म्हणजे सगळ्या भावांच्या अगोदर जन्मला, येवढ्याच कारणाकरितां त्याला सुखाचा आणि संपत्तीचा सगळा वांटा मिळावा, हें न्याय्य होणार नाहीं. असा आक्षेप घेतला असतां, या ठिकाणीं दुसरा असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, ‘ न्याय्य ’ म्हणावें तरीं कशास ? मनुष्य ज्याला अन्याय म्हणतात, अशा गोष्टी **परमेश्वराच्या** किंवा सृष्टीच्या व्यवस्थेंत पुष्कळ दिसतात. एकाच बापाला एक मुलगा आणि एक मुलगी अशीं अपत्यें लिंगभेदानें व्हावीं, हा केवढा तरी अन्याय* ? कारण, जगाच्या व्यवहाराप्रमाणें मुलगा स्वतंत्र होतो, व

* या ठिकाणीं आमच्या वरील पंडितानीं एकदम “ Absurd ! ” म्हणजे “ हा प्रश्न कितो अप्रयोजक आहे” असा उद्गार काढिला. आम्ही ह्मटलें: “ कांहो शास्त्रिबोवा ! यांत अप्रयोजकता काय आहे ? एका मनुष्यानें नांगर धरावा, ह्मणजे नांगर धरणाराच्या

मुलगी परवश आणि दुसऱ्याची गुलाम बनते ! आधार कोणचा ह्मणाल तर, **'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति'!** मुलानें कितीही बायका केल्या, तरी त्याला विवाहसुख पुनः पुनः मिळावें, व मुलीला आपल्या वयाच्या सात आठ वर्षांत किंवा बालवयांतच वैधव्य प्राप्त झालें असतां, तिचा सर्व जन्म विपत्तींत जावा ! ‡ ही एकंदर अन्यायपरंपरा किंवा न्यायपरंपरा ह्मणावी ? त्याचप्रमाणें एकाच बापाला दोन मुलें झालीं तर, एक सुरेख, देखणा, सशक्त, गौरवर्ण; आणि एक कुरूप, काळा, नकट्या नाकाचा, वगैरे प्रकार असतो. हा तरी सृष्टीचा केवढा अन्याय आहे बरें ? * एका प्रा-

---

जन्मास यावें व एकानें राज्यासनावर बसणाराच्या जन्मास यावें. एकाला गोहत्या करणाऱ्या यवनाचा जन्म प्राप्त व्हावा व दुसऱ्यास गोप्रतिपालन करणाऱ्या ब्राह्मणाचा जन्म प्राप्त व्हावा, हा केवढा अन्याय, असें विचारलें तरी या प्रश्नास आपण अप्रयोजक म्हणाल काय ?' 'आपण हिंदु लोक हिंदुस्थानाचे मालक, स्वामी, निरंतरचे रहिवासी असतां, इंग्रजांनीं येऊन राज्य करावें, मोठमोठ्या जागा पटकावाव्या आणि आपण त्यांचे दासानुदास होऊन रहावें हें न्याय्य आहे का ?' असें आम्ही विचारलें असतां आमच्या शास्त्रिबोवांकडून आपला 'Absurd!' असाच उद्गार येणार काय ?

‡ या ठिकाणीं आमच्या सदरहू मित्रांनीं आमच्या प्रतिपादनाची उपहासात्मकता व्यक्त करण्याकरितां एक उदाहरण दिलें. ते म्हणाले:—"एखाद्या विद्वानानें रात्रंदिवस डोळे फोड करून परीक्षा देऊन मामलेदार किंवा मुनसफ व्हावें आणि त्याच्या बायकोनें कांहीं श्रम न करितां मामलेदारीण किंवा मुन्सफीण होऊन ऐश्वर्य भोगावें हा तरी केवढा अन्याय ?"—नाहीं कोण ह्मणतो ?

नि. का.

* येथें आमचे मित्र म्हणाले. "We must take the creation as it is." "सृष्टींत जी व्यवस्था आहे ती आहे. ती आपणांस मान्य केली पाहिजे." नाहीं कोण म्हणतो ? आणखी नाहीं ह्मणून उपयोग तरी काय! तथापि एवढ्यावरून सिद्ध काय होतें ? सृष्टींत जें काय आहे तें अगदीं उत्तमोत्तम आहे, वाईट व जुलुमी राजा असला तरी उत्तमच आहे, कितीही दुष्ट रूढि असल्या तरी चांगल्याच आहेत, आहे तें ठीकच आहे, असें ह्मणून कसें चालेल ? जगांत आजपर्यंत ज्या सुधारणा होत गेल्या त्या अशा ह्मणण्यानें कां झाल्या असत्या ? रानटी मनुष्य "We must take the creation as it is" असें ह्मणून स्वस्थ बसता तर सूर्याच्या तापाचें निवारण करण्यास तो बेटा खोपी किंवा झोंपडी बांधण्याची खटपट कशास करता ? सृष्टिनियम ह्मणून जे आहेत ते आपणांस बदलतां येत नाहींत हें खरें. तथापि, सृष्टिनियमांचें ज्ञान करून घेऊन मनुष्यानें आपली स्थिति सुधारण्याचा आजपर्यंत जो क्रम चालविला आहे तो चुकीचा आहे

ण्यास उत्तम ब्रह्मकुलांत जन्म मिळावा व दुसऱ्या प्राण्यास अत्यंत नीच मानिलेल्या अशा अंत्यजकुलांत जन्म प्राप्त व्हावा, हा तरी सृष्टीचा जुलूम व अन्याय नव्हे का? सारांश, अमुक गोष्ट न्याय्य आहे, व अमुक गोष्ट अन्याय्य आहे, असें ह्मणणें फारच कठिण आहे. कारण, सृष्टींत किंवा परमेश्वराचे कृतींत न्याय्यान्याय्य हा प्रकार कितपत आहे, हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां, सांगणें कठिण. न्यायदेवतेची उत्पत्ति मनुष्याच्या कल्पनेपासून झाली आहे. समाजाच्या रचनेच्या संबंधानें ज्या रीतीभाती, ज्या रूढि पडल्या आहेत व ज्या संस्था ठरलेल्या आहेत, त्यांत, बहुसमाजास होणारा फायदा किंवा सुख, हीच गोष्ट मुख्य असते. तेव्हां माणसांनीं याच तत्त्वास अनुसरून, न्याय्य किंवा नीतीची कल्पना केलेली आहे. हा विषय तत्त्वविचाराचा असून त्याचें स्वतंत्र विवेचन केलें असतां, एक मोठा ग्रंथच होईल. तथापि, यांचें या ठिकाणीं दिग्दर्शनमात्र करावेंसें वाटल्यावरून केलें आहे.

**स्त्रियांची गृहस्थितींत सुधारणा**—आमच्या गृहस्थितींत मुख्य सुधारणा केली पाहिजे, ती ही. कुटुंबातील लहान मोठ्या मनुष्यांची हरएक कामांमध्यें परस्परानीं एकमेकांची सल्लामसलत घ्यावी व एकमेकांची सोय पाहून, एकमेकांच्या अनुरोधानें वागावें. हल्लीं आपणांमध्यें जी पद्धति आहे ती अशा प्रकारची असते कीं, बाप आपल्या मुलांशीं किंवा काका आपल्या पुतण्यांशीं, अथवा वडील माणसें असतात तीं धाकट्या माणसांशीं, मोकळ्या मनानें वागत नसतात. यामुळें जरी तीं एकत्र रहात असतात, तरी वास्तविक, परस्परांच्या आचाराच्या वि-

---

( मागील पानावरून चालू. )

कीं काय? असो. हा वाद थोडक्यांत आटपण्यासारखा नाहीं त्याच्या सविस्तर प्रतिपादनास येथें तर स्थळ नाहीं. शास्त्रिबोवांनीं 'न्याय्य' (Just) या शब्दाची व्याख्या केली ती अशी कीं, रूढ असलेल्या ज्या वहिवाटी, जे कायदे कानू, जे नियम, ज्या रीतीभाती, त्यांना अनुकूल असणें किंवा अनुसरणें. खाशी, असा न्याय्य शब्दाचा अर्थ केला ह्मणजे ख्रिस्त, लुथर, टॉम् पेन, ग्यालिलिओ, विष्णु शास्त्री पंडित, मिल, डार्विन, ब्रॅडला, वगैरे कित्ती माणसें त्या त्या काळच्या रूढ प्रचाराविरुद्ध व कायद्या विरुद्ध वागणारीं अन्यायी, पाखंड व चांडाल ठरतात! ठरोत बिचारे. एक आमच्या शास्त्रिबोवांनीं त्यांस तसें ठरविलें ह्मणून जगांतील इतर सर्व विचारी मनुष्यांस तर तसें करितां येत नाहींना?

नि. का.

चाराच्या वगैरे संबंधानें जसें एकत्रपणाचें स्वरूप असावें तसें नसतें. कुटुंबांतील लहान मंडळींनीं वडील माणसांस मान वगैरे द्यावयाचा ही गोष्ट निराळी; तो न द्यावा असें आमचें ह्मणणें नाहीं. परंतु, असें होण्यास परस्परांत अंतरच राहिलें पाहिजे, एकमेकांनीं मोकळेपणानें व स्नेहभावानें एकमेकांशीं बोलतां कामाचें नाहीं, अशांतली गोष्ट नसावी. संसारांतील अनेक व्यवसायांत कुटुंबांतील सर्व माणसांच्या हिताहिताचा संबंध असतोच असतो. येवढ्याकरितां वडील माणसांनीं लहान माणसांची सल्लामसलत घेण्यांत कांहीं नुकसान आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. आपणा सर्वांस असा अनुभव आहे कीं, मातोश्रीजवळ जितक्या मोकळेपणानें आपण बोलत असतों व वागतों, आपल्या अंतःकरणांतील बऱ्या वाईट गोष्टी तिजजवळ सांगतों, आपलें सुखःदुख तिला निवेदन करतों, तसा प्रकार इतर माणसांशीं नसतो; तो तसा प्रकार इतर माणसांत झाला पाहिजे. ह्मणजे परस्परांत अधिक स्नेहभाव वाढून, परस्परांविषयीं विश्वासबुद्धिही अधिक वाढेल. कांहीं कांहीं जुन्या चालीच्या कुटुंबांमध्यें बापाचा मुलांवर मोठा दरारा असतो, बापाचा मुलांस मोठा धाक वाटत असतो, यामुळें त्या मुलांचीं मनें बापापासून पराङ्मुख झालेलीं असतात. आपल्या भोंवतालीं आपलीं मुलें बसलीं आहेत, गोड गोड गोष्टी चालल्या आहेत, त्यांचें सुखदुःख बाप विचारीत आहे, व मुलेंही आनंदानें व निर्मळ अंतःकरणानें बापाजवळ गोष्टी बोलत आहेत, अशा प्रकारचे रमणीय देखावे आपल्या कुटुंबांत किती बरे दृष्टीस पडतात ?

विलायतेंमध्यें ‘ होम ’ ( घर ) हा शब्द ऐकिल्याबरोबर मनुष्यांच्या अंतःकरणामध्यें जी पूज्यबुद्धि व ज्या कल्पना उभ्या रहातात, तशा प्रकारच्या कल्पना आमच्या लोकांच्या मनांत उभ्या रहात नाहींत. एवढेंच नव्हे, तर कांहीं लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, ‘ होम ’ या अर्थाचा वाचक शब्द आमच्या भाषेंत मुळींच नाहीं ! हें कसेंही असलें तरी, ‘ गृह ’ किंवा ‘ कुटुंब ’ या शब्दानें प्रत्यक्ष स्वर्गसुखाचीच कल्पना मनांत उभी रहावयास पाहिजे, तशी आमच्या मनामध्यें रहात असेल, असें वाटत नाहीं. आमच्या लोकांत दिवाळी, दसरा, वगैरे अशा कांहीं सणांच्या दिवशीं कुटुंबांतील माणसें एकत्र होणें, सासरीं गेलेल्या मुली माहेरीं आणणें, दूरदेशीं अभ्यासाकरितां राहिलेलीं मुलें घरीं येणें,

अशा प्रसंगीं ' होम ' या शब्दाची कांहींशी कल्पना उत्पन्न होते. याशिवाय, बहुतेक आपल्या घराविषयीं, आपल्या कुटुंबाविषयीं, व आपल्या माणसांविषयीं, जसें कांहीं आपणांस वाटावयास पाहिजे, तसें वाटत नाहीं. तसें आपणांस जेणेंकरून वाटेल, आपल्या माणसांविषयीं आपल्या मनामध्यें स्नेहभाव वाढेल, 'घर,' 'कुटुंब,' 'माहेर,' अशा कांहीं शब्दांनीं आपणास स्वर्गसुखाची आठवण होईल, अशा कांहीं तजविजी किंवा योजना केल्या पाहिजेत; व अशीं साधनें प्राप्त करून घेतलीं पाहिजेत.

दुसरें, हल्लीं संसारकृत्यांमध्यें स्त्रिया व पुरुष यांजमध्यें समविभागाची कांहीं व्यवस्था दृष्टीस पडते, त्यांतही बदल केला पाहिजे. पुरुषांनीं बाजारांतून ने आण करणें, उपजीविकेचीं साधनें प्राप्त करणें, वगैरे संसाराचा कांहीं एक भाग उचललेला असतो. त्याजप्रमाणें, स्त्रिया, घरांतील मुलाबाळांच्या अन्नापाण्याची वगैरे व्यवस्था पहात असतात. तथापि एकाच्या कामांत दुसऱ्यानें मुळींच बोलूं नये, परस्परांनीं परस्परांची मदत घेऊं नये, किंवा एकमेकांस एकमेकांनीं सल्लामसलत विचारूं नये, कुटुंबांतील स्त्रीपुरुषांनीं एकत्र बसून सुखासमाधानाच्या गोष्टी करूं नयेत, हा प्रकार मोडून टाकिला पाहिजे; आणि त्याच्याऐवजीं समानत्वाचा प्रकार योजिला पाहिजे. घरामध्यें जी सासू, किंवा वडील नात्याच्या ज्या स्त्रिया असतील, त्यांनीं आपल्या सुनांशीं स्नेहभावानें वागावें; व हरएक संसारकृत्यांत त्यांच्या सुखदुःखाचा त्यांनीं अवश्य विचार करावा; त्या मोकळ्या मनानें आपल्याशीं वागतील, अशा प्रकारचें त्यांच्यांशीं त्यांनीं वर्तन ठेवावें; बायकोची जात ह्मणजे कांचेचें भांडें, व पुरुषाची जात ह्मणजे सोन्याचें भांडें, या दुष्ट कल्पनेचा त्याग केला पाहिजे. कुटुंबांतील लहान मोठ्या स्त्रियांनीं कुटुंबांतील लहान मोठ्या पुरुषांबरोबर बसणें उठणें, बोलणें चालणें, यांत कांहीं एक निर्लज्जपणाचा प्रकार आहे किंवा विनयाचा लोप होणार आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. जशी व्यवस्था असावी ह्मणून आह्मीं थोडक्यांत सांगितलें, तशी झाली असतां, कुटुंबांत सुख अधिक वाढेल व कलहाचें बरेंच बीं मोडेल, असें आह्मांस खातरीपूर्वक वाटतें. आतां असें होण्यास आमच्या स्त्रीवर्गास शिक्षण मिळणें अवश्य आहे. आजकाल पुरुषांस शिक्षण देणें अवश्य आहे, ही गोष्ट बहुतेकांस मान्य आहे. व पुरुषांस विद्या मिळाली नाहीं तर त्यांचा सं-

सार सुखानें होणार नाहीं, असें बहुतेकांस वाटून, त्याप्रमाणें कमजास्त मानानें मुलांस विद्यादानही दिलें जातें. परंतु स्त्रियांच्या संबंधानें विचार केला असतां, अजून देखील पुष्कळ लोकांचें मत आहे कीं, स्त्रियांस विद्या देण्याचें कारण नाहीं. ही समजूत दिवसानुदिवस मोडत गेली पाहिजे.

आतां हा विचार अर्थात् आह्मी उत्तम व मध्यम अशा दोन प्रकारच्याच लोकांचा करितों, हें उघड आहे. अगदीं कनिष्ठ किंवा नीच प्रतीच्या लोकांतील पुरुषांत विद्येचा अद्याप कांहीं प्रसार झाला नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. मग स्त्रियांची गोष्ट कशाला ? विद्याप्रसाराच्या संबंधानें आमचें मत असें आहे कीं, या तिन्हीही प्रतीच्या लोकांत विद्याप्रसार सारखाच झाला पाहिजे, व तो कालें करून होईल अशी आशा बाळगूं. आमचें मत असें आहे कीं, कांहीं एक ईयत्तेपर्यंत प्रत्येक मनुष्यास शिक्षण मिळालेंच पाहिजे. व हें शिक्षण देणें प्रथमतः आईबापांचें कर्तव्यकर्म आहे. तें कर्तव्यकर्म जर त्यांनीं बजाविलें नाहीं तर समाजानें किंवा राज्यकर्त्यांनीं ती गोष्ट घडवून आणिली पाहिजे, ह्मणजे आईबापांस तें कर्तव्यकर्म करण्यास भाग पाडलें पाहिजे. आपल्या बालकांचें ह्मणजे आपल्या संततीचें संगोपन करणें हें जसें आईबापांचें कर्तव्यकर्म आहे, त्याचप्रमाणें त्या संततीस योग्य शिक्षण देणें ह्मणजे, त्यांचीं आपल्या इतर देशबांधवांच्या संबंधानें, व आपल्या स्वतःच्या संबंधानें जीं जीं कर्तव्यकर्में आहेत, तीं तीं त्यांस कळवून तीं बजावितां येण्याविषयीं त्यांस समर्थ करणें, याचीही जबाबदारी त्या आईबापांवर आहे. यांतच स्त्रीजातीचाही समावेश होतो. स्त्रियांसही अवश्य शिक्षण मिळालेंच पाहिजे. त्यांस बुद्धि आहे, त्यांस मन आहे, त्यांस अंतःकरण आहे, हें जर आपण कबूल करितों तर, त्यांच्या बुद्धीस संस्कार झाला पाहिजे, त्यांची विचारशक्ति वाढली पाहिजे, हेंही उघड आहे. आणि हें विद्येच्या योगानेंच होणार. तेव्हां हेंही स्पष्ट आहे कीं, स्त्रियांस विद्यादान देणें अवश्य आहे. आतां या विद्यादानाच्या पद्धति कशा असाव्या, त्यांस फक्त लेखनवाचनापुरतें शिक्षण द्यावें, किंवा कोणत्या इयत्तेपर्यंत शिक्षण असावें, वगैरे विषय स्वतंत्र असून त्याचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे.

विद्या जशी पुरुषांस अवश्य आहे, तशी स्त्रियांसही अवश्य आहे.

या गोष्टीबद्दल अद्यापि पुष्कळ लोकांची खातरी झालेली नाहीं, व ती गोष्ट त्यांच्या मनांत ठसलीही नाहीं. यामुळें विद्याप्रसाराच्या कामास फार हरकत येत आहे. या बाबतींत लोकांची समजूत बदलून स्त्रियांत जसजसा विद्याप्रसार वाढत जाईल, त्या त्या मानानें आमच्या स्त्रियांमध्यें व गृहस्थितीमध्यें सुधारणा होत जाईल. आपल्या कुटुंबांतील माणसांशीं स्नेहभावानें वागणें, क्षुल्लक कारणांकरितां द्वेष व कलह वाढूं न देणें, दुसऱ्याचा मत्सर न करणें, वगैरे गुण ज्ञानप्रसाराच्या योगानें आमच्या स्त्रियांमध्यें येतील अशी आशा आहे. असें ह्मटलें आहे:—

'माता यस्य गृहे नास्ति, भार्या चाप्रियवादिनी ।
अरण्यं तेन गंतव्यं, यथारण्यं तथा गृहं' ॥१॥

तसेंच, दुसऱ्या एका श्लोकांत म्हटलें आहे:—

'यत्र नास्ति दधिमंथन-घोषो
यत्र नास्ति लघुलघूनि शिशूनि ।
यत्र नास्ति गुणगौरवरामा
तानि तानि गृहानि वनानि' ॥ १ ॥

आणखी, एका आर्येच्या चरणांत म्हटलें आहे:—

' स्त्रियः परीक्षा तु निर्धने पुंसि '

म्हणजे ' स्त्रीची परीक्षा पुरुष निर्धन झाल्यावर होते. ' असो.

अशा गुणगणान्वित व प्रत्यक्ष गृहशांतिरूप स्त्रिया ज्या कुटुंबांत नाहींत, तीं घरें कसलीं ? प्रत्यक्ष अरण्येंच होत !

कांहीं कांहीं स्त्रियांस लहानपणापासूनच चांगल्या प्रकारचें असें घरगुतीच शिक्षण मिळालेलें असतें, ही गोष्ट आम्ही कबूल करितों. अशा " गुणगौरवरामा " ज्या कुटुंबांत दृष्टीस पडतात, त्या कुटुंबांची शोभा व त्या कुटुंबाचें सुख काय वर्णन करावें ? आल्यागेल्याचा योग्य आदरसत्कार करणें, घरांतील माणसांवर निष्कपट प्रेम ठेवणें, आपल्या सौजन्यानें दुसऱ्यांचीं मनें रिझविणें, आपल्या सद्वर्तनानें दुसऱ्याचा क्रोधाग्नि शमविणें, कुटुंबांतील एखादें मनुष्य आजारी पडलें असतां, त्याची योग्य शुश्रूषा करणें, अशा केवळ कल्पलतातुल्य स्त्रिया ज्या कुटुंबांत असतील त्या कुटुंबास कलहाच्या दुष्ट वाऱ्याची कधीं तरी बाधा होईल काय ? संसाररूप शकट म्हणजे गाडा याचीं स्त्री व पुरुष अशीं दोन चक्रें अ-

मून, हीं जर सारख्या योग्यतेचीं, सारख्या मनाचीं, व एक चित्ताचीं आहेत, तर तो शकट सुखानें व सुरळीत चालेल, यांत काय नवल ? प्रपंचांत स्त्री म्हणजे पुरुषाची अर्धांगी आहे, अशी जी आपली प्राचीन समजूत आहे, ती किती योग्य आहे व किती खरी आहे ? तेव्हां, आपल्या सुधारणेच्या संबंधानें आपण जे जे विचार करीत असतों, ते ते निव्वळ पुरुषाच्याच संबंधाचे करणें * व स्त्रिया आपल्या हिशेबांतून गाळणें, म्हणजे अर्धांगवायु झालेल्या मनुष्याच्या स्थितीसारखें आहे! यावरून वाचकांच्या लक्षांत येईलच कीं,पुरुषांच्या सुधारणेकरितां जे जे आपण उपाय करितों, त्या बरोबर स्त्रियांच्याही सुधारणेचा विचार केलाच पाहिजे. पुरुषांस जर विद्येचा उपयोग असेल, पुरुषांच्या बुद्धीस विद्येचा संस्कार घडणें इष्ट आहे, असें असेल, तर तीच गोष्ट स्त्रियांसही लागू आहे. ही गोष्ट लक्ष्यांत वागवावी.

**सत्सहवास किंवा सुसंगति**—कुटुंबांतील मनुष्यांस ( मग पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत ) पहिल्यापासून सत्सहवास किंवा चांगली संगति असणें, हें खचित अवश्य आहे. या विषयावर एक स्वतंत्र लहानसा ग्रंथच होईल. व मराठींत 'सद्वर्तन' ह्मणून एक लहानसें पुस्तक आहे, हें सर्वांस ठाऊकच आहे. परंतु प्रस्तुत स्थळीं आह्मी एवढेंच सांगतों कीं, ज्या कुटुंबांतून नेहमीं कलह माजून राहिलेले असतात, त्या कुटुंबा-

---

* आमचे विद्वान् मित्र सदरहू निनावी शास्त्रिबोवा यांनी या ठिकाणीं एक कोटिक्रम लढविला तो येथें समग्र देण्यासारखा आहे म्हणून देतों. त्याची यथार्थता पाहण्याचें काम मात्र आह्मी वाचकांवरच सोंपवितों. ते ह्मणाले:—"पुरुष व स्त्री हीं जर एका गाडीचीं दोन चाकें आहेत, तर उभयतांच्या परस्पर स्थितींत फार अंतर राहणें मुळींच अशक्य आहे. पुरुषांच्या स्थितींत सुधारणा होण्याविषयीं केलेले जे यत्न तेच यत्न स्त्रियांची स्थिति सुधारण्यास कारणीभूत होतात. म्हणजे, स्त्रियांची उन्नतावस्था ही पुरुषांच्या उन्नतावस्थेचें आनुषंगिक फल होय. पुरुष संपत्तिमान् झाले तर त्यांचे बरोबर स्त्रियाही संपत्तिमान् अवश्य झाल्याच पाहिजेत. त्याचप्रमाणें पुरुष शहाणे व विद्वान झाले तर स्त्रि त्यांच्या ( पुरुषांच्या ) साहचर्यानें व सहवासानें शहाण्या व विद्वान् होतील. स्त्रियांची स्थिति सुधारण्याची आमच्या लोकांस इच्छा किंवा गरज नाहीं, या लोढणें आमच्या गळ्यांत युरोपियन् लोकांनीं अडकाविलें आहे !"

नि. का.

च्या माणसांत सुसंगतीचा बहुधा अभाव असतो. सुसंगतीचा महिमा आपल्या प्राचीन व संस्कृत महाराष्ट्र कवींनीं पुष्कळ ठिकाणीं नानाप्रकारें गाईला आहे. हरिदास व कथेकरी आपल्या श्रोतृमंडळीस सुसंगतीपासून कसकसे लाभ होतात, हें वारंवार सांगत असतात. पण आपण त्यांजकडे लक्ष्य देतों कोठें ? कारण एक तर, 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' व दुसरें या सुसंगतीचा संसाराशीं, किंवा इहलोकसुखाशीं किती निकट संबंध आहे, हें आमच्या स्वप्नींही नसतें. लहानपणापासून मुलांस चांगल्या संवयी लावणें व त्यांच्या पुढें चांगलीं उदाहरणें ठेवणें हा त्यांच्या शिक्षणाचा अवश्य भाग आहे. त्याकडे आमचें बरेंच दुर्लक्ष होतें असें आम्हांस वाटतें. बापानें किंवा वडील माणसांनीं मुलास शिवीगाळ करणें, किंवा त्याच्यासमक्ष वाईट गोष्टी करणें, त्याचप्रमाणें सास्वांनीं सुनांस लावून बोलणें, किंवा त्यांच्यांशीं कडू भाषण बोलणें, लहानांचे अपराध वडील माणसांनीं पोटांत न घालितां त्यांचीं मनें जेणेंकरून उद्विग्न होतील असें वर्तन करणें, इत्यादि गोष्टी सुसंगतीचा अभाव दाखवितात. यावरून मुलांस, ह्मणजे अर्थात् जे पुढें परस्परांशीं भांडणारे भाऊबंद होणार, त्यांस चांगला कित्ता घालून देणें, व त्यांस सुसंगति लावणें हें कलहाच्या प्रवृत्तीचें अंशतः तरी निवारण करील, ही गोष्ट लक्ष्यांत येणार आहे.

येणेंप्रमाणें भाऊबंदांत कलह उत्पन्न होण्याचीं कारणें व उपाय यांचा विचार आम्हीं केला. केलेल्या प्रतिपादनावरून असें लक्षांत येईल कीं, विभक्तपणा होणें ही गोष्ट बरीच अनिवार्य आहे. ही बहुत कालपर्यंत टाळिल्यानें टाळितां येईल, असेंही वाटत नाहीं. कधींना कधीं तरी विभक्तपणा होणारच ! हें वर आम्हीं एका ठिकाणीं ह्मणून सोडिलेंच आहे. एकत्रपणाला जोंपर्यंत अनुकूल साधनें आहेत, ह्मणजे भाऊबंदांचा फार विस्तार व बखेडा माजलेला नाहीं, भाऊबंद समंजस आहेत, व एकमेकांच्या सोयी पहात आहेत, व सुखानें आणि समाधानानें रहात आहेत, तोंपर्यंत एकत्रपणांत सुख आहे, एकत्रपणापासून फायदे आहेत, मितव्यय आहे, प्रसंगविशेषीं परस्परांस साहाय्य होतें वगैरे गोष्टी आम्ही सर्वथा कबूल करितों. परंतु, कारणांच्या सदरांत ज्या गोष्टी आम्हीं नमूद केल्या आहेत, त्या, ज्या अर्थीं मनुष्य स्वभावास नेहमीं चिकटून रहाता-

त, त्या अर्थी अशी ही एकत्रपणाची स्थिति चिरकाल टिकण्यासारखी नाहीं. कारण, असें हें एकत्र असणारें कुटुंब कांचेच्या भांड्याप्रमाणें आहे, केव्हां पिचेल याचा नियम सांगवत नाहीं. कारणपरत्वें, त्याच्या अंगचा चिवटपणा जाऊन त्यांत ठिसूळपणा उत्पन्न होतो. किंवा एकत्र असलेले भाऊबंदांचें कुटुंब म्हणजे दारूप्रमाणें पेट घेणारीं जीं द्रव्यें, अशा द्रव्यांनीं भरलेला एक गंजच असतो. यामुळें एखादी आगंतुक ठिणगी त्याच्यावर पडून एकत्र असणाऱ्या कुटुंबरूपी त्या गंजास कलहरूपी आग्नि लागून केव्हां त्याचा भडका होईल, हें सांगवत नाहीं! असा हा सिद्धांत वर केलेल्या प्रतिपादनावरून ठरतो.

**विभक्तपणा**—आतां हा विभक्तपणा झाल्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं, असा प्रसंग येऊन ठेपला असतां, कलह, न वाढवितां विभक्तपणा कोणत्या रीतीनें करावा, याचा खालीं लिहिल्याप्रमाणें थोडक्यांत विचार करून, हा विषय पुरा करितों.

विभक्त होणें, हा शेवटला उपाय करणें भाग पडल्यास अधिक नुकसान होऊं नये म्हणून, खालीं लिहिल्याप्रमाणें दोन प्रकारांपैकीं एका प्रकारानें वांटणी करावीः—

१ ला—कुटुंबांतील समंजस माणसांनीं एकमेकांचे विचारें व एकमेकांची समजूत घालून, वांटणी करून घेणें. हा उत्तम मार्ग.

२ रा—तसें नच होईल तर, आपल्या गांवांतली किंवा स्नेहसंबंधांतलीं, वयोवृद्ध, अनुभवी, शहाणीं, निस्पृह, अशीं माणसें निवडून त्यांच्या सल्ल्यानें, त्यांच्या विचारानें वांटणी करून घेणें. हा प्रकार 'पंचायत' म्हणून पूर्वीपासून प्रसिद्ध आहेच व कायद्यानेंही मान्य केलेला आहे.

समाप्त.

# वेळ.

"जाऊं द्या की हो! त्यांत काय आहे? एका पांच मिनिटांनीं काय होतं आहे?" असे आपण काढलेले किंवा दुसऱ्या कोणीं काढलेले उद्गार आपण किती वेळां ऐकतों? मला वाटतें, त्याला कांहीं गणतीच नाहीं. दिवसांतून एक लाख वेळां असले उद्गार आपल्या मुखांतून किंवा आपल्या देखत दुसऱ्याच्या मुखांतून निघत असतील. परंतु त्या पांच मिनिटांत काय होईल आणि काय नाहीं याचा आपण कधीं विचार केला आहे? तींच पांच मिनिटें उपयोगाला लावलीं असतां आपला अतिशय फायदा होणार नाहीं असें कशावरून? एका पांच मिनिटांच्या उशीरानें जग नेपोलिअनच्या तडाक्यांतून सुटलें. तीं पांच मिनिटें मार्शल ग्रूशनें वायां जाऊं दिलीं नसतीं तर आज जो आपण जगाचा इतिहास वाचतों, तोच वाचतोंना. त्यांत फार फरक पडला असता. हें त्या पांच मिनिटांचें मोल आहे. मनुष्य प्राणी जन्मल्यापासून अतिशय मोलाची आणि मुबलक अशी जी काय गोष्ट त्याला मिळते ती **वेळ** ही होय. एका अर्थीं हिच्या इतकी मुबलक गोष्ट कोणचीच नाहीं. दुसऱ्या अर्थीं हिच्या इतकी अत्यंत थोडी अशी गोष्ट नाहीं. कवि म्हणतात.

**कालोह्ययं निरवधिः**

होय. कबूल आहे; परंतु त्या अनंतकालाचा कितवा हिस्सा आमच्या प्रत्येकाच्या वांट्यास येतो? विश्वाचें उत्क्रमण होऊं लागण्या पूर्वींपासून **काल** हा आहेच. त्याला मर्यादा नाहीं. पुढेंही असेंच उत्क्रमण होतां होतां विश्वाचा नाश झाला किंवा दुसरें कांहीं स्वरूप त्याला आलें तरी काल हा रहाणारच. तेव्हां इतका हा काल चमत्कारिक असतां त्याला आह्मी अल्प, "थोडा" असें कां ह्मणतों? सकृद्दर्शनीं प्रश्न मोठा समर्पक दिसतो; परंतु आपणांपैकीं प्रत्येकाच्या वांट्यास या अनंतकाळापैकीं कितवा भाग येतो? असा प्रश्न विचारला असतां त्याला उत्तर कोण काय देणार आहे? असें असून आपण आपला काळ घालवितों कसा? याचा कधीं विचार करतों काय? मला वाटतें या प्रश्नाचें उत्तर 'होय' असें देण्यास फारच थोडे सिद्ध असतील. अनंत काळापैकीं आपल्या वांट्यास आलेला

काल किती ? हा प्रश्न आणि पृथ्वीवरील वालुकाराशींतून एक कण घेऊन हा त्या राशीचा कितवा हिस्सा ह्या, किंवा एक परमाणु घेऊन हा सर्व विश्वाचा कितवा हिस्सा या प्रश्नाप्रमाणेंच उपहासात्मक आहे. सहज आपण एकांतीं बसावें आणि आपल्या मनांतच असा प्रश्न करावा कीं, मी ह्मणजे या जलस्थलादि चराचर विश्वाचा कितवा भाग ? वाहवा ! असा विचार जर मनुष्यप्राणी रोज करील तर त्याच्या अंगची अहंमन्यता तेव्हांच निघून जाईल. पण तें इष्ट नाहीं. असो.

इतका अल्प जो आपल्या वांट्याला आलेला वेळ त्याचा विनियोग आपण करितों कसा ! याचा कांहीं तरी विचार करतों काय ? आपल्यापैकीं बहुतेक 'नाहीं' असेंच उत्तर देतील. आपल्या वांट्याला आलेला काळाचा हिस्सा अत्यंत कमी, त्याचा विनियोग होतां होईल तों चांगल्या तऱ्हेनें केलाच पाहिजे असें समजून जो या जगांत वर्तन ठेवील तोच शहाणा; परंतु जगाचें नशीब इतकें चांगलें नसल्यामुळें, त्यांत असे शहाणे फारच थोडे निपजतात. आजपर्यंत तत्त्वज्ञानी नीतिशास्त्रज्ञ यांनीं ज्या गोष्टीचा काथ्याकूट अतिशय केला आहे ती गोष्ट 'आयुष्याचें अल्पत्व' ही होय. कोणी ह्मणतो आपलें आयुष्य आळवाच्या पानावरील पाण्याप्रमाणें आहे. तें जसें केव्हांच निसटून जाईल हें कळत नाहीं तद्वतच आयुष्याची गोष्ट आहे. कोणी ह्मणतो आयुष्य हें पाण्याच्या बुडबुड्यासारखें; कोणी ह्मणतो स्वप्नाप्रमाणें आहे. असे अनेक दाखले व उदाहरणें देऊन तत्त्वज्ञान्यांनीं व साधुसंतांनीं आपल्यास आयुष्याच्या अल्पत्वाविषयीं सांगितलें आहे, परंतु आपण कसले निगर्गट्ट ! आपल्यास त्याचें कांहींच वाटत नाहीं. त्यांनीं असें सांगितलें ह्मणजे आपण मान डोलवण्यास कमी करीत नाहीं. किंबहुना आपल्या आपल्या मनाचीही खात्री होते कीं, त्यांचें बोलणें खरें आहे. इतकेंच नाहीं, आपण स्वतः तें जाणत असतों; व त्याचा लोकांस उपदेश करतों; परंतु हीं सर्व पुराणांतलीं वांगीं पुराणांतच रहातात. घरीं आणली कीं त्यांची चमचमीत भाजी होऊन या लोलुप जिभेला भेटतात. कांहीं गोष्टी करीत असतांना आपण व्यवहारांत असेंच समजतों कीं, आपल्या जवळ लागेल तितका वेळ आहे. मारुतीच्या शेंपटाप्रमाणें किंवा गोरखनाथाच्या कमंडलूंतील गंगेप्रमाणें तो अनंत आहे असें वाटतें. "अमुक अमुक गोष्ट ना ? राहूं द्या

कीं. आजच काय तिचं आडलं आहे? करूं उद्यां;" जणूं काय उद्यां ती गोष्ट करण्याला कांहीं अडथळे यायचेच नाहींत. कोणीकडून आजचा वेळ टाळावयाचा. दुसरें कांहीं नाहीं. मनुष्यप्राणी एकंदरींत विश्रांतीचा मोठा चाहता दिसतो. काम करणें हें त्याच्या स्वभावास आवडतच नाहीं. पहा कीं, या जगांत तो होतां होईल तों काम करणें टाळतो इतकेंच नाहीं तर त्याच्या, 'मरणानंतर काय होतें? मनुष्यप्राणी कोठें जातो?' इत्यादि संबंधानें ज्या कल्पना आहेत त्याही अशा आहेत कीं त्यांपासून त्याचें विश्रांन्तिलोलुपत्व सहज दिसून येतें. त्याच्या पुढील स्थितीच्या कल्पना काय? तर तींत श्रम न करितां सुख. तिला तो स्वर्ग ह्मणतो. स्वर्ग याचा अर्थ काय? तर केवळ सुखाचें स्थान. ज्यांपासून म्हणून दुःखाचें वारें उत्पन्न होईल त्या गोष्टी तेथें नसावयाच्या. अशी आपली कल्पना. कोणच्याही धर्म-पुस्तकांत बघा. पुढें ज्या जगांत जायचें आहे त्या जगांत अत्यंत काम आहे; खाणें नाहीं; पिणें नाहीं; भूक नाहीं; तहान नाहीं; तेथें जाऊन फक्त श्रम करायचे आहेत. असें कोणी कधीं सांगत नाहीं. हें बरें वाईट हा भाग निराळा; परंतु आहे ही गोष्ट अशी आहे खरी. तेव्हां मनुष्यानें विश्रांती घेण्याकरितां झटणें हें त्याच्या स्वभावास योग्य आहे असें दिसतें. परंतु, एक असा विचार करा कीं मनुष्यप्राण्याची जी काय एवढी खटपट चालली आहे ती कशाकरितां? याचें उत्तर एका शब्दांत आणि तें एकच आहे. 'सुखाकरितां' असें कोण म्हणणार नाहीं? आपल्याला दुःख व्हावें ह्मणून कोणी तरी खटपटी करतो आहे काय? खरोखर आपल्यास दुःख व्हावें अशी इच्छा धरून, त्या इच्छेची सफलता करून घेण्याकरितां एकही प्राणी झटत नाहीं. जी काय खटपट चालते, ती फक्त सुखाकरितां. असें जर आहे, आणि वेळ व्यर्थ न दवडतां सत्कारणीं लावल्यानें जर सुखोत्पत्ति आहे हें खरें आहे, तर मग मनुष्य वेळ व्यर्थ कां दवडतो? जगांतील बहुतेक लोक वेळेचा दुरुपयोग करितात हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक प्राणी निव्वळ स्वसुखाकरितां झटत असतो, त्याला, सुखप्राप्ति व्हावी या सारखी दुसरी बलवत्तर इच्छा कोणचीही नाहीं हेंही निर्विवाद आहे. वेळेचा सदुपयोग केला तर सुख प्राप्ति होती हें ही प्रत्येक जण कबूल करील. असें असतां वेळेचा दुरुपयोग काय ह्मणून होतो? हा प्रश्न मोठा चमत्कारिक आहे. इतक्या

तिन्ही गोष्टी निर्विवाद असतां त्यांचा संयोग कां होत नाहीं? या वेळेच्या दुरुपयोगाचें कारण काय? कारण कांहीं तरी बलवत्तम असलें पाहिजे. कांकीं, त्यापासून सुखोत्पत्ति नसून व मानवी प्राण्यास सुखेच्छा बलवत्तम असून तो वेळेचा दुरुपयोगच करतो. याला कारणें दोन देतां येतील. एक अविचार. आपण स्थूल मानानें सुखाचे दोन वर्ग पाडूं. एक **तात्कालिक व क्षणिक** सुख; दुसरें **दूरवार्ति** परंतु **सतत सुख.** सर्व प्राणी तात्कालिक किंवा अदूरवर्ति सुखाला भुलतात. तें क्षणिक आहे याचा विचार करीत नाहींत. दूरवार्ति सुख सततचें खरें, तें मिळण्याची इच्छा खरी, परंतु तें हातीं येईपर्यंत थांबण्याला कोणाला धीर होत नाहीं. त्याच्यांत मोठा दोष काय तो दूरवर्तित्वाचा. याला आपण एक अगदीं व्यवहारांतलें उदाहरण घेऊं. लहानपणीं मुलाला गोड खावयास दिलें, ह्मणजे तें खाऊन त्याला आणखी मागण्याची इच्छा होते. त्याच्या शरीर संवर्धनाला साखरेची जितकी अवश्यकता असते त्याच्यापेक्षां ज्यास्त खाण्याची इच्छा होते, ही कां? तर तात्कालिक सुखाची इच्छा. तें क्षणिक आहे हा विचारच नाहीं. जिभेवर ठेवल्याबरोबर जें काय मनाला वाटणारें समाधान, तेंच त्याला त्यावेळीं दिसत असतें; परंतु पुढें या अति खाण्यापासून पोटांत कृमि उत्पन्न होतील, आपल्यास त्यांपासून त्रास होईल हा विचारच नाहीं. मुलास विचार नाहीं असें आपण ह्मणतों; परंतु आपली स्थिती त्याच्या स्थितीहून कांहीं भिन्न नाहीं. त्याच्या प्रमाणेंच आपण अविचारी आहों. नाहीं. ही माझी चूक आहे. आपण त्याच्या पेक्षां एका गोष्टींत भिन्न आहोंत. ती गोष्ट ही. तें अजाण आणि आपण सुजाण. त्याला, पुढें आपल्याला या आतां ‘ सुखें वाटणाऱ्या गोष्टींपासून दुःख होणार हें ठाऊक नसतें. आपली गोष्ट तशी नाहीं. आपण या तात्कालिक सुखांत अर्थ नाहीं, हें जाणत असून त्याला लोलुप होतों व सतत सुख सोडून देतों. हा जो अविचार तोच आपल्या “ वेळेच्या दुरुपयोगा ” चें कारण. “ जाऊंद्या हो ! आजच काय झालें आहे? करून टाकूं तें काम उद्यां ” असें ह्मणण्यांत आपण दाखवतों काय? तर **सतत** परंतु **दूरवर्ति** सुखाला झुगारून **क्षणिक** परंतु **अदूरवर्ति** अशा सुखाकरितां आपण यत्न करीत आहोंत. आजचें काम आज केल्यानें आपणांस तें काम करितांना तत्काल श्रम होतात; श्रम करीत असतांना सुख वाटत नाहीं. जें सद्यःसुखकर

नाहीं तें करून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दूरवर्ति सुखाची इच्छा धरणें हें होत नाहीं. अर्थात् या वेळीं सुखांत ( विश्रांतींत ) आहोंत, ते उठून पुढें होणाऱ्या सुखाकरितां श्रम करीत बसणें ह्मणजे आतांचें सुख टाकून दूरच्या सुखाकरितां खटपट करणें आहे. तें व्हावें कसें? हें होत नाहीं ( इच्छा असो. नसो. ) ह्मणून तर वेळेचा दुरुपयोग होतो. हा जो अविचार तो त्या दुरुपयोगाचें किंवा निरुपयोगाचें कारण आहे. दुसरें कारण; आपलें कर्तव्य काय? आपण या जगांत येऊन करावयाचें काय? या व या अर्थाच्या इतर प्रश्नांचें समर्पक उत्तर देतां न येणें, किंवा न समजणें हें होय. अविचार याचा अर्थ पूर्णपणें मनांत घेतला तर हें दुसरें ह्मणून जें कारण दिलें आहे तें त्या पहिल्या कारणाखालींच येतें असें सहज दिसून येईल. लहानपणापासून आपल्याला या संबंधानें शिक्षणच ठीक मिळत नाहीं. आपलें या जगांत आल्यावर 'उद्योग' हें कर्तव्य आहे असें आपणास नीट शिकविलें जात नाहीं. वेळेचा उपयोग करून घेत असावें असें सांगतात पुष्कळ; परंतु उदाहरणें मिळत नाहींत मुळींच. जो वरील उपदेश सांगतो तोच घटकेनें पाहिलें असतां वेळ कशी तरी कंठतांना दिसतो. अशामुळें आपल्या मनावर त्या उपदेशाचें कांहींच वजन पडत नाहीं. आपल्याला मध्य आफ्रिकेतील लोकांचे रीती रिवाज काय आहेत त्यांचें ज्ञान करून देतात; मिसिसिपीनदीचा उगम कुठें आहे तें सांगतात; त्याचे नकाशे दाखवितात; राज्यव्यवस्था कशी असावी? निरनिराळ्या कलांचें महत्व काय? इत्यादि सर्व गोष्टींचें शिक्षण ओतप्रोत मिळतें; परंतु वेळेचें मोल काय? हें कोणी शिकवीत नाहीं. तोंडानें कांहीं तरी शिकवितात पण उदाहरणांनीं कोणीच शिकवीत नाहीं; त्याचा नकाशा कोणीच दाखवीत नाहीं. माझ्या मतें नीतिशिक्षणाचा हा फार मोठा भाग आहे. सदुद्योगांत काळ कसा घालवावा हें शिकविणें जर नीतिशिक्षणांत येत नसेल, तर कोणचें येतें तें सांगणें मोठें कठिण आहे. प्रत्येक क्षणाची किंमत काय आहे हें, कोणी मुलांच्या मनावर ठसवीत नाहीं. "बाबारे प्रत्येक क्षण चांगल्या तऱ्हेनें घालीव ह्मणजे दिवस चांगल्या तऱ्हेनें जातील कीं नाहीं याची तुला काळजी करायला नको" असें क्षणोक्षणीं मनावर ठसविलें पाहिजे. शाळेंत काय, घरीं काय, इतर ठिकाणीं काय, "जाऊंद्या कीं पांचच मिनिटें गेलींना?" असे उद्गार ऐकूं ये-

तात. कोणी असें म्हणत नाहीं " हा क्षण ना? व्यर्थ घालवूं नका? या. हें करा." सकाळीं, संध्याकाळीं; माडीवर, खालीं; जेवणापूर्वीं, जेवणानंतर; जेवायच्या वेळीं; केव्हां ही पहा, " जाऊंद्यां उद्यां पाहूं " हें ऐकूं येतें. " उद्यां पाहूं! " मला तर वाटतें आजपर्यंत जीं जगांत दुःखें आलीं आणखी पुढें येतील, तीं या एका शब्दानेंच आणलीं. उद्यां उद्यां हें जे दिवशीं सरून जाईल आणि त्याच्या जागीं 'आज' हा शब्द जेव्हां येईल तो दिवस सोन्याचा. सर्व जगाच्या मोकळिकीचा. पण तो दिवस लवकर येईल असें दिसत नाहीं. इतकेंच नाहीं, तर तो दिवस कधींही यायचा नाहीं असें म्हणावें लागतें. बरें मी ह्मणतों "उद्यां" येईल. पण उपयोग काय? जी आजची रडकथा तीच उद्यां. उद्यां कांहीं आपण नवे थोडेच होणार आहोंत! इतकेंही असो. 'उद्यां'चा दिवस आला, आपण तें काम केलें असें धरूं या. पण जो दिवस गेला त्यानें केलेलें नुकसान भरून येईल काय? आमचा दिवस व्यर्थ घालविला हा पुन्हां येणार आहे काय? छे! छे!

असन्निवृत्त्यै तदतीतमेव

हें वाक्य जर कशाविषयीं पूर्णपणें खरें असेल, तर तें या निघून गेलेल्या वेळाविषयींच आहे, असें कोण ह्मणणार नाहीं? आमच्या सारखे कांहीं लोक एखादे वेळीं रोजनिशींत रोजची हकीकत ल्याहावयास बसले ह्मणजे त्यांत त्यांना ल्याहायला काय असतें? तर "कांहीं केलें नाहीं. वेळ सारा व्यर्थ गेला. हा आला, तो आला, गप्पा झाल्या, असें होतां उपयोगी नाहीं. आपल्याला जगांत जर नांव मिळवावयाचें आहे तर उद्योग केलाच पाहिजे. उद्यांपासून असें होऊं देतां उपयोगी नाहीं. निश्चय! निश्चय! निश्चय!" ही हकीकत आजची झाली. ही हकीकत एखाद्यानें पाहिली ह्मणजे त्याला असें वाटेल कीं, हा गृहस्थ खरोखरच उद्यांपासून फार उद्योगी व वेळेचें मोल जाणणारा होणार आहे. उद्यांपासून हा अत्यंत उद्योग करणार; पण त्यानें दुसरे दिवशीं रोजनिशी उघडून पहावी. त्यांत त्या दिवसाबद्दल कांहीं लिहिलेलें असलें (नसतें असें पुष्कळदां होतें!) तर असें असावयाचें. " कालच्या सारखेंच आज झालें. हें फार वाईट." अशा तऱ्हेनें वर्षाच्या प्रारंभापासून अखेरीपर्यंत चालत असतें. " बाबा! गेलारे गेला!" हें जें वाक्य आहे तें ज्याच्या मनावर ठाम बसलें असेल

तोच मनुष्य कांहीं करील तें करील. बाकी व्यर्थ. पण असे मनुष्य कितीक सांपडणार आहेत ! योग्य वेळीं काम न केल्यामुळें फजीत पावलेल्या माणसासारखें फजीतखोर माणूस दुसरें नाहीं; पण चमत्कार काय कीं अशीं फजीतखोर माणसेंच फार. असो. दुसरा एक चमत्कार पहा. अशा तऱ्हेनें वेळ घालवून मग कामाचा खूप बोजा झाला ह्मणजे "काय करावें वेळच मिळत नाहीं," अशी कुरकुर करीत बसणारे लोक फार. इतकेंच नाहीं, कांहीं लोक किंबहुना पुष्कळ लोक उद्योग नसतांना वेळेच्या टंचाईविषयीं कुरकुर करतात. मला वाटतें त्यांना रिकामपणामुळें वेळ नसतो किंवा विश्रांति, आळस, यालाच जर ते उद्योग ह्मणत असतील तर त्यांना वेळ नसेल खरा. कांहीं काळ ह्मणून जेवढा त्यांच्या ताब्यांत आहे तितक्या सगळ्याचा ते आपल्या मतानें रिकामपणाच्या रूपानें उद्योगांतच घालवीत असतात. असो. आपल्यास, रिकामपणाला किंवा विश्रांतीला उद्योग समजून "आपल्यासारखे उद्योगी कोणी नाहींत" असें ह्मणणाऱ्या लोकांविषयीं विचार करावयाचा नाहीं. ज्यांना असें वाटत असेल कीं आपल्या हातून वेळेचा निरुपयोग होतो आहे, त्यांचिकरतांच हें लिहिणें आहे. हो, वेळाची किंमत समजून द्यावयाची कोणाला ? ज्यांना ती समजत नसेल त्यांना; इतरांस काय करावयाचें आहे ? असो. वेळाच्या टंचाई बद्दलची कुरकुर टाळणें ह्मणजे वेळच्यावेळीं काम करणें. आणि वेळच्यावेळीं काम करणें ह्मणजे सतत सुखाची प्राप्ती करून घेणें आहे. असें आहे तर मग आपण नित्य नेमानें वेळच्यावेळीं काम करण्यास कां झटत नाहीं ? पहा, त्यापासून अनेक फायदे आहेत. खरी गोष्ट मुळीं अशीच आहे. शिस्तवार काम करण्यानें वेळाची टंचाई ही कधींच पडत नाहीं. प्रत्येक गोष्टीचा वेळ नेमा व ती त्या वेळीं करा म्हणजे कधींही अडचण पडणार नाहीं. कारकुनानें आपले कागद सारे कसे तरी गोळा करून ठेवले, म्हणजे एखादा विशेष कागद सांपडण्याला त्याला जशी अडचण पडते तशीच वेळच्यावेळीं काम न करणाराची गोष्ट आहे. त्या कारकुनाजवळ कागद मागायला जा. त्याला हें हुसक तें हुसक, हें पहा तें पहा असें करावें लागून सारी त्रेधा तिरपिट उडते. तशीच वेळच्यावेळीं काम न करणाऱ्याची गोष्ट. आयत्या वेळीं हें करूं कीं तें करूं ही त्रेधा. काळाचा सदुपयोग करावयाचा असा ज्या दिवशीं निश्चय

करावयाचा त्याच वेळीं त्याची शिस्तवार वांटणी करून त्याप्रमाणें वर्तन ठेवावयाचें असाही निश्चय केला पाहिजे. तरच कांहीं उपयोग होणार आहे. माझें असें म्हणणें नाहीं कीं आपण अगदीं मोकळीक ठेवूं नये. मोकळीक ही पाहिजेच. वेळ हा आपला दास केला पाहिजे. वेळाचे आपण दास होऊं देतां उपयोगी नाहीं. काळाची शेंडी धरून त्यास आपण वाकविलें पाहिजे. आपली शेंडी धरून त्यानें आपणास वांकवितां कामा नये. 'जसें वेळेस होईल तसें करूं.' 'त्याचा काय नेम, त्या वेळीं काय होईल आणि काय नाहीं' हीं व अशा तऱ्हेच्या अर्थाचीं वाक्यें होतां होईल तों मनांतून हांकलून लाविलीं पाहिजेत. त्यांच्या जागीं 'अमूक वेळीं अमुकच करीन.' 'त्या वेळीं जे होईल तें टाकून मला जें पाहिजे तेंच करीन' असें म्हटलें पाहिजे. त्या वेळीं होईल ते होईल हें उपयोगीं नाहीं. "म्हणेन त्या वेळीं करीन" असें सतत म्हणत असलें पाहिजे. असें म्हणत असलें पाहिजे हें खरें, पण त्यापासून असें समजायचें नाहीं कीं ज्या त्या वेळीं जें सुचेल तें म्हणेन आणि मग करीन. असें जो करील त्याच्यासारखा मूर्ख कोणीच नाहीं. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा. प्रत्येकानें पुढील काळाकरितां आधीं काम नेमावें व तें काम त्याच वेळीं लाखों संकटें आलीं तरी टाकून शेवटास नेईन. असें म्हणत असावें "म्हणेन त्या वेळीं करीन" ह्याचा अर्थ असा. उगीच यःकश्चित् कारणांनीं तें एकीकडे टेवूं नये. नाहीं तर 'काय करावें बोवा मला अतां तें काम करायचं होतं पण झोंपच आली.' असें म्हणावें म्हणजे झालें. वा! काय पण काम टाळण्याला कारण! झोंप आली तर झोंपेच्या वेळीं झोंप घ्या. कामाच्या वेळीं कां? कांहीं अदृष्ट व अनपेक्षित अशींच कारणें झालीं व वेळेच्या नेमलेल्या कामापेक्षां अत्यंत महत्त्वाचें काम आलें तर गोष्ट निराळी, पण तसें कांहीं कारण नसून यत्किंचित् कारणांनीं नियमित काम टाळणें म्हणजे आपल्या हातानेंच आपल्या पायांवर धोंडा पाडून घेणें आहे एखाद्या मनुष्याच्या हातून जितकें काम आठ दिवसांतून होत नाहीं तितकेंच काम दुसरा एखादा एका दिवसांत करतो. अशीं उदाहरणें काय थोडीं सांपडतात? मला वाटतें इतका एकांत व दुसऱ्यांत फरक पडण्याला मुख्य कारण वेळाचा उपयोग करण्याची शिस्त हें होय. शक्ति व बुद्धि हीं कांहीं अंशीं कारणीभूत असतील; परंतु त्यांचेकडे कारणसर्वस्व देणें

ह्मणजे पदार्थ सोडून छायेला प्रधानत्व देणें आहे. हें उघडच आहे का, काम करण्याची शक्ती असली आणि वेळेचा यथा योग्य विनियोग करण्याची बुद्धि नसली तर काय उपयोग होणार आहे! नेमलेल्या जागीं जाऊन पोंचण्याची शक्ति सशांत नव्हती असें कधींही कोणी ह्मटलें नाहीं. कासवानें मागें टाकलें ह्मणून कासवाच्या अंगीं सशाच्या इतकी पळण्याची शक्ति आली असेंही कोणी म्हणत नाहीं. नेमलेल्या ठिकाणापासून निघून नेमलेल्या ठिकाणापर्यंत जाण्याला लागणारा जो वेळ तो वास्तविक त्याच कामाकडे लावणें हें उचित. तसें ज्यानें केलें तें कासव विजय पावलें. त्याच वेळेचें तें काम सशानें 'जाऊंद्या कीं' असें म्हणून आळसावर टाकलें व झोंप घेतली; आणि मग ती वेळ गेल्यावर फजीतखोराप्रमाणें तो धडपडून उठला आणि पळत सुटला. अशानें काय होणार? विश्रांती पाहिजे,नको कोण ह्मणतो? पण विश्रांतीच्या वेळीं विश्रांती. ससा नेमलेल्या जागीं जाऊन झोंप घेता तर त्याच्या मूर्खपणाचें उदाहरण देऊन जगास शहाणें करण्याचें ईसापानें कधींही केलें नसतें. ज्याला एकदां उद्योगाची चटक लागली, तो आधीं कधीं विश्रांती विश्रांती ह्मणून ओरडणारच नाहीं. त्याला विश्रांतीची आठवणच होणार नाहीं. त्याची विश्रांती ह्मणजे एका विषयाकडून दुसऱ्या विषयाकडे वळणें. इतिहास टाकून काव्य घेणें. किंवा खुर्ची करावयाची टाकून टेबल करावयास घेणें. अत्यंत श्रमाचे कामाचा कंटाळा आला ह्मणजे अगदीं थोड्या श्रमांचें काम घेणें. इतिहासाचें वाचन फार श्रमदायक; त्याचा कंटाळा आला. एखादें वर्तमानपत्र घ्या. त्याचा कंटाळा आला एखादी सुबोध चटकदार कादंबरी घ्या. नाटक घ्या. हीच खरी विश्रांती. रिकाम्या चकाट्या पिटणें अगर शरीराच्या उत्कृष्ट संगोपनाला आवश्यक असेल त्यापेक्षां अधिक झोंप घेणें यासारखें मौर्ख्य कोणचेंच नाहीं. त्यापासून आरोग्यशास्त्रदृष्ट्या जे तोटे होतील ते निराळेच त्यांचा विचार आपणांस आतां करणें नलगे; परंतु ज्या विषयाविषयीं आपण विचार करीत आहों त्या विषयाच्या दृष्टीनें पहातांही, आपणांस दिसून येईल कीं, वरच्याप्रमाणें करणें ह्मणजे वेळेच्या किंमतीविषयीं आपण कधींच विचार केला नाहीं असें दाखविणें आहे. जो त्याजविषयीं नेहमीं विचार करीत असेल, व त्या विचारापासून उत्पन्न झालेलें सुफल ज्यानें चाखलें असेल, तो वर-

च्यासारख्या कृती कधींही करणार नाहीं. वेळेचा निरुपयोग ह्मणजे 'विश्रान्ति' असें त्यास स्वप्नस्वप्नांतरींही वाटणार नाहीं. वर सांगितल्या तऱ्हेची रिकामटेकडा वेळ घालविण्याची विश्रांती कोणाला? ज्याला आळसावारी कसे तरी दिवस लोटायचे आहेत त्याला. वर सांगितलें च आहे कीं, अशा आळशाला-अहं चुकलों. 'विश्रांती' घेण्याचें अत्यंत महत्वाचें व जबाब दारीचें काम सतत व अगदीं अविहत करणाऱ्याला उद्योग करावयास वेळच नसतो. या बेटची विश्रांतींत अशी कांहीं भयंकर प्रसरण शक्ति आहे कीं कांहीं पुमूंच नये.

परिच्छेदातीतः सकलवचनानामविषयः

असा या विश्रांतीच्या प्रसरण शक्तीचा प्रकार आहे. ती एकदां जोर करूं लागली म्हणजे विश्रांतीला इतकी वाढविते कीं कित्येकांचीं आयुष्येंचीं आयुष्यें विश्रांतींतच जातात. आणि म्हणूनच त्यांस दुःखें सोसावीं लागतात. सुखदुःख हें मनावर अवलंबून विशेष. ज्याचें मन उद्योगांत गूढ त्याला आपल्या दुःखाविषयीं अगर गरजांविषयीं विचार करण्याला अवकाशच नसतो. ज्याला काम ना धंदा त्याचें मन हवें तिकडे जाण्यास मोकळें. त्याला दुःखावर विचार करण्यास हवा तितका अवकाश. असें असल्यावर दुःखाची काय उणीव? पर्वता एवढें तर काय, परंतु सृष्टी एवढें होऊनही तें त्याच्यापुढें उभें राहील. वास्तविक म्हटलें म्हणजे हें जग उद्योगाकरितां आहे. जो उद्योग करीत नाहीं तो केव्हांच ठार होणार. जीवनार्थ कलह मोठ्या झपाट्यानें चालू आहे, त्यांत योग्यतम ठरतील तेच अवशिष्ट होतील. बाकीचे केव्हांच ठणठण करीत जातील. योग्यतमता अंगीं आणण्याला साधन उद्योग आणि तो ही वेळच्यावेळीं केलेला. लढाई मार जोरानें चालली आहे त्या वेळीं काय यायची ती थोडी बहुत कुमक आली नाहीं. अपजय होऊन शत्रूंनीं लोक धरून नेल्यावर तीच कुमक आल्यास करावयाची काय? ज्या होमांत पहिले लोक पडले त्याच होमांत हे नवेही पडतील. ज्यांनीं योग्यवेळीं आपल्या शक्तीचा उपयोग केला ते राहिले, जयी झाले. ज्यांनीं तसा उपयोग केला नाहीं, ते विजयवाद्य वाजत्रींतच नाहींसे झाले. परीक्षेस दहा महिने असतां आजपासून अभ्यास न करितां दोन महिने राहिले म्हणजे पुस्तकें पाहूं लागणें म्हणजे अपजयाच्या खात्रीबद्दल मोठाथोरला पुरा-

वा करणें आहे. तेव्हांपासून अभ्यास करून सिद्धि मिळविण्याची आशा करणें ह्मणजे, काकतालीय न्यायाप्रमाणें आशा करीत बसणें आहे. आहे हा वेळ जाऊं देऊन पुढें करूं असें ह्मणणारा एक अत्यंत मूर्ख तरी असला पाहिजे, नाहीं तर त्रिकालज्ञ तरी असला पाहिजे. दुसऱ्या तिसऱ्याची असें ह्मणण्यास छाती होणार नाहीं. हो, ज्या काळावर आपण भरंवसा ठेवून रहाणार त्यांत अपरिहार्य अशीं विघ्नें येणार नाहींत कशावरून? मूर्ख असेल तो असा प्रश्न विचारणारच नाहीं, किंबहुना तात्कालिक विश्रांति सुखाच्या रसाचे घुटके घेण्यांत पूर्ण लय लागल्यामुळें, त्याला हा प्रश्न सुचणारच नाहीं; व असा प्रश्न सुचला नाहीं ह्मणजे तो आजचें काम उद्यांवर ढकलील यांत नवल नाहीं. त्रिकालज्ञ असेल तो मुळीं पुढें विघ्नें येतील असें त्याच्या दिव्यदृष्टीस दिसलें. तर तीं काढून टाकण्याची तजवीज करील आणि मग आजचें काम उद्यांवर ढकलील. धड आधेंनामधें असे जे आपण ह्मणजे हातून काम तर वेळच्या वेळीं होत नाहीं, पण काय होईल कसें होईल, काय करावें कसें करावें असें ज्यांस नेहमीं होतें त्यांची काय ती पंचाईत! पण असें पंचाईत पंचाईत ह्मणत बसून काय उपयोग? ती पंचाईत काढून टाकण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे.

क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्
क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ।

एकसारखे चार सहा तास मिळाल्यावांचून अभ्यास करायचाच नाहीं असा जर कोणी विद्यार्थ्यानें निश्चय केला, किंवा लाख रुपये एकदम मिळाल्याखेरीज धनसंग्रह करावयाचा नाहीं असा जर एकाद्या धनार्थ्यानें आग्रह धरिला, तर केवढें मौर्ख्य होणार आहे! पहिल्याला विद्या व दुसऱ्याला धन हें कधींच मिळणार नाहीं. जो क्षण आला तो उपयोगाला लावला पाहिजे आणि जो कण मिळाला तो पदरीं गांठला पाहिजे. इकडे चार क्षण सांपडले तिकडे चार क्षण सांपडले त्या सर्वांचा उपयोग दोन तऱ्हेनें केल्यामुळें बहुतेक मोठे लोक पदवीला चढले आहेत. कित्येकांनीं तर अशा तुटक क्षणांचा उपयोग करूनच मोठाले ग्रंथ लिहिले आहेत. आपण जो वेळ एवढासा ह्मणून टाकून देतों त्या एवढ्याशा वेळाचा उपयोग करूनच ते मोठे झाले. जकातीच्या नाक्यावरला जागरूक व प्रा-

माणिक जकातदार जसा कोणचेंही जकातीचें सामान जकात घेतल्या-वांचून जाऊं देत नाहीं, त्याप्रमाणेंच मोठे लोक एका क्षणासही त्याच्या-पासून उद्योगरूपानें योग्य तितका कर घेतल्याखेरीज जाऊं देत नाहींत. डाक्टर कुईव्हिएर जो पुढें प्रख्यात प्राणिशास्त्रज्ञ झाला, तो आपल्या गाडींत बसून रोग्याच्या घरोघर जातां जातां वाचन व विचार करी; व त्या वाचनाच्या विचाराचें फळ, पुढें शारीरशास्त्रावर एक मोठा ग्रंथ बाहेर पडला, हें होय. हेन्री कर्कव्हाईट् नांवाचा कवि घरून आपल्या कचेरींत जातांना, व कचेरींतून घरीं येतांना जो त्याला वेळ मिळे तेवढ्या वेळांत ग्रीक भाषा शिकला. डाक्टर मेसनगुड नांवाचा डाक्टर आपल्या एका रोग्याच्या घरून दुसऱ्या रोग्याच्या घरीं जातांना जो त्यास वेळ मिळे तो वेळ एका ल्याटिन ग्रंथाच्या भाषांतरास लावी व त्याप्रमाणें तें भाषांतर त्यानें केलेंही. हें भाषांतर त्याच्या नेहमींच्या ह्मणजे वैद्यक विषयाचें नसून एका काव्य ग्रंथाचें होतें हें विशेष. एका जर्मन डाक्टरानें अशाच वेळांत होमर कवीचें ईलिअड सबंद पाठ केलें. डार्विन साहेबांनीं आपलीं शास्त्रीय काव्यें अशाच वेळीं लिहिलीं. ही सर्व मंडळी "क्षण झाला ह्मणून व्यर्थ जाऊं देऊं नका, कण झाला ह्मणून टाकूं नका. क्षणाक्षणांनींच आयुष्य बनलेलें आहे. कणाकणांचेच पर्वत झाले आहेत" असें सदैव मनांत समजून चालणारे होते. ह्यूग् मिलर जो पुढें एवढा मोठा ग्रंथकार झाला तो आधीं पाथरवट होता. आणि तें काम करतां करतां जो त्याला थोडथोडा वेळ मिळे तेवढ्या वेळांत त्यानें भाषेचा अभ्यास केला. एलिहु-बूरिट् नांवाचा लोहार पुढें आपल्या विद्वत्तेमुळें "विद्वान्" या पदवीला आला तो अशा क्षणांचा उपयोग केल्यामुळेंच. अशा तुटक तुटक वेळींच अभ्यास करून त्यानें अठरा निरनिराळ्या भाषांचें व बावीस उपभाषांचें ज्ञान मिळविलें. अशीं आणखी किती तरी उदाहरणें देतां येतील. किंबहुना जो जो ह्मणून स्वप्रयत्नानें मोठा गृहस्थ झाला आहे (मग तो कोणच्याही कारणानें होवो) त्याच्या त्याच्या आयुष्य क्रमांत अशा तुटक तुटक क्षणांचा उपयोग केल्यामुळेंच मोठेपणा प्राप्त झाला असें आढळेल. कित्येकांना तर नेहमींचा वेळ न पुरल्यामुळें झोंपेच्या वेळांतून वेळ कमी करावा लागत असे. हें करणें चांगलें असें कोणी ह्मणणार नाहीं. परंतु जो वेळ वास्तविक कामांत घालवावयाचा तो झोंपेंत, आळसांत घालविण्यापेक्षां

झोंपेचा वेळ उद्योगांत घालविणें पुष्कळच बरें असें कोण ह्मणणार नाहीं ?

क्षणाक्षणाचा उपयोग करून घेणें ही पहिली गोष्ट झाली. आतां शिस्तीकडे पाहूं.

आजपर्यंत या वेळाच्या उपयोगावर जितक्यांनीं ह्मणून कांहीं लिहिलें आहे, तितक्यांनीं सर विलिअम् जोन्स याचें उदाहरण घेतल्यावांचून सोडलें नाहीं. अशी जरी गोष्ट आहे तरी पुन्हां तेंच उदाहरण घेऊन आह्मी काय ह्मणतों हें स्पष्ट करणार. कारण तें उदाहरणच असें आहे कीं कितीही ठिकाणीं तें दिलेलें असूंद्या, त्याचा मनावर परिणाम झाल्याखेरीज रहात नाहीं. त्यानें या अशा तुटक तुटक क्षणांक्षणांचा उपयोग करून वयास विसावें वर्ष लागलें नाहीं तोंच ग्रीक, ल्याटिन, इटालिअन, स्प्यानिश, व पोर्चुगीज् इतक्या भाषांचा अभ्यास उत्तम प्रकारचा केला होता. शिवाय तितक्याच काळांत अरबी व फारशी या भाषांचेंही बरेंचसें ज्ञान संपादलें होतें. त्याचे जितके ह्मणून चरित्रकार झाले त्या सर्वांनीं त्याच्या शिस्तीचें फार फार वर्णन केलें आहे. अमुक काम आणि त्याची वेळ हीं अगदीं बांधलेलीं. त्यानें आपल्या वेळेचा विनियोग पुढील प्रकारानें केला होता. तो कसा विनियोग करावा याबद्दल त्यानें एक पद्यच केलें होतें. त्याचा अर्थ असा. " कायद्या संबंधीं कामें करण्याला सात तास खर्चावे. विश्रांति देऊन पुन्हां ताजेतवाने करणारी अशी जी सुखनिद्रा तिला सात तास द्यावे. बाकी उरलेले दहा तास जगांत असल्या कारणानें अवश्य केलीं पाहिजेत अशा व इतर कामांकडे लावावे. ईश्वर भजनाला तर काय अमुक वेळ अशी नेमावयास नकोच. ज्याला ईश्वरभजन करणें तो कविराज वामनपंडित यांच्या उपदेशाप्रमाणें करीलच करील. हा वेळेचा जो विनियोग आहे हा प्रत्येकानें घेण्याजोगा आहे. सर्वांना उपयोगी पडणारे असे वेळेचे विभाग पाडणें फारच कठीण. कारण कोणाला कोणची वेळ सोयीची पडते हें काय सांगावें ? तरी सर विलिअम् जोन्स यांनीं आपल्या करितां केलेले वेळेचे विभाग फारच चांगले आहेत. त्याला अनुसरून चालण्याची आह्मी शिफारस करतों. लार्ड जेफ्रे यांनीं या अनेक भाषाकोविदाच्या विषयीं जे चार शब्द लिहिले आहेत ते येथें भाषांतर करून घेतले असतां वाचकांस कंटाळा येणार नाहीं अशी खात्री बाळगून ते उतरून घेतों.

"मुळापासून पहा पाहिजे तर. तुह्मांला असेंच दिसून येईल कीं त्यानें जबर उद्योग केला. आळस ह्मणून यत्किंचित्‌हीं केला नाहीं. लहानपणापासून त्यानें मुळीं असें केलें. अमुक एक विशेष गुणाकरितां ह्मणून जो कोणी प्रसिद्ध असा सांपडला त्याचें त्या गुणाकरितां त्यानें आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं उदाहरण घेतलें. मग तें उदाहरण कधींही त्यानें आपल्या मनांतून ढळूं दिलें नाहीं. मनांतला निश्चय हा कीं मी त्या गुणांत त्याच्या सारखा होईन. असा पक्का निश्चय करून त्यानें त्या त्या गुणांची आपल्या अंगीं पूर्णता आणण्यास एवढीही कसूर केली नाहीं. त्याचा जन्म झाटला ह्मणजे साधारण गरीब स्थितींत असणाऱ्या आईबापांच्या पोटीं झालेला; पण त्यानें सभ्यास योग्य अशा तऱ्हेचें शिक्षण मिळविण्याचा व ज्ञानसंपन्न होण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें तो अमलांतही आणला. तो पुढें जज्जाच्या जागेवर गेला होता तर त्या जागेला लागणाऱ्या ज्ञानाचाही त्यानें अत्यंत संग्रह केला व त्या ज्ञानसंग्रहाची वृद्धि केली. नुसता विद्वान्‌ ह्मणून कीर्ति व्हावी एवढाच त्याचा हेतु नव्हता तर जगाच्या कांहीं तरी वास्तविक उपयोगीं पडावें हा मुख्य हेतु. देशाभिमान तर काय नुसता त्याच्या मनांत प्रज्वलित होता. सद्गुणाचें तो केवळ माहेरघर व राजनीतींत त्याच्या सारखा कुशल विरळा. ज्याचें सदोदित उदाहरण द्यावें व घ्यावें असा जो त्याचा उद्योग तो व त्याचा एकनिश्चय हीं दोन्हीही मोठें होऊं पहाणाऱ्यांनीं लक्ष्यांत धरलीं पाहिजेत. त्यानें आपल्या थोड्याशा आयुष्यक्रमांत ज्या काय गोष्टी केल्या त्या सर्व वरील दोन गोष्टींनीं त्यानें पार पाडल्या. हें मुळीं असेंच आहे कीं, ज्यांनीं ज्यांनीं आपलें नांव मागें ठेविलें आहे त्यांचा त्यांचा चरित्रक्रम जर आपण मुळापासून पहात गेलों तर आपणांस स्पष्ट दिसून येईल कीं जगांत अजरामर कीर्ति जर ठेवायची आहे व खरा मोठेपणा मिळवायचा आहे तर अत्यंत श्रम केल्यावांचून किंवा क्लेश भोगिल्यावांचून किंवा तो मिळण्याची योग्यता अंगीं आणल्यावांचून कांहींएक होत नाहीं; तसें त्या बरोबर हेंही दिसून येईल कीं, कोणच्याही गोष्टींत सिद्धि मिळविण्याला विलक्षण बुद्धीपेक्षां एकनिश्चय व उद्योगित्व हींच अधिक अवश्य होत."

कोणत्याही गोष्टींत सिद्धि मिळविण्याचे जे फार महत्वाचे मार्ग आहेत

त्या सगळ्यांत वेळेचा शिस्तवार उपयोग करणें हा फार महत्वाचा मार्ग आहे. किंबहुना असेंही ह्मणतां येईल कीं तोच मार्ग काय तो सिद्धि देणारा आहे. कोलरिज् कवि ह्मणतो " ज्याला शिस्त ठाऊक नाहीं त्याला कांहींच ठाऊक नाहीं. ज्याला शिस्तीचा गुण नाहीं त्याला कोणचाच गुण नाहीं. कारण बाकीचे गुण असून नसून त्याला सारखेच. ज्याला शिस्त फार, जो अगदीं वेळेवर काम करण्यास कधींही चुकत नाहीं, त्याला आपण ' तो ह्मणजे एक चालतें बोलतें घड्याळ आहे ' असें ह्मणतों. आपण असें ह्मणतों खरें, पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. घड्याळ काय ? तुह्मांला वेळेचे नियमित विभाग दाखवितें याच्या पलीकडे कांहीं नाहीं. शिस्तवार मनुष्य तो वेळेचा विभाग आपलासा करून घेतो. त्याच्यापासून काम करून घेतो. आळशी मनुष्याविषयीं आपण ह्मणतों तो काय वेळ कशी तरी मारता झाले. पण उद्योगी मनुष्य त्या वेळेंत कांहीं तरी जीव आणतो. तो काम करून त्या वेळेला विशिष्टता आणतो. "

' वेळ ह्मणजेच पैसा ' अशी एक इंग्रजींत म्हण आहे. ही म्हण जर प्रत्येक मनुष्य ध्यानांत धरून वर्तन ठेवील तर किती बरें चांगलें होणार आहे ? पण होतें आहे कोठें ? वेळ ह्मणजे पैसा इतकेंच नव्हे तर वेळ म्हणजे सौख्य, शांतता, समाधान, संतोष, सर्व कांहीं वेळ आहे. सुवर्ण हातीं असल्यावर जशीं हवीं तीं पात्रें करतां येतात तसेंच वेळाचें आहे. तो हातीं ठेवला म्हणजे काय हवें तें होतें. मूर्खाच्या हातीं जो वेळ असतो त्याचा तो आपल्या परीनें उपयोग करतो व त्या वेळीं असे कांहीं उद्योग करतो कीं जगाला त्यापासून त्रास व्हावा. तोच शहाण्याचा हातचा वेळ जगाच्या कल्याणाकडे लागतो. एकाला वेळ अतिशय होतो. दुसऱ्याला पुरत नाहीं. एक आतां इतक्या वेळांत काय करूं असें म्हणतो; दुसरा इतक्या वेळांत अमुक करीनच करीन असें म्हणून तें अमलांत आणतो. अस्तु.

ज्यांला वेळेचा उपयोग खरोखर करून घ्यावयाचा आहे अशा गृहस्थांकरतां सदैव सारखे उपयोगी पडणारे असे चार पांच नियम देणें श्रेयस्कर होईल असें वाटतें. ते नियम हे:—

**एका वेळीं एकच गोष्ट करीत असावें.**

**जें आतां केलेंच पाहिजे तें ताबडतोब करावेंच.**

**जें आज केलेंच पाहिजे तें उद्यांवर ढकलूं नये:**
**स्वतांला जें काम करतां येईल तें दुसऱ्यावर टाकूं नये.**
**विनाकारण गर्दी केली कीं काम लवकर व्हायचें नाहीं.**

पण असें नियम वाचण्यापेक्षां उदाहरणें पहावीं तें चांगलें. आजपर्यंत जे जे मोठे लोक झाले त्यांचीं त्यांचीं चरित्रें वाचावीं व त्यांतून आपल्याला हवें तें घ्यावें. त्यांपासून जो फायदा होईल त्याच्या पुढें असे लाखों नियम आले तरी कुचकामाचे. अमुक अमुक मनुष्य फारच कीर्तिवंत झाला आहे असें ऐकलें कीं तो उद्योगानें व वेळेच्या शिस्तवार उपयोगानें झाला आहे ह्मणून समजावें. अमुक एका गृहस्थानें आपल्या विद्वत्तेनें व शहाणपणानें आपल्या कुटुंबाचें किंवा शेजाऱ्याचें किंवा गांवाचें किंवा देशाचें बरें केलें असें ऐकलें कीं हें सर्व, वेळेच्या सदुपयोगानें त्यानें केलें असें समजावेंच. तर अशा लोकांचीं उदाहरणें घेऊन आपण वेळेचा उपयोग करण्यास शिकावें व ग्लाड्स्टन् साहेबांचें पुढील वाक्य सदैव ध्यानांत धरावें.

" Thrift of time will repay you in after-life with a usary of profit beyond your most sanguine dreams; while the waste of it will make you dwindle alike in intellectual and moral stature beyond your darkest reckonings. "

# वाचन.

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥

१. प्रत्यक्षरीत्या म्हणा, परोक्षरीत्या म्हणा, मनुष्य शिक्षित होत असतो. तो स्वतां आपल्या खटपटींनीं शिक्षित होतो इतकेंच नाहीं, परंतु ज्या गोष्टी घडणें अगर न घडणें हें त्याच्या हातचें नाहीं त्या गोष्टींपासून देखील त्याला शिक्षण मिळत असतें. त्याच्या एकंदर ज्ञानापैकीं उपजत ज्ञानाचा अंश काढूं म्हटलें तर तो इतका थोडा सांपडेल कीं, तो जमेंत देखील धरतां येणार नाहीं. त्याच्या ज्ञानांतील बहतांश अनुभवजन्य असतो. जगांत आल्यानंतर अनेक विध व्यापार व व्यवहार पाहून तो ज्ञानी होतो. असल्या तऱ्हेचे व्यापार व व्यवहार पाहून जें अनुभव जन्य ज्ञान त्याला येतें त्यामुळेंच त्याच्यांत व इतर प्राण्यांत ज्ञानाच्या संबंधानें फरक पडला आहे. अस्तु.

वर सांगितलेलें अनुभवजन्य ज्ञान द्विविध आहे. एक स्वतःच्या अनुभवापासून प्राप्त होणारें व दुसरें दुसऱ्याच्या अनुभवापासून प्राप्त होणारें. इतर पशूंत व मनुष्य प्राण्यांत शहाणपणाच्या कामीं इतका थोरला फरक पडण्याचें कारण हें परानुभवजन्य ज्ञानच होय. मनुष्यास काय किंवा इतर प्राण्यास काय, सृष्टींत आल्यापासून स्वतांचा अनुभव हा आहेच आहे. परंतु मनुष्य स्वतांच्या अनुभवाचा फायदा करून घेऊन इतरास आपला अनुभव सांगतो व आपण इतराचा घेतो, यामुळें त्याच्या ज्ञानांत पराकाष्ठेची भर पडते. पशूंचें तसें नाहीं. एखादें ढोर एखाद्या मार्गानें जातांना पडलें तर तें स्वतां पुनरपि कधींही त्या वाटेनें जाणार नाहीं; परंतु हा आपला अनुभव दुसऱ्या ढोरांस त्याला सांगतां येत नाहीं; किंवा दुसऱ्यांचा अनुभव त्यास कळत नाहीं. ही गोष्ट ध्यानांत आणली ह्मणजे आपणांस सहज असें दिसून येईल कीं मनुष्याचें उपजत अथवा सहज ज्ञान अत्यंत थोडें आहे इतकेंच नाहीं, तर त्याचें स्वानुभवजन्य-ज्ञानही अ-

त्यांत थोडेंच आहे. परानुभव जाणून घेण्याची अक्कल त्याला नसती तर तो पशू इतकाच शहाणा राहिला असता; परंतु दैवयोगानें तशी गोष्ट नाहीं. इतकेंच नव्हे, तर उलट परानुभव आपल्यास कळावा व आपला अनुभव दुसऱ्यास जाणवावा ह्मणून अनेक साधनें व युक्त्या तो काढीत आहे व त्या काढण्याची त्याची अक्कल उत्तरोत्तर वाढतही आहे. पराचा अनुभव आपणास कळावा म्हणून ज्या कांहीं गोष्टी त्यानें बनविल्या आहेत त्यांपैकीं 'भाषा' ही एक सर्वांत महत्वाची गोष्ट आहे. ही भाषा जर नसती तर परानुभव-जन्य-ज्ञान नेत्रादि इंद्रियांच्या द्वारें मिळतें तेवढेंच. आणि तें किती मित असतें हें येथें विस्तारानें सांगावयाची आवश्यकता नाहीं. तें मित असतें इतकेंच नाहीं परंतु अपुरेंही असतें. परानुभव पाहतांना जो काय मनावर ठसा उमटेल त्याप्रमाणें आपलें ज्ञान व्हावयाचें. मग आपल्या पहाण्यांत चुकी झाल्यास त्या ज्ञानांतही चूक होण्याचा अर्थांतच संभव आहे. याप्रमाणें एक तर तें ज्ञान अत्यंत थोडें व पुष्कळदां चुकलेलें असावयाचें; परंतु भाषेचें जबर साधन आपल्या जवळ असल्यानें दुसऱ्याचा अनुभव हवा तसा कळून घेण्यास अत्यंत सुखकर असें साधन आपणांजवळ झालें आहे. 'भाषा' असल्याकारणानें गुरुमुखाचा केवढा तरी आपणांस फायदा होतो! किंबहुना ज्या वेळीं लेखनकला मुळीं अस्तित्वांतच नव्हती त्या वेळीं केवळ 'श्रुती' व 'स्मृति' हींच काय तीं ज्ञान संपादनाचीं साधनें. प्राचीन ऋषींचे व विद्वानांचे विचार श्रुति व स्मृति यांच्या परंपरेनेंच पुढील पिढ्यांस कळावयाचे. अशा वेळीं गुरुमुख हेंच काय तें परानुभवज्ञान मिळवून देणारें मुख्यतम साधन. पुढें निवळ एवढ्याच साधनानें भागत नाहींसें पाहून अडचण आली कीं, ती दूर करण्यांत मोठा तक्षक असा जो मानव प्राणी त्यानें 'लेखनकला' काढली. या लेखनकलेनें मनुष्याचें ज्ञान तितकें वाढेना असें दिसूं लागल्यावर अर्थांतच 'मुद्रणकला' निघाली; आणि ही शेवटली कला निघाल्यापासून थोड्याच अवकाशांत मनुष्याच्या ज्ञानांत जी भर पडली आहे, तितकी प्राचीनकाळीं कधींही पडली नव्हती. इतकेंच नव्हे. तर, ही 'मुद्रणकला' प्राचीनकाळीं नव्हती असें सांगितल्यास 'मनुष्य प्राण्याला प्राचीनकाळीं ज्ञान नव्हतें' असें सांगण्यासारखेंच वाटूं लागण्याचा हल्लीं प्रसंग आला आहे. कां कीं हल्लीं परानुभवानें व विचारानें भरलेलीं

पोथ्यापुस्तकें इतकीं मुबलक झालीं आहेत कीं मुद्रणकला पृथ्वीच्या उत्पत्तीबरोबरच निघाली होती कीं काय असें वाटूं लागलें आहे. अस्तु. अशी स्थिति आज असल्यामुळें पराचा अनुभव कळून घेण्यास अत्यंत उपयोगी असें एक साधन आज आपणाजवळ झालें आहे. तें साधन इतकें जबरदस्त आहे कीं, त्याच्यापुढें **स्वानुभव, गुरुमुख** किंबहुना **विचार** हीं जीं ज्ञान संपादनाचीं प्राचीनकाळीं अत्यंत श्रेष्ठ अशीं मानलेलीं साधनें तीं एक पायरी खालीं गेलीं आहेत. त्यांपैकीं श्रेष्ठानें आपली जागा **वाचनास** दिली आहे. वाचनापासून जगाच्या ज्ञानास किती भर पडली आहे हें जाणण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें एक क्षणभर जगांतील सर्व छापखाने, तारायंत्रें वगैरे बंद झालीं आहेत अशी कल्पना करावी आणि मग त्यापासून काय अनर्थ होतात ते कल्पनेनें पुढें आणावे ह्मणजे त्यास दुसरें कोणी वर्णन करून सांगण्यास नको. मला वाटतें अशी वर सांगितलेली कल्पना करणेंच आधीं मोठें दुरापास्त होईल. कां कीं मुद्रणकला नाहींशी होणें ह्मणजे काय हेंच कोणाच्या लक्ष्यांत येणार नाहीं.

२. याप्रमाणें वाचनास आज केवढें महत्व आलें आहे व तें कसें आलें हें सांगितलें. तेव्हां आतां त्यापासून ज्ञानप्राप्ति होते असें सांगणें अत्यंत अनवश्यक आहे. त्याचप्रमाणें आजपर्यंत होऊन गेलेले सर्व, किंबहुना शंभरापैकीं नव्याण्णव विद्वान्, ग्रंथांच्या वाचनानें ज्ञान संपादन करूनच त्या पदवीस चढले हेंही येथें सांगण्याची आवश्यकता नाहीं असें वाटतें. निव्वळ स्वबुद्धिबलाच्या जोरानें विद्वान् झालेले लोक फारच थोडे, ह्मणजे लक्ष दहा लक्षांत एखादा याप्रमाणानें आढळले तर आढळतील; परंतु असले निबंध ज्या अर्थी साधारण लोकांकरितां आहेत, त्यांच्या सारख्या करितां नाहींत, त्या अर्थी त्यांच्याविषयीं आपणांस विचारच करावयाचा नाहीं. साधारण मनुष्यास ज्ञान मिळवावयाचें असल्यास राष्ट्राच्या ग्रंथसंग्रहाकडेच वळलें पाहिजे. त्यांतून स्वतांच्या प्रयत्नानेंच ज्याला ज्ञान संपादन करावयाचें त्याला दुसरा मार्गच नाहीं. त्याचें गुरुमुख '**पुस्तक**' व **विचार** हीं होत. राष्ट्रीय ग्रंथसंग्रहाखेरीज राष्ट्रांतील मोठ्या लोकांचे विचार कळण्यास दुसरा मार्ग आहे कोणचा? लाखों कोसावर असणाऱ्या, किंवा फार प्राचीन काळच्या विद्वानानें मनुष्याच्या सुखासाठीं केलेल्या, विचारांचें ज्ञान त्याच्या ग्रंथद्वारें मिळावयाचें नाहीं तर मिळावयाचें तरी कोठून! स्वानुभवानें? बिचाऱ्या

एकट्या मनुष्य प्राण्याचा तो अनुभव काय असणार ! कोणी एका महागणित्याची गोष्ट सांगतात कीं तो पुस्तकांपासून दूर असतां त्यानें यंत्रशास्त्राबद्दल कांहीं नियम शोधून काढले; परंतु पुढें एका पुस्तकालयांत पुस्तकें पहातांना त्यास तेच नियम एका पुस्तकांत सांपडले. त्या वेळीं त्या बिचाऱ्यास किती वाईट वाटलें असेल बरें! पहा कीं प्रत्येक मनुष्य जर आपल्या अनुभवानें मात्र ज्ञान संपादन करीन असें ह्मणत बसेल तर आज त्याची क्षणोक्षणीं किती फजिती उडेल ! ज्यास वाचन नाहीं त्याला पाठीमागल्या लोकांचें सर्व ज्ञान, त्यांचे सर्व विचार हीं सर्व शून्याकार आहेत. आपल्या आधीं लोक होते आणि नव्हते हें सर्व त्याला सारखेंच. आज घरेंदारें इत्यादि सुखानें रहाण्याचीं साधनें असतां जर एखादा ह्मणेल कीं मी आपला रानांत जाऊन राहीन. घरांत रहाणार नाहीं, तर त्याचा मूर्खपणा आणि पुस्तकें असून मी त्यांजपासून ज्ञानप्राप्ती करून घेणार नाहीं असें ह्मणणाराचा मूर्खपणा दोनही सारखेच. साळीचें शेंत पिकलेलें आहे; त्याला कोणी मालक नाहीं; राखण नाहीं; असें असून जर हरिणें ह्मणतील कीं आह्मी त्यापैकीं एका कणसालाही शिवणार नाहीं; तर त्यांत शेंताचें काय नुकसान होणार आहे ? बिचारीं हरिणें मात्र त्या सुखाला अंतरून, न जाणों भुकेनें तडफडून प्राणांसही मुकतील.

आजपर्यंत जगांत सुधारणेच्या प्रचंड लाटा मोठ्या जोरानें उचंबळल्या तरी कसकशा थबकल्या, त्यांस कोणकोणच्या भयंकर खडकांनीं पुढें येऊं दिलें नाहीं, त्या कोठें कोठें मागें फिरवल्या गेल्या, कोठें कोठें त्यांचा जोर कमी झाला, इत्यादि गोष्टी, व इतकेंही असून शेवटीं विजय मिळवीत त्या खडकांस डोंगरांस चट् साऱ्यांस गुंडाळून ठेवून वरवरच कशा उचंबळत गेल्या, हें जाणण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें पुस्तकांचें वाचन केलेंच पाहिजे. ज्याला आपण कालगति ह्मणतों किंवा

'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'

असें ह्मणून ज्यांबद्दल आपलें समाधान करून घेतों अशा ज्या राष्ट्रांच्या उच्चनीच स्थिति, त्यांचीं वास्तविक कारणें काय व त्यांची उपपत्ति कशी, हें जाणण्याचें जो मनांत आणील त्यास पुस्तकांवांचून गत्यंतर नाहीं. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आपला अंमल कसा बसविला व त्याला कारणें काय झालीं; मानवी जातीची एकंदर उत्पत्ति कसकशी होत गेली;

एका वेळीं सुधारणेच्या व उन्नतीच्या धवलगिरीवर बसून आनंदांत गढून गेलेला हिंदुस्थान देश, आजच्या स्थितीला कां आला; प्राचीन काळीं सर्व ज्ञात पृथ्वीवर ज्यांनीं सार्वभौमत्व गाजविलें असे रोम व ग्रीस देश हल्लीं-च्या दुरवस्थेला येण्याचीं कारणें काय झालीं; इराण, आरबस्थान इत्यादि देशांचीं वैभवें विलयाला कशीं गेलीं; त्याचप्रमाणें ज्या लोकांचें नांवही या पृथ्वीवर निघत नव्हतें, व जे अंगाला रंग लावून आपल्या टीचभर बे-टांत सैरावैरा हिंडत होते तेच लोक आज 'ज्यांच्या राज्यावर सूर्य केव्हां ही मावळत नाहीं' असे होण्याचीं कारणें काय; अत्यंत उच्च स्थि-तीला जाऊन पोंचलेलें राष्ट्र अगदीं यःकश्चित् अशा एखाद्या संकटानें अगदीं चीत झालें, असें जें दिसतें त्याचीं अंतःस्थ कारणें काय; इत्यादि गोष्टी; त्याचप्रमाणें जें जें म्हणून दृग्गोचर होतें त्याच्या त्याच्या स्थि-तींत फरक पडतात हे कसे व कां; प्रचंड वादळ होण्याला पूर्वी बहुत करून हवेंत अत्यंत शांत असतें यांचें कारण काय; झाडांच्या, कीटकांच्या पशूंच्या, व मनुष्याच्याही निरनिराळ्या जाति झाल्या कशा; इत्यादि गोष्टी इतिहासादि तीं तीं शास्त्रें वाचल्याखेरीज कशा कळाव्या?

ज्याप्रमाणें राष्ट्रांचा इतिहास वाचल्याखेरीज किंवा तीं तीं शास्त्रें वाचल्याखेरीज ज्ञानप्राप्ति व्हावयाची नाहीं व तें ज्ञान मिळाल्या का-रणानें प्रसंगविशेषीं मनुष्य शहाणपणानें वागूं शकत नाहीं त्याचप्रमाणें व्यक्तीव्यक्तींच्या इतिहासांचीही गोष्ट होय. किंबहुना साधारण मनुष्यास कीं ज्याला राज्यकारस्थानादि गोष्टींत तादृश संबंध नाहीं, त्यास राष्ट्र-चरित्रापेक्षां व्यक्तिचरित्राचेंच वाचन विशेष श्रेयस्कर व हितकर होय. तीं चरित्रेंही वाचण्यास मनुष्यानें अवश्य झटावें. कां कीं संसार हा प्र-त्येक मनुष्यास, मग तो मोठा असो वा लहान असो, लागलेला आहेच. जे विद्वान् व शहाणे झाले त्यांजवर संसारांतील बिकट प्रसंग पडले असतां ते कसे वागले हें जाणणें आपल्यास हितावह नाहीं असें कोण म्हणेल? वि-द्वानांचीं चरित्रें तर अवश्य पहावीं. कारण तीं बहुतेक दारिद्र्यानें भरलेलीं. साधारण लोकांत तरी श्रीमंतीपेक्षां दारिद्र्यच फार; तेव्हां ते लोक आपल्या दारिद्र्यरूप शत्रूशीं कसे झगडले हें कळलें म्हणजे आपणांसही थोडा बहुत धीर पोंचतो. दुसरें असें पहा. शरीराच्या पोषणाप्रमाणेंच मनाचें पोषण केलें पाहिजे. शरीराच्या भागांस सुदृढपणा येण्याला ज्याप्रमाणें

पोटांत अन्न घालून त्याचे परिपोषक रस करून ते जिकडे तिकडे पोंचावे लागतात त्याचप्रमाणें मनाचेंही आहे. मनाचें अन्न ज्ञान होय. तें ज्ञान वाचनानें मनास देऊन विचाराकडून त्याचें परिपोषण केलें पाहिजे. त्याखेरीज मनास सुदृढपणा कधींही यावयाचा नाहीं. किंचित् अप्रस्तुत भासेल तरी तुलना पूर्ण करण्याकरितां येथें एवढें सांगितलें पाहिजे कीं लहानपणीं ज्याप्रमाणें शरीरसंवर्धनास परिमाणानें ज्यास्त परिपोषक अन्न लागतें त्याप्रमाणें मनासही त्या वेळीं ज्ञानाची मोठी हाव असते. ती योग्य तऱ्हेनें पुरविणें म्हणजे मुलांकडून योग्य पुस्तकें वाचविणें होय. हें वाचनापासून होणाऱ्या ज्ञानप्राप्तीविषयीं झालें.

३. वाचनापासून दुसरा एक मोठा फायदा होतो, तो प्राचीन काळच्या किंवा सांप्रतच्याहीं मोठमोठ्या विद्वद्वरांशीं, कविवरांशीं, इतिहासकारांशीं कादंबरीकारांशीं व शास्त्रतत्त्ववेत्त्यांशीं आपला दृढ परिचय होतो हा होय. जे, आतां कांहींही केलें तरी कधींही आपल्या दृष्टीस पडावयाचे नाहींत ते चार आठ आण्यांत फार तर रुपया दोन रुपयांत आपल्या घरींदारीं पाहिजे तेथें आपली गांठ घेतात. फक्त वाचतां मात्र आलें पाहिजे. मोठमोठे ग्रंथकार हे अति उत्तम व नाजूक अशा वाद्यांसारखे आहेत. जो वाचनकलानिपुण आहे त्याला त्याच्या कलेप्रमाणें उत्तरें देतात. तो जर फार छेडून विचारील तर त्याला समाधानकारक उत्तरें ते देतातच. ज्याप्रमाणें एखादा उत्तम बीनकार बीनांतून हवे ते बोल काढतो व त्या ब्रह्मानंदांत तल्लीन होऊन जातो त्याप्रमाणेंच उत्तम वाचणारा उत्तम ग्रंथकारांपासून आपल्याला आनंदकारक बोल काढतो. चंदन जितकें घांसावें तितकें सुगंध अधिकच देतें, तद्वत् कालिदास, शेक्सपिअर, व्हिक्टरह्यूगो, डांटे इत्यादि ग्रंथकारांचें आहे. केव्हां केव्हां ते नवजलधराप्रमाणेंही वर्तन करतात. म्हणजे नवजलधर ज्याप्रमाणें सर्वांस सारखें पाणी देतो किंवा चंद्र सूर्य ज्याप्रमाणें साऱ्यांस सारखा प्रकाश देतात त्याप्रमाणेंच. जो एखादा हतभाग्य घुबडाप्रमाणें झाडाच्या ढोलींत सत्तावीस फूट खोल बसेल त्याला सूर्य तरी काय करणार आणि कोण काय करणार ? परंतु जो प्रकाशाची इच्छा धरील त्यास चंद्र सूर्य प्रकाश देतातच. वर सांगितल्या प्रकारचे ग्रंथकारसूर्यही वाचननिष्णातांस ज्ञानप्रकाश दिल्याखेरीज कधीं रहात नाहींत. दुसरी मजा ही कीं, ते शरीरानें मृत परंतु

त्यांनीं आपलीं अंतःकरणें आमचे स्वाधीन करून ठेविलीं आहेत. कालिदास, रघुवंशाचा इतिहास व शकुंतलेचें पुण्यचरित जर आपल्या मधुर मधुर अशा वाणीनें आह्मांस पाहिजे त्या वेळीं व पाहिजे तेथें सांगतो आहे तर त्यास मृत असें ह्मणावें तरी कसें ? आपलीं छत्तीस सदतीस नाटकें घेऊन मनुष्यमात्राच्या अंतःकरणांतील खडानूखडा माहिती जर शेक्स्पिअर देतो आहे तर त्याचें प्रेत ॲव्हन नदीच्या कांठीं पुरलें आहे ह्मणून शोक करावा कशाला ? मनु आपलें ज्ञान केव्हां पाहिजे तेव्हां सादर करितो आहे तर त्याला प्राचीन असें ह्मणावें कोणीं ? वाचनप्रिय मनुष्यानें क्षणभर आपल्या सभोंवार पाहिलें तर त्यास काय बरें दिसणार आहे ! कोठें शेक्सपिअर आपलीं सर्व मान्य नाटकें पुढें करून **प्रास्पेरोच्या** गुहेंत नेऊन पिशाचें व जादू पाहण्यास अगर डेन्मार्कमध्यें नेऊन **ह्याम्लेटची** दुरवस्था पाहण्यास, लागलींच मनुष्य द्वेष्ट्या **टैमनचे** उद्गार ऐकण्यास व क्षणानें **डेस्डिमोना, जुलिएट** इत्यादिकांचें अव्याज प्रेम पहाण्यास विनंति करीत आहे. पलीकडे कालिदासानें एकमेकींस विनोदपर भाषणें बोलणाऱ्या सखीसह **शकुंतला** उभी केलीच आहे. भवभूति **सीतारामांचे** व **मालतीमाधवाचे** प्रेमोद्गार ऐकविण्यास तयार आहेच. तिकडे अर्वाचीन काळचा **शेक्सपिअरच** जो **व्हिक्टरह्यूगो** तो तीनशें वर्षांपूर्वींचा **स्पेनदेशाचा** मानीपणा व सत्यप्रियता हीं दाखवायला अगदीं उत्कण्ठित आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या नेपोलिअननें केलेल्या अनन्वित कृत्यांचें वर्णनही पहाण्यास सांगत आहे. तिकडे **मॉन्टेनूही** गप्पा सांगण्यास बसला आहे. हवी ती गोष्ट त्याजवळ काढा तो तुह्मांला कांहींना कांहीं तरी नवें ज्ञान देणारच. **रोमचा** उत्कर्ष व अपकर्ष कसा झाला, हें सांगण्यास **गिबनूनें** आपला इतिहास पुढें केला आहे. **ग्रीस** देशाचा इतिहास **ग्रोट** घेऊन उभा आहेच. मन थोडें बहुत दुःखित झालें असल्यास **मोलिएर** हंसवून आनंदित करणार. **जान्स्टुअर्ट मिल्लसारखे** तत्त्ववेत्ते बुद्धिवाद करण्यास या असें ह्मणत आहेत. जे विचार आणखी दोन तीनशें वर्षांनीं सर्वसाधारण होतील असे विचार आपल्या अर्थगांभीर्यानें ओथंबलेल्या कवितेच्या द्वारें **शेले** तुह्मांपुढें ठेवीत आहे. असे एक कीं दोन ? हवे तेवढे महात्मे वाचनप्रिय माणसांची सेवा करण्यास तयार आहेत. बिचाऱ्यांनीं आपल्या बायकांमुलांशीं आनंदानें घालवावयाचा

वेळ आह्मासाठीं कष्टांत घालवून एवढाले प्रचंड उदात्तरमणीय ग्रंथ निर्माण केले. परंतु आह्मी कसले कृतघ्न ! ते उघडण्याचे देखील कष्ट घेत नाहीं. केव्हां केव्हां आपणास आळस पछाडतो व आपल्या उद्योगित्वाचा खग्रास करितो त्या वेळीं सहज जरी यांचेकडे वळलें तरी केवढा बरें फायदा होतो ! त्यांतला एखादा चट्कन् सांगतो, "बाबारे, एका ईश्वराखेरीज रिकामपण कोणासही नाहीं." दुसरा ह्मणतो, "या पृथ्वीवर मनुष्याला कां उत्पन्न केलें आहे ? उद्योगासाठीं समजलास ?" तेव्हां वाचनापासून उपदेशप्राप्ति हाही एक फायदा आहे. त्याचप्रमाणें आपल्यास नवे नवे विचार सुचतात हा केवढा फायदा आहे ! मागील लोकांचें ज्ञान मिळालें ह्मणजे नवीन गोष्टींचें ज्ञान संपादन करण्यास व आपल्या पुढील पिढीस तें देण्यास आपल्यास किती सोपें जातें ! असें नवीन ज्ञान संपादून पुढील लोकांस तें पोंचतें करणें हें आपलें कर्तव्य—इतकेंच नव्हे फार जबाबदारीचें कर्तव्य—आहे. जो तसें करीत नाहीं तो पिढीजाद संपत्तीचा अपव्यय करणारा होय. ज्याला आपलें ज्ञान पुढील लोकांस द्यावयाचें आहे, त्याला मागचें ज्ञान संपादलेंच पाहिजे. त्याखेरीज त्याला आपलें कर्तव्य योग्य तऱ्हेनें करतां येणार नाहीं. आजपर्यंत जे जे मोठाले ग्रंथकार झाले ते ते मागील ज्ञानाच्या मदतीवांचून झाले नाहींत. विचारास तर वाचनाखेरीज गत्यंतरच नाहीं. अन्न खाल्लें नाहीं तर जठरांत पचन होणार कशाचें ? वाचन नसेल तर विचार करणार कशाचा ?

४. वाचनापासून आणखी एक फायदा आहे तो मनोरंजन हा होय. मनुष्य प्राण्यास कंटाळा हा यावयाचाच. ज्या अर्थी कंटाळा हा यावयाचाच, त्या अर्थी मनाची करमणूक करून घेण्याची हाव असावयाचीच; आणि ह्मणूनच बरे वाईट असे अनेकविध मनोरंजनाचे प्रकार काढले आहेत. वाचन हा मनोरंजनाच्या उत्तम प्रकारांपैकीं एक, किंबहुना सर्वांत उत्कृष्ट प्रकार आहे. जे विद्वान् व शहाणे असतात ते बहुशः काव्यशास्त्रांच्या वाचनांत काळ घालवितात. मूर्ख असतात ते निरनिराळ्या व्यसनांत किंवा झोंपेंत काळ घालवितात. एकच एक काम अष्टौप्रहर करीत बसलें तर तें कामही चांगलें होत नाहीं, व मनही आनंदवृत्तींत असत नाहीं. त्याला कांहीं तरी विरंगुळा पाहिजे ह्मणजे तें ताजेंतवानें होतें. व्यसनांच्या यो-

गानें तें ताजेंतवानें न होतां उलट त्याचा नाश मात्र होत जातो. तात्कालिक सुख होतें तेवढ्यावर भुलून मनुष्य त्यांच्या नादीं लागतो खरा परंतु तें क्षणिक नाशकारक आहे हें ध्यानांत आणलें पाहिजे. वाचनाचें तसें नाहीं. सत्समागमास जर कोणी वाईट ह्मणेल, तर वाचनास वाईट ह्मणावें. सत्समागमानें जर मनुष्यास फायदा आहे तर वाचनापासूनही आहे. चांगल्या पुस्तकांचें वाचन हें सत्समागमाप्रमाणें नव्हे—तर प्रत्यक्ष सत्समागमच आहे.

५. एवढा वेळ वाचन व त्यापासून मिळणारे फायदे यांविषयीं झालें. परंतु वाचन ह्मणजे जें तावडींत येईल तें पुस्तक वाचलें असतां झालें कीं काय याचा विचार करूं. आतांच वर ह्मटलें आहे कीं चांगल्या पुस्तकांचें वाचन ह्मणजे सत्समागम होय. ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परंतु त्याबरोबर हेंही लक्षांत धरावें कीं वाईट पुस्तकांचें वाचन हें दुःसमागमच होय. कुसंगतीनें मनुष्य बिघडतो त्या प्रमाणेंच दुष्ट पुस्तकांनींही बिघडतो. तेव्हां ज्याप्रमाणें संसारांत भल्याची संगति करावी लागते त्याचप्रमाणें वाचनांत चांगल्या ग्रंथांची निवड केली पाहिजे. ज्यांस आपल्या वडिलांनीं वगैरे चांगला म्हटला त्याची संगति आपण करतों; तसेंच आपल्याहून जे वडील आहेत त्यांनीं ज्या ग्रंथास चांगलें म्हटलें त्या ग्रंथाची संगति करण्यास आपण तत्पर असावें. ग्रंथ हे औषधाप्रमाणें मानावे. चांगल्या वैद्यानें औषध दिलें म्हणजे आपण तें घेतों तसेंच ग्रंथ चांगल्या माणसाकडून निवडून घ्यावे.

६. त्याचप्रमाणें चांगल्या ग्रंथाचें वाचन करावयाचें तें शिस्तवार करावें. घे पुस्तक, कीं उलट पानें असें केल्यानें ज्ञानप्राप्ति तर एकीकडेच राहिली परंतु मन ‘ ज्ञानलवदुर्विदग्ध ’ होऊन त्याचें रंजन करण्यांत प्रत्यक्ष ब्रह्मदेवासही हात टेंकावे लागतात. एका वेळीं एकच पुस्तक परंतु तें नीट मन लावून वाचून त्याजवर विचार करून, त्यांत शंका असतील त्यांचें दुसऱ्या कोणापासून निरसन करून नंतर दुसरें घ्यावें. वर वर पुस्तक वाचणारा, आणि सृष्टिसौंदर्य पहाण्यासाठीं रानांत जाऊन डोळे मिटून झोंप घेणारा किंवा मैलाचे दगड मोजून माघारी येणारा दोघेही सारखेच. जर खरें सौंदर्य पहावयाचें तर वर वर पाहून काय होणार? त्या पुस्तकाच्या अंतःकरणांत शिरलें पाहिजे. सतार हातांत घेऊन नुसत्या

तारा हालवल्या तर काय होणार आहे ? ती बोल कसे काढते हें जाणण्यास मन लावून वाजवून पाहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें जिज्ञासु मनुष्यानें रोज नियमानें वाचन केलें पाहिजे. तसें केलें नाहीं तर ज्ञानप्राप्ति फार दुष्कर आहे.

तिसरी गोष्ट ही कीं, वाचणें तें समजून वाचलें पाहिजे. पुष्कळ सावकाश वाचलें; वर्षांत चार पानें वाचलीं पण आपण काय वाचलें हें जर समजलें नाहीं, तर उपयोग काय ?

व्यर्थ भाराभर । केलें पाठांतर ॥

असेंच व्हावयाचें. पुष्कळ लोकांस गीता पाठ करण्याची संवय असते; परंतु त्या पाठापासून उपयोग कांहींच होत नाहीं. गीतेसारखें उत्कृष्ट पुस्तक जगांत सांपडावयाचें नाहीं. पण न कळतां कितीही वाचलें ह्मणून उपयोग काय? अमुक पुस्तक वाचलें आहे अशाबद्दल फक्त डौलच ज्यांस मारायचा असेल त्यांची गोष्ट निराळी. त्यांच्याकरितां हें सांगणेंच नव्हे.

७. आमच्या लोकांत पेशवाईच्या काळीं किंवा त्याच्या पूर्वीं कांहीं वाचनाची अभिरुचि फारशी नव्हती. सांप्रतची स्थिति त्याहून भिन्न आहे असें म्हणण्यासही अजून जागा झाली नाहीं. याविषयीं जें लिहावयाचें तें गुरुवर्य विष्णु शास्त्री चिपळुणकर यांनीं थोडें बहुत लिहिलेंच आहे. शेवटीं सरजॉन हर्शेलचें पुढील वाक्य ध्यानांत धरून व तोच वर ईश्वरापाशीं मागून कालिदास शेक्सपिअरादिकांच्या समागमाचा लाभ करून घ्यावा एवढी विनंती करतों.

" If I were to pray for a taste ," says Sir John Herchel, "which should stand me instead under every variety of circumstances, and be a source of happiness and cheerfulness to me through life, and a shield against its ills, however things might go amiss and the world frown upon me, it would be of taste for reading."

REFBK-0019182